म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय कथा
दा क्र १४५४

IRBK-0101454

…ठय, ठाणे.
…शाखा.
क्रमांक …
पुस्तकाचें नांव …
लेखक …
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.

IRBK-0101454
IRBK-0101454

# सुरवातीस—

हा पुष्पगुच्छ रसिकवाचकांच्या हातांत देण्यास आम्हास आज फार आनंद होत आहे. पुष्पगुच्छाची घडण कशी आहे, त्यांतील पुष्पें किती सुवासीक व मनोहर आहेत, त्यामुळें नेत्रानंद व मानसिक आनंद किती प्रमाणांत मिळतो हें सर्व ठरविण्याचें काम आम्ही रसिक वाचकांवरच सोंपविले आहे.

हा पुष्पगुच्छ, छापून तयार करण्याचें कामीं आम्हांस येथील दानशूर श्रीमान् नागरीक **श्री. रावजी सखाराम दोशी** यांचे फार सहाय्य झालें. तसेंच कल्याण पॉवर प्रेसचे मालक **श्री. वर्धमान पार्श्वनाथ शास्त्री** यांनीं आम्हास हें पुस्तक छापून देण्यास फारच चांगली मदत केली याबद्दल आम्ही त्या उभयतांचे आहोत.

सौ. काशीताई लेले जी. ए. यांनीं वेळांत वेळ काढून आमचे विनंतीस मान देऊन गोडशी प्रस्तावना अल्पावधींत लिहून दिली याबद्दल आम्ही आभारी आहोत.

रसिक वाचकांचे कृपाभिलाषी

**दत्तात्रय बळवंत लेले**
बी. ए. एल्.एल्. बी. वकील
व
**राजाराम विठ्ठल जोशी**
सोलापूर.

**सोलापूर**

**जुलै १९३७**

# अनुक्रमणिका.


| पुष्प नं. | | नांव | वाचनकाल मि. से. | पृष्ठ |
|---|---|---|---|---|
| १ | लें | सरोजिनी .... .... | २६–३० | १ |
| २ | रें | उजळलेली दिशा .... | १४–२० | २६ |
| ३ | रें | हौसफुल्ल, पण– (विनोदी गोष्ट) | १२– ० | ४० |
| ४ | थें | अक्षयशल्य .... .... | ११–१० | ५२ |
| ५ | वें | 'म्हणे अष्टपुत्रा भव' कशाला ? | १२–१५ | ६२ |
| ६ | वें | दैवाधीन .... .... | १४– ० | ७३ |
| ७ | वें | तपकिरीवर ॲडजर्नमेंट (विनोदी गोष्ट) | ११– ० | ८७ |
| ८ | वें | नराधम .... .... | १३– ० | ९७ |
| ९ | वें | कुसुमशरविद्ध .... | ८–४० | १०६ |
| १० | वें | दोन स्वर्ग .... .... | १९–२० | ११४ |


**चुकीची दुरुस्ती**– पान ४१ ओळ १ ली शब्द कॉ० ते ओळ २ पैकीं लिहिणें येथपर्यंतचे शब्द गाळून टाकावे.

# प्रस्तावना

खरोखर प्रस्तावना ही नेहमीं वाङ्मयश्रेष्ठाकडूनच व्हाव-याची असा प्रघात आहे. अशा स्थितींत प्रस्तावना करण्यांत सध्यां तरी मी धाडसच करीत आहे, नव्हें लहान तोंडीं मोठा घांस घेऊं पाहत आहे असें वाटतें. पण उत्साही व होतकरू मित्रद्वयांच्या आपुलकीच्या व आग्रहाच्या विनंतीला मान देणें मी माझें कर्तव्य समजत असल्यामुळें मला तें काम करणें जरूर व उचित वाटतें. असो.

'पुष्प-गुच्छ' म्हणतांच कोणाचे डोळे त्याकडे वेधणार नाहींत? देवाघरचीं फुलें व मानवाघरचीं मुलें पाहतांच कोणाला तीं हवीशीं व ध्यावीशीं वाटणार नाहींत? आपल्याकडे वस्तुगत किंवा व्यक्तिगत गुण-धर्म दाखविणारीं नांवें ठेवण्याचा प्रघात आहे. उदाहरणार्थ—मीनासारखे जिचे डोळे ती मीनाक्षी. आतां ह्या उलट विमल, कमल, माणिक, हिरा [ कुठला कोणास माहीत ] अशीं नांवें सदिच्छेनें ठेवून समाधान मानतात कांहीं जण; पण पुष्कळ वेळां ' नांव सोनुबाई पण हातीं कथलाचा वाळा ' असाही प्रकार आढळतो आणि त्याचवेळीं नांवांत काय आहे असा स्वसमर्थनपर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय ...
क्र. ७८५४ नों दि. ....

सवाल विचारण्यांत येतो. पण नांवांत काय नाहीं ? नांवांतच सर्व जादू भरलेली असते. नांवाच्या पर्तावरच अलम दुनियेचा कारभार चाललेला आढळतो. ह्या दृष्टीनें पुस्तकाचें नांव सहज सुंदर, रमणीय व अर्थबोधक आहे.

आतां गुच्छ म्हटला कीं, त्यांत कांहीं रंगीबेरंगी तर कांहीं सुवासिक व सुंदर तर कांहीं बोजड व नाजुक--निव्वळ झेंडूच्या फुलांचाही नाहीं किंवा केवळ गुलाबाच्या फुलांचाही नाहीं — तर विविध तऱ्हेच्या फुलांनीं युक्त असाच असतो. तद्वत्च हाही गुच्छ बनवलेला आहे.

हा गुच्छ लहान मोठ्या अशा दहा फुलांनीं युक्त असा आहे. ह्यांत कांहीं वस्तुस्थितीनिदर्शक, तर कांहीं नवमत प्रवर्तक अशा सामाजिक कथा पहावयास सांपडतात. अगदीं पहिलीच गोष्ट सरोज व सरोजिनीची घ्या. ह्यांतील पतिपत्नींनीं संसारांत शक्या-शक्यतेचा व जरूरीचा विचार करून, खुळचट मानापमानाच्या कल्पनेला बळी न पडतां जीवित सुखमय बनवलें आहे. सध्याच जरा सरोजिनीचें तत्त्व समाजाच्या गळीं उतरलें नाहीं तरी कालां-तरानें तें पटण्यासारखें आहे. तें आदर्शवत् नसलें तरी व्यावहा-रिक नाहीं असें कोण ह्मणेल ? ‘ दैवाधीन ’ ह्यामधील दैवानें कलाटणी दिल्यामुळें हताश झालेले ‘ माधव ’ कित्येक कुटुंबांतून पाहवयास सांपडतील. पण लेखकानें भावनेच्या ओलाव्यानें व अगदीं हळुवार हातानें तें चित्र रेखाटलें असल्यानें चटका लावून

सोडतें. तसेंच समान हक्काचें ‘ अक्षय शल्य ’ पदोपदीं स्त्रियांना कसें बोंचतें हेही मोठ्या सौजन्यानें कथन केलें आहे. ‘ अष्टपुत्रा भव ’ हा मात्र चालू परिस्थितींत स्त्रियांना अशीर्वाद न वाटतां शाप वाटतो ह्याची ग्वाही हिंदुस्थानांतील स्त्रियां एकमुखानें देण्यास कचरणार नाहींत. तर हिटलर शाहींतील स्त्रियां अद्यापही हा आशीर्वादच मानतील ! खरा, आशीर्वादाचा राग येत नाहीं, तर परिस्थितीचा. पण सध्यां तरी तो शाप वाटतो असें खरें. हें अगदीं सडेतोड व स्पष्ट शब्दांत वर्णन केलें आहे.

पक्वानाच्या जेवणांत चटणी ही पाहिजेच त्याखेरीज खरी खुमारी नाहीं. तसेंच विचारप्रवर्तक गोष्टी वाचून, वाचकवृंद कंटाळेल, म्हणूनच कीं काय चटकदार, चुणचुणित व चुरचरीत विनोदी गोष्टी देऊन हा गुच्छ सर्व तऱ्हेच्या सजावटीनें सजव-ण्याचा प्रयत्न केला आहे. विशेषतः ‘ हौस फुल्ल ’ ह्या गोष्टींतील विनोद मोठा मार्मिक व बहारीचा वठला आहे. वाचतांना अगदीं मनांतल्या मनांत व शेवटीं पोटभर हंसू आल्यावाचून राहत नाहीं.

एकंदरींत गुच्छाची मांडणी सुबक, मनोहर व चित्तवेधक आहे. वर्णनें व प्रसंगस्थळें नीलाकाशांतील तुरळक तारकाप्रमाणें शोभा देणारींच आहेत. आतां सरावलेल्या माळ्यानें बांधलेला गुच्छ व नवीन माळ्यानें बांधलेला गुच्छ ह्यामध्यें जशी तफावत पडणें शक्य आहे तद्वतच निर्ढावलेल्या व होतकरू लेखकांत थोडाबहूत फरक दिसल्यास विशेष नाहीं. एवढें सांगून लेखक–

दूर्वांच्या पुष्पगुच्छाची दुसरी आवृत्ती ह्यांही पेक्षां रंगीबेरंगी व सुवास पुष्पांनीं युक्त अशी निघो अशी इच्छा प्रदर्शित करून मी आपली प्रस्तावना पुरी करतें; नाहींतर 'मिया मूठभर आणि दाढी हातभर' असा प्रसंग ओढवावयाचा.

**सौ. काशीबाई लेले, बी. ए.**

लेडी सुपरिंटेन्डेन्ट— सरस्वती मंदिर,

ऑनररी मॅजिस्ट्रेट, सोलापूर.

# पुष्पगुच्छ

## पुष्प १ लें

# सरोजिनी

— लेखक —

दत्तात्रय बळवंत लेले,

बी. ए. एल्. एल्. बी. वकील.

बाकी आमची सरोजिनी लहानपणापासूनच अशी स्वतंत्र वृत्तीची, नी, कांहीं तरी नवीन काढून तें यशस्वी करून दाखविणारी बरं कां! अगदीं लहानपणाची गोष्ट. तिच्या घरीं सगळ्या मुलीं 'खेळ' खेळत होत्या व तीही एका लग्नाचा 'खेळ' खेळत होत्या. सरोजिनी-कडे नवऱ्यामुलीची आई होण्याची पाळी आली. झालं. दुसरी एक काशी नांवाची मुलगी होती, ती झाली नवऱ्या मुलाची आई, आणि लागली वरमाईचा रुवाब दाखवावयास. गोष्ट

होती क्षुल्लक, काय तर ह्मणे नवऱ्या मुलानें मान खालीं घालूनच बसलें पाहिजे नवऱ्या मुलीच्यापुढें. लग्नांतीलच, तोही लटु-पटीच्या लग्नांतील प्रसंग. वास्तवीक बाहुला—बाहुली दोघेही लाकडाचे ठोकळे, मग कोणचा ठोकळा ताठ उभा ठेवला नि कोणचा ठोकळा खालीं पडला, यांत विशेषसें कांहींच नव्हतें. मोठ्या माणसांच्या दृष्टीनें नसेल त्यांत कांहीं विशेषसे, पण बाल मन व तेंही खेळांत रमलेलें, तन्मय झालेलें, मग त्यांना या ठोकळ्यांतच वास्तव स्वरूप दिसल्यास त्यांत काय आश्चर्य !

ईश्वराची मानवी प्राण्याकडे पहावयाची अशीच, मोठ्या माणसांच्या प्रमाणें, बुद्धि असेल कां ? त्याचे दृष्टीनें सर्वच मानवी प्राणी ह्मणजे कुच किंमतीचे लाकडी ठोकळे, मग आधीं एक पडला, मागाहून एक उठला किंवा सर्वच एकदम पडले, तरी त्यांत त्याला काहीं सुख, दुःख नसेलच म्हणा, पण निदान सुख, दुःख अशी एकादी भावना तरी त्याला असेल कां नाहीं कोण जाणें. असो.

तर मग, झाले काय कीं, आमच्या सरोजिनीनी काय, तिसरंच काढलन, कीं नवऱ्या मुलानेंच उलट नवऱ्या मुलीपुढें खालीं मान घालून बसावयास हवे ! झाले, वादास किंबहुना भांडणास सुरवात झाली. त्यांतल्या त्यात काहीं मुली म्हणत होत्या, दोघेही सारखेच ताट असूं द्यावेत.

अखेर सरोजिनीनें आपला हेका सोडलाच नाहीं व आपलेच ह्मणणें खरें करून, त्या प्रमाणें लग्नांत नवऱ्या मुली पुढें नवऱ्या मुलाला

मान खालीं घालावयास लावून बसविलें व आपला हट्ट पुरा केला. ही नवीन क्लुप्ती शोधून काढल्याबद्दल तिला फारच आनंद वाटला. स्वतःच्या कल्पनेप्रमाणें, इच्छे प्रमाणें, घटना घडत गेल्या म्हणजे आनंद व्हावा, हा मानवी स्वभावच आहे. सरोजिनीलाही फारच गंमत वाटली, नव्हे मनापासून आनंद नि समाधान वाटलें तिला. विशेषतः आपण नवी कल्पना काढली व ती लगेच अमलांत आणली गेली याचा आनंद झाला तिला.

\+ + +

यानंतर बऱ्याच वर्षांची गोष्ट.

आज 'कल्पना' या विद्यालयांत कोण गर्दी जमली होती, त्या विद्यालयांतले सर्व विद्यार्थी–विद्यार्थींनी झाडून आपआपल्या इष्ट मैत्र मैत्रिणीसह तर दुपारपासून हजर होत्याच, पण या अफाट शहरांतील सर्व विद्यालयांतील तरुण तरुणी आणि गांवांतील कित्येक लोक, यांनीं 'कल्पना' विद्यालयाचें भव्य व्याख्यानमंदिर फुलून गेलें होतें. जिकडे तिकडे आनंद व औत्सुक्य दिसत होते. सर्व चेहरे प्रफुल्लित दिसत होते. आनंदमयीच सर्व वातावरण बनलें होतें. आणि विद्यालयीन आयुष्य म्हणजे खरोखरच फुलांचें जीवन, नुसतें उमलावें, सारखे हंसावें नि आनंदानें डोलावें, जगांत दुःख, जबाबदारी वगैरे राक्षस असतात, याची फारशी कल्पनाच या सुखी प्राण्यांना नसते. अंगांत भरपूर ताकद एक-तऱ्हेचें तेज म्हणा हवें तर, भरदार मन, नी सर्वांवर ताण म्हणजे 'आपण काय वाटेल ते करूं शकूं' अशी मनाची उमदी उंची ठेवण.

संसारांतील वाढत्या जबाबदारीमुळें आणि आर्थिक हालाचे चटके वारंवार बसल्यामुळें पिळवटून गेलेले, संसारी लोक नि विद्यालयीन तरुण तरुणी, यांच्यामध्यें जमीन आस्मानाचें अंतर. असो. आजच पहाना व्याख्यानाच्या समारंभाचा शेवटचा दिवस. चढाओढी संपण्याची शेवटची तारीख. ज्यांनीं आपल्या वक्तृत्वानें सर्व विद्यालयांत नांव मिळविलें होतें, अशा सरोजिनी व पिरोज खडांगळे या जोडीची आज व्याख्यानें होणार होतीं, नि यांत यशस्वी कोण होणार इकडे सगळ्यांचें लक्ष लागलें होतें. तासचे-तास कोणत्याही विषयांवर अस्खलित बोलण्या-बद्दल पिरोज व सरोजिनी दोघेही महशूर होते. त्यांतल्यात्यांत 'स्त्रीजीवन' विषय असला कीं सरोजिनीला मोठा त्वेष चढे. अशा वेळीं तिच्या वक्तृत्वाला मोठा बहर येई. हृदयापासून, नव्हे हृदय-पिळवटून निघणारें तिचें भाषण असें. त्यामुळें श्रोतृवृंदांना अती-शय आवडे तिचें भाषण. आजही असाच विषय होता. "'स्त्रियांच्या मनावरील 'असे पति देवाचि' हा संस्कार इष्ट की अनिष्ट" असा विषय आज ठेवला गेला होता. पूर्वपक्ष पिरोज करणार होता व उत्तर पक्षाचें काम अर्थातच सरोजिनीकडे आले होते.

व्याख्यानाची वेळ झाली. वक्तृत्व विभागाच्या चिटणीसांनीं सामान्यपणें विषय सांगितला व 'आजची या वर्षांतील ही शेवटची चढाओढ आहे' असें सांगून श्रोतृवृंदास शांतपणें ऐकून घेण्याची विनंती केली. अध्यक्षस्थानीं एका स्त्री प्रोफेसरांची योजना झाली. सर्व तरुण तरुणी कान टवकारून ऐकण्याच्या तंद्रींत बसल्या.

अध्यक्षांनीं प्रास्तवीक भाषण केलें, टाळ्यांच्या व स्टँपिंगच्या प्रचंड गजरांत प्रथम पिरोज उभा राहिला आणि त्यानें सुरवात केली.

" अध्यक्षबाई, मत्प्रिय बंधू भगिनीनो, नव्हे, सध्यांच्या या स्त्रीदाक्षिण्याच्या कालांत, विसाव्या शतकाच्या या दुसऱ्या पाव भागांत,बंधुभगिनींनो! असें ह्मणणें आक्षेपार्ह ठरेल नाहीं? ('अलबत' एक आवाज आला. हा आवाज त्याच विद्यालयांतील तरुण 'सरोज' याचा होता. ) तेव्हां मत्प्रिय भगिनीबंधूहो, असें म्हणतो. आपण माझें भाषण शांतपणें ऐकून घ्यावे, विषय फार गहन आहे, वेळ थोडा आहे, इत्यादी सबबी मी सांगत नाहीं, मात्र कदाचित आपण सरोजिनीचें भाषण ऐकण्याकरितां, ज्यास्त उत्सुक झाला असाल हें मी जाणतो. पण प्रस्तावना आतां संपवून मी विषयाकडे वळतो.

स्त्रियांच्यावर 'पति हा देव आहे' हा संस्कार व तो इष्ट कां अनिष्ट, असा विषय आहे. त्यावर मी थोडक्यांत माझे विचार तुमच्या पुढें मांडण्याची तुमची परवानगी घेतो.

स्त्रियांच्यावर आजपर्यंत जे एक विशिष्ट संस्कार होत गेले आहेत, त्यापैकीं स्त्रीचा जन्म सेवेकरतांच आहे व सेवा करण्यांतच तिनें आनंद मानला पाहिजे, असा एक महत्वाचा संस्कार आहे. तो सर्वथैव आवश्यक व योग्य आहे. सेवा करणें हें स्त्रियानाच चांगले साधतें.

त्यांच्या इतकी एकनिष्ठ सेवा पुरुषांच्या हातून होणार नाहीं. माता ह्मणून मुलाबाळांची सेवा, पत्नी ह्मणून पतीची सेवा, बहीण म्हणून भावंडांची सेवा, या सर्व स्त्री जीवनांतील आवश्यक गोष्टी आहेत. सेवा हा शब्द जर कानाला वाईट लागत असेल, तर त्याला भक्ती म्हणां फार झाले तर, पण स्त्री ही एकटीच या महत्वाच्या कामास योग्य, लायक व अनुरुप अशी आहे. आणि हें असें संस्कार, स्त्रीच्या मनावर नेहमीं म्हणजे अगदीं बाल्यावस्थेपासून होत आले आहेत व नेहमीं होत रहात आहेत, नि होत राहणें इष्ट व आवश्यक आहे. त्यांतच समाजाचें स्थैर्य आहे, व्यवस्था आहे, शिस्त आहे, उन्नती आहे. ( हियर, हियर, टाळ्या. ) दुसरे असें पहा कीं उत्तम संगोपन, ही गोष्ट स्त्रियांनाच करतां येणें शक्य आहे, नव्हे त्याना तशी ईश्वरी देणगी आहे. अजाऱ्यांची शुश्रूषा, त्याच करुं जाणें, अपत्य संगोपनांतील हाल त्याच काढूं जाणें, आणि संस्कारानें दृढ झालेल्या या निष्ठेच्या बळावरच स्त्रिया या सर्व गोष्टी सहज करूं शकतात. त्यांत त्याना त्रास होत नाहीं, त्या लीलया या गोष्टी पार पाडूं शकतात. तात्पर्य हे संस्कार स्त्रियांचे अंगी बाणणें समाजाच्या स्थैर्याच्या दृष्टीनें, उन्नतीच्या दृष्टीनें व स्त्री पुरुष दोघांच्याही दृष्टीनें अत्यंत आवश्यक व हितकारी आहेत.

आतां उशीर बराच झाला आहे सरोजिनी या बोलावयास आधीर झाल्या आहेत असें दिसते.[ मध्येच एक आवाज—सरोजिनी अधीर मुळीच झाली नाहीं, आवाज सरोजचाच होता. ] तेव्हां

मी आतां आपलें भाषण संपवितो." असें म्हणून पुन्हां एकदां टाळ्यांच्या गजरांत पिरोज खालीं बसला.

पूर्व पक्ष मांडला गेल्यानंतर उत्तर पक्ष करण्याकरतां सरोजिनी जेव्हां प्लॅटफार्मवर जाऊं लागली, तेव्हां श्रोतृवृंदांत आनंद झाला. औत्सुक्य फार वाढलें. त्यांतल्यात्यांत सरोजचें हृदय तर धाड धाड उडत होतें. त्याची दृष्टी सरोजिनीच्या प्रत्येक हालचालीवर खिळली होती. आज त्याची तिच्या ठिकाणीं अपूर्व तन्मयता पावली होती. विद्यालयीन आयुष्यांत त्यानें व तिनें बरोबरच पदन्यास केला होता. दोघांची ओळख झाल्यापासून त्याला तिच्या विषयीं व तिला त्याच्या विषयीं एक प्रकारची विशेष आपुलकी वाटत असे. आजतर तिलाच पहिलें बक्षिस मिळावें असें त्याला मनापासून वाटत होते, नव्हे म्हणून त्यानें मनांतल्या मनांत ईश्वराचा धावा ही केला.

इकडे जगत्जेत्याच्या ऐटींत आत्मविश्वासाच्या तेज्यांत सरोजिनी प्लॅटफार्मच्या पायऱ्या चढून वर येऊन उभी राहिली. तिनें आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें प्रथम सरस्वती देवीच्या, त्या भव्य हॉल मधील, फोटोस प्रणाम केला व नंतर आपली नजर श्रोतृवर्गावरून फिरविली. चांगला क्रिकेट खेळाडु, ज्या प्रमाणें चेंडू लांब टोलावण्यापूर्वी कोणता गडी कोठें उभा आहे हें पाहून घेतो व नंतर टोला लगावतो, त्याप्रमाणें सरोजिनीनेंही एकदां श्रोतृवृंद किती आहे व आपल्या व्याख्यानाचा ओघ कसा चालवावा याची कल्पना घेणेंकरतां श्रोतुवृंदावरून नजर फिरविली.

नंतर तिनें आपल्या मंजूळ स्पष्ट व मोठ्या आवाजांत सुरवात केली.

"अध्यक्षीणबाई व तरुणीतरुणांनो, आतापर्यंत तुम्ही जें भाषण ऐकलें त्यावरून स्त्रियांनीं सेवा करावी, सेवा व भक्ती या करतांच यांचा जन्म आहे व त्यांतच त्यांचें साफल्य आहे, हे विचार तुम्हास-समजले आहेत. हे पटले आहेत का नाहींत, हे मला तूर्त अजमावितां येत नाही. पण तुमच्या चेहऱ्यावर होणाऱ्या स्वाभाविक आविष्कारावरून तुमचा कांटाही याच बाजूनें झुकत आहे असें दिसतें. मी प्रथम तुम्हास हें सांगूं इच्छिते, कीं हे विचार एका पुरुषाकडून प्रतिपादले गेले आहेत, स्त्रियांना आनंद कशांत आहे, स्त्री जीवनाचें सार साफल्य काय आहे, हे पुरुषांनीं ठरवावयाचे व नंतर असें असें आहे, असें त्यानीं सांगावयाचे व इतरांनीं आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे, स्त्रियांनीं सुद्धां त्यांच्यावर विश्वास ठेवावयाचा आणि आपले मनांतही तेच विचार भरवून घ्यावयाचे, यापरते आश्चर्य तें कोणतें? ही निव्वळ पुरुषांची युक्ती आहे. पुरुषांना अनियंत्रित अधिकार गाजवावयास मिळावा, त्यांना सुख व्हावें, त्यांना हालअपेष्टा काढावयास लागूं नयेत, चैन करावयास मिळावी, म्हणून त्यानीं स्त्री समाजावर लादलेली ही एक आपत्ति आहे व याच आपत्तीला, आपत्ती म्हणून न समजतां इष्ट गोष्ट म्हणून, त्याचा स्त्री समाजही स्वीकार करीत आहे, हें पाहून आश्चर्य वाटतें, वाईट वाटतें.

एक उदाहरण तुम्हास सांगते. थोडा विचार करा. मात्र मन निर्विकार ठेऊन विचार करा. 'पती हा पत्नीचा देव'

अशी कल्पना रुढ आहे, असेच संस्कार आम्हां स्त्रियावर आज कित्येक वर्षे, नव्हे कित्येक पिढ्या होत आले आहेत. मग तो पती एकादीच्या नशिबानें दगड कां असेना, नव्हे दगडापेक्षां कमी प्रतीचा कां असेना, त्याच्या पत्नीनें, त्याला देव समजून, त्याच्याशीं वागले पाहिजे. त्याला मात्र वाटेल तें करावयाची मुभा आहे. तो दुराचारी असला, त्यानें आणखी अनेक सवती करून आणून, प्रथम पत्नींच्या उरावर नाचविल्या, तरी या प्रथम पत्नीनें त्याला देव मानून, त्याची पूजा बांधली पाहिजे. "मला बटीक म्हणून घरांत ठेवा, तुमच्या पायाच्या दर्शनानें मला पुण्य लागेल, मला तुमची सेवा करावयाचें पुण्य घेऊं द्या. तुम्ही मला लाथा मारल्यांत तरी हरकत नाहीं. त्या मारामुळें तुमचे पाय दुखल्यास मी ते चेपीत बसेन. मला तेवढी तरी परवानगी द्या. ही सेवा करण्याचें तरी भाग्य मला लाभूं द्या. वाटल्यास जेवावयास घाला अगर घालूं नका, फक्त घरांत राहवयाची परवानगी द्या" अशा तऱ्हेची व अशाच भिकारी थाटाची याचना, भिक्षा, पत्नीनें पतीकडे मागावी, हे आमचे संस्कार आहेत, नि हे संस्कार आमच्या अंगीं इतके बाणले आहेत, हें विष आमच्या अंगीं इतके भिनलें आहे कीं, याच्या उलट जरा थोडेसे कोठें दृष्टीस पडले, पत्नीनें थोडासा न्याय्य, इष्ट, नव्हे, आवश्यक विरोध दाखविला कीं, लगेच तें दृष्य आह्मांला आवडत नाहीं. ती स्त्री 'कुलटा' होते. तिच्याविषयीं आमचें मन बिघडतें, मत कलुषित होतें, आणि वरील प्रमाणें जर ती स्त्री वागली, तर लगेच ती स्त्री महान पतिव्रता होते. तिच्या त्यागाची महत

गाइली जाते, तिच्या स्वभावाची तारीफ होते, ती स्त्री आदर्श महिला होते. आणि तो पुरुष! दहा खून माफ आहेत त्याला या समाजांत. सर्व तऱ्हेचें विलास भोगून, मजा, चैन, लुटून, नंतर जेव्हां त्याला कोणी विचारीत नाहीं, तेव्हा पश्चतापाचे—ढोंग करून आजपर्यंत "मी तुला मूर्खपणानें फार छळलें, याबद्दल मी तुझ्या पायावर लोटांगण घालतो व क्षमा मागतो." असें म्हणाव-यास आलेल्या पुरुषाला, खरोखरच हा पश्चाताप आहे, कीं लबाडी आहे, याची खात्री पटवून घेण्यापूर्वीच ती साध्वी स्त्री, त्याला तसें करूनही देत नाहीं. तो तिच्या गुडघ्यापर्यंत वांकतो न वांकतो, तोंच ही साध्वी स्त्री, गहिंवरून येते, प्रेमाश्रू गर्दी करतात, आणि हीच आपल्या तोंडांत मारून घेऊन, "मीच खरोखर अभागिनी, ह्मणूनच, नाथ, आपणाला अशी आजपर्यंत बुद्धी झाली व असें आपले हाल झाले" असें ह्मणून त्याला उठविते व आपणच त्याच्या पायावर लोटांगण घालतें. आणि असें दृश्य नेहेमी पहावयास व वाचावयास सोका-वलेले लोक आनंद मानतात. त्या स्त्रीला स्वार्थी धन्यवाद देतात आणि पुरुषाला काय? आजपर्यंत मजा मिळालेलीच असते, पुढेंही उपयोगी पडण्या करितां ही "दासी" सदा सज्ज असतेच, अशीं दृश्यें, गोष्टी कादंबऱ्यांतून रंगविलीं जातात. लोक आनंदानें वाचतात नि गुणवर्णन करीत सुटतात. हें मी आपणास एक उदाहरण म्हणून सांगितलें. स्त्रियांना सेवा करण्यास योग्य ठरवून पुरुषांनीं स्वार्थ साधला आहे. मुलाबाळांची घाण उपसावयास स्वतःस नको, अजारी

माणसांची शुश्रुषा करण्याचें काम, आपल्या अंगावर पडूं नये, मुलांच्या खस्ता खातांना आपला जीव बेजार होऊं नये, निरनिराळे खाद्य पेय पदार्थ, विनाकष्ट व्यवस्थितपणें, आपल्या पानावर सुसज्य रितीनें पडावेत, या उदात्त हेतूनें प्रेरित होऊन स्त्रियांना, हरबऱ्याचे झाडावर चढवून, त्यांच्याकडून वरील कामें बिन बोभाट पिढ्यानपिढ्या चालवून घेण्याकरितां, हे असलें संस्कार कायम ठेवण्याचे पुरुषांनीं प्रयत्न चालविले आहेत व स्त्रियांही, बिचाऱ्या अज्ञानानें त्यांच्यावर विश्वास टाकून, एकार्थी त्यांना हातभार लावित आहेत. वास्तवीक कामाची समविभागणी करून ध्यावयास काय हरकत आहे ? सर्वच पुरुष कांहीं द्रव्योत्पादनार्ह नसतात, सर्वच स्त्रियां कांहीं फक्त पाकनिष्पत्तिसाठीं जन्मास आलेल्या नाहींत, पण पुरुषी अरेरावी खालीं आज शतकानुशतकें दडपल्या गेलेल्या स्त्रिया, त्यांना स्वतंत्र बुद्धी येणार कोठून ? मी म्हणते एकाद्या दांपत्यांत नवरा द्रव्योत्पादन करावयास असमर्थ असला, किंवा पुढें ठरला व त्याच्याच सुदैवानें स्त्री द्रव्योत्पादनक्षम निघाली तर दोघांनीं आपआपल्या व्यवसायांचीं उलटा पालट करावयास कोणची हरकत असावी ? ”

येथपर्यंतच्या वाक्प्रवाहानें व विचारसरणीनें श्रोतृवर्गाचें चेहऱ्यावर सारखे बदल होत होते. या वाक्यानंतर “ हियर हियर ” “ बरोबर आहे. ” असें आवाज उठले व टाळ्यांचा गजर झाला. पुष्कळस श्रोते पिरोजच्या चेहऱ्याकडे पाहूं लागले.

"मी म्हणतें असें केल्यास दोघांनाही सुख लागेल, पण लगेच पुरुषी अरेरावी आड येईल, नि स्वयंपाकपाणि करावयाची त्या नामधारी पुरुषाला लाज वाटेल, नि मग घरांतील शांति भंग पावेल, समाजही अशा वेळीं त्या सर्वांच्या बाजूनें न होतां पुरुषाच्याच मदतीला धांवून जाईल, कारण तसे संस्कारच झाले आहेत. त्यामुळेंच तर सर्वस्वी नुकसान झालें आहे. आतां मी उल्लेखिलेल्या मिळवित्या स्त्रीवर अवलंबून असणाऱ्या पतीसह, संसाराच्या कल्पनेस विरोध खूप लोक करतील, कारण ही कल्पनाच आमच्या संस्कारक्षम व दुबळ्या मनाला सहन होणार नाहीं. पण असे संसार कोणी करून पाहिले आहेत काय ?"

वरील वाक्य सरोजिनीनें आवेशपूर्ण आवाजांत म्हटले. कां कोणास ठाऊक ? पण सरोजच्या अंगांतून एकदम वीज चमकून गेली. कसेसेंच वाटलें त्याला, कांहीं तरीच झालें त्याला, एकदम धक्का बसला त्याच्या मनाला या वाक्यानें. सर्व श्रोतृवृंद चित्रा-सारखा तटस्थ झाला होता. या वेळीं सरोजिनीला पाणी पिण्याची जरूरी वाटली. त्यामुळें व्याख्यानांत खंड पडला. श्रोतृवृंदांत या शेवटच्या प्रश्नानें खळबळ उडवून दिली. विद्यालयीन तरुणांत कांहीं संसारी लोक होते, त्यांना आपआपल्या सौभाग्यवती डोळ्या-समोर दिसूं लागल्या. व्याख्यान ऐकण्यास गांवांतील स्त्री पुरुषही बरेच जमले होते. त्यांना निराळेच विचार सुचूं लागले. स्त्रियांचे चेहरे जरा प्रफुल्लित दिसले.

" घरीं गेल्यावर जरा स्वारीची करते गंमत आज, " एक तरुण स्त्री आपल्या मैत्रिणीच्या कानांत कुजबुजली.

" हो तर काय ? दररोज म्हणे मला फिरावयाला जायचं आहे, तूच घेऊन बैस पोराना, हा काय बाई त्रास ? तें कांहीं नाहीं, आज बरे अनायासे व्याख्यानालाही आले आहेत. छान झालं बाई. " तिची मैत्रिण उलट तिच्या कानांत कुजबुजली.

सरोजिनीनें व्याख्यानास पुन्हां सुरवात केली. " तेव्हां माझे मतें हे असले घातकी संस्कार, स्त्रियांस न होऊं देण्याची काळजी घेणें, समाजाच्या सौंदर्याचे दृष्टीनें, स्त्रियांना सुख मिळण्याचें दृष्टीनें सर्वथैव आवश्यक आहे. म्हणजे त्या स्त्रिया निदान प्रतिकार करावयास तरी समर्थ होतील. आपले या अशा परिस्थितींत हाल होत आहेत, ही जाणीव तरी त्यांचे ठायीं निर्माण होईल. अग्नीवर पाय ठेवला म्हणजे भाजतो हें कळावयास, वास्तवीक अक्कल फारशी नको आहे. पण कित्येक वर्षांच्या या संस्कारमंत्रानें स्त्रिया इतक्या भारल्या गेल्या आहेत, कीं, अग्नीनें पायाला फोड आले, जबर दुखापत झाली, तरी आपले पाय भाजले जात आहेत, असें अद्याप त्यांना वाटत नाहीं, त्यांना उलट असें वाटतें कीं, आपला जन्म या हालाकरतांच आहे. यांतच आपलें साफल्य आहे. गडकऱ्यांची 'सिंधू' सर्वांना आवडते ? कां ? तर हे पुरुषी स्वार्थी संस्कार, आम्हा सर्वांच्या मनावर पूर्णपणें बिंबले आहेत म्हणूनच. तीच तळिरामाची

" गीता " पहा. कशी आहे ठणकेबाज ? पण तिची आम्हाला विस्मृती पडते. आमच्यांत मनोदौर्बल्य कमालीचें वाढलें आहे, त्याचाच हा परिणाम दुसरे काय ?

चांगल्या परिस्थितींत, ह्मणजे पुरुष चांगले असले, पती हा खरोखरच ज्ञानानें, अनुभवानें, विद्येनें, द्रव्यार्जन करण्याच्या दृष्टीनें, श्रेष्ठ असला, सुस्वभावी, निगर्वी निर्व्यसनी व पत्नीस खरोखर सुख देणारा असला, तर, मग त्याच्यावर भक्ती ठेवली, त्याची सेवा केली, तर त्यांत कांहीं वावगे नाहीं. पण मग तसें करावयास या संस्कारांच्या पकडीची मुळीच जरुरी नाहीं. त्या गोष्टी आपोआपच होतील. पण तसें नसले तर वेगळा विचार उद्भवणें आवश्यक आहे.

तेव्हां माझा थोडक्यांत मुद्दा असा आहे, कीं हे असले संस्कार विघातक आहेत यांचें समूळ उच्चाटण होणें जरूर आहे. यामुळे स्त्रियांच्या प्रगतीस निष्कारण अडथळा होतो. ज्या ठिकाणी पती हा खरोखरच देवतुल्य आहे त्याठिकाणीं या संस्कारांची आवश्यकतां नाहीं, आणि उलट ज्या ठिकाणीं पती हा राक्षस असतो, त्या ठिकाणीं या संस्कारामुळें त्या स्त्रीचें जीवन त्या राक्षसामुळें कवडी मोलाचें होतें, अत्यंत हाल अपेष्टांचें होतें, दीनवाणें होतें, आणि हें जीवन असेंच राहण्यास, हे संस्कारच कारणीभूत होतात. सबब या अशा निरूपयोगी व उलट पक्षीं घातुक संस्काराची लौकर हकालपट्टी करणें आर्यमहिलांचें माझे सर्व बंधुराजांचे पवित्र कर्तव्य आहे.

आपण माझें भाषण शांतपणें ऐकून घेतलेत या बद्दल मी आपली आभारी आहे. ”

असें बोलून स्टांपिंगच्या पांच सात मिनिटें अव्याहत चालणाऱ्या मोठ्या गजरांत व “ खूप केलीत सरोजिनी बाई ” या व अशाच अर्थाच्या, मारल्या जाणाऱ्या आरोळ्यांच्या गलबल्यांत, सरोजनें फेंकलेला दृष्टिक्षेप, घेत घेत सरोजिनी आपल्या जागेवर जाऊन बसली.

सरोजिनीच्या या उत्कृष्ट भाषणानंतर अध्यक्षांनीं समारोप केला व उत्तम वक्तृत्वाबद्दल ठेवलेला मोठा चांदीचा पेला, सरोजिनीलाच मिळाला आहे, असें जाहीर केलें. तेव्हां सर्व दिवाणखान्याभर स्टँपिंगचा प्रचंड कल्लोळ उठला व अभिनंदनांचा वर्षाव सरोजिनीवर झाला. सरोजिनीचें सरोजकडे मात्र बारकाईनें लक्ष होतें. त्याचा चेहरा आनंदानें प्रफुल्ल झालेला तिच्या दृष्टीक्षेपांतून निसटला नाहीं. तिला एकप्रकारचें समाधान वाटलें. तिच्याभोंवतालचें सर्वच वातावरण त्यावेळीं आनंदमयी होतें हें खरें. ज्या त्या श्रोत्याचें मुखावर आनंदच दिसत होता. पण रात्रींच्या नभोमंडळांत अनंत तारा चमकत असल्या तरी एकट्या चंद्रामुळेंच सर्वांत जास्त आनंद होतो नाहीं कां ? सरोजिनीचेंही तसेंच झाले. सरोजकडे पाहून तिला अभिमान वाटला, समाधान वाटले, आनंद झाला. सरोजनेही तिच्याकडे पाहिले. चार डोळ्याचें मीलन झालें आणि एका निमिषांत अर्थपूर्ण भाव एकमेकांना समजला.

थोड्याच वेळांत श्रोतृसमुदाय बाहेर पडला. जातां जातां प्रत्येकजण सरोजिनीचीच स्तुती करीत होता. ती तिला ऐकूं येत होती. सर्वांत शेंवटी एक साधारण पोक्तसा गृहस्थ आपल्या मित्राला ह्मणाला " आहे, विचार ठीक आहेत, पण प्रत्यक्ष कृतींत उतरवा म्हणावे. बोलणें सोपे पण करणें कठीण, त्यांतूनही जगाच आणखी जरा अनुभव येऊं द्या, म्हणजे समजेल सर्व कांहीं. लहान आहेत जरा अजून ह्या. पुढें कळेल सर्व " सरोजिनीनें हें सर्व ऐकलें. तिला राहवेना तिनें त्या गृहस्थाचे जवळ जाऊन त्याचें नांव व पत्ता विचारून घेतला व त्याला मोठ्या अभिमानानें व विनयानें सांगितलें, कीं, " मी बाेलले त्याप्रमाणेच करणार आहे. त्याला मदत हे माझें प्रिय मित्र, ( हें शब्द उच्चारतांना तिचें अंगावर रोमांच उभे राहिले नाहींत, कीं तिला विशेषसे कांहीं वाटले नाहीं. ) मि. सरोज मला पूर्णपणें सहाय करणार आहेत. " असे म्हणून तिनें सरोजला हांक मारली व सरोजची ओळख करून दिली. हें संभाषण चालू असतां बरेच भोंवताली जमा झालें होतें. सर्वांना सरोजिनीचें धाष्टर्य पाहून कौतुक वाटलें.तर एका दोघां विवाहितांना असली धीट बायको आपणांस कां मिळाली नाहीं, ह्मणून वाईट वाटलें असें दिसतें.

त्या गृहस्थानीं नम्रपणें नमस्कार करून ओळख ठेवा व वेळ आली म्हणजे पुन्हां भेटूं असें उत्तर दिलें.

त्याच दिवशीं सायंकाळचा रात्रीं साडे आठ नवाचा सुमार, विद्यालयीन क्रीडांगणांतील मऊ मऊशा हिरवळीवर एक तरुण व एक तरुणी थट्टा विनोद करीत बसलें होतें. प्रशांत चंद्रमा, आपले धवल किरण, आनंदानें बेहोश होऊन फेकीत होता. जलचर-स्थिर सर्व सृष्टी आनंदानें डोलत होती. क्रीडांगणाजवळून येणारा शेजारच्या रम्य उद्यानांतील स्निग्ध व मधु, मधुरतर, सुगंधी परिमल वृत्ती बेहोश करीत होता. हिरवळीचा सुखदायी, मऊ गालिचा, गात्रांना आनंद देत होता. त्या हिरवळी वरून, नुसता हात फिरवला, म्हणजे इतकें अनुपम सुख मिळत होतें कीं, त्यापुढें सर्वांत भारींत भारी, मखमलीच्या गालिच्याचें सुख काय होय ? आणि हे ही खरेंच. मखमलीचे गालीचे किती झाले तरी मनुष्य-निर्मित, निदान निसर्गाकडून कांहीं कांहीं वस्तू घेऊन त्यावर आपल्या कलाकौशल्याचा हात फिरवून त्यापासून तयार केलेले रेशमी गालिचे ते ! त्यांत व खरोखरच्या नैसर्गिक गालिच्यांत मोठाच फरक पडणें, अगदीं स्वाभाविक आहे. बहुमोल किंमतीचीं अत्तरें उधळून ही सुटणार नाहीं, असा आनंददायी, नव्हे, बेहोश करणारा परिमळ ताज्या पुष्पापासून निर्माण होत नाहीं काय ?

भोंवतालच्या या रम्य वातावरणांत बसलेल्या त्या तरुण तरुणीला—सरोज—सरोजिनीला आज फारच आल्हाद वाटत होता, नव्हे बेहोश अवस्थेंप्रत दोघेंही जाऊन पोंहचलीं होतीं. अंगांत रेशमी शर्ट व त्यांतूनच उमटून दिसणारें पीळदार व कमावलेलें

शरीर सहज सुंदर केशरचनेमुळें अधिकच आकर्षक दिसणारे भव्य कपाळ, चमकणारे नेत्र, सतेज कपोल व हास्याचे तुषार फेकणारें वदन, या सर्वच गोष्टींमुळें सरोजिनी सरोजकडे नुसती पहातच राहिली होती. मोकळेपणानें सरोज त्या हिरवळीवर स्वच्छंदीपणानें पहुडला होता. कसल्यातरी गोड तंद्रींत तो गुंगला होता. त्यामुळें त्याचें वदनावर हास्य विलसित झालें होतें. प्रातःकाळच्या दवबिंदूनीं स्वच्छ स्नान केल्यानंतर, रविकिरणांचा सतेज चकाकणारा पोषाख लेऊन, स्वच्छंदानें डोलणारे हंसणारें गुलाबाचें फूलच जसें कांहीं ! मग त्यामुळें सरोजिनीचें लक्ष सरोजच्या मुख कमलावर खिळून राहिल्यास नवल तें कसलें. स्वेच्छेनें वागवतांना आपला पंखाचा डौलदार व मनोमय मनोहारी पिसारा पसरून नभोमंडलांत काळ्याकुट्ट मेघांनीं गर्दी करून सोडल्यानंतर त्यांपैकडे पाहून आनंदानें बेहोश होऊन नाचणाऱ्या मयुराकडे पाहून लांडोर ज्याप्रमाणें आनंदित होऊन त्याच्याकडेच पहात राहते, त्याप्रमाणेंच सरोजिनीची अवस्था झाली होती.

सरोजिनीस राहवेना. ती सरोजच्या जवळ गेली व त्याचा हात तिनें आपल्या हातांत घेतला, हस्तस्पर्श होतांच सर्व देह पुलकित झाला, प्रफुल्लित झाला, तिच्या देहावर रोमांच उभे राहिले. आज पर्यंत न अनुभवलेलें सुख तिला वाटूं लागलें. त्या स्पर्शांत कांहीं तरी विशेष जादू होती. अवर्णनीय पण फक्त अनुभवनीय सुख तिला वाटलें. असें कां होतें हें तिला समजेना.

विद्यालयीन आयुष्यांत म्हणजे नेहमीं, तिला हस्तांदोलन करण्याचे प्रसंग आजपर्यंत किती तरी आले होते. आज सकाळीं तर किती तरी विद्यार्थ्यांनीं तिच्याशीं हस्तांदोलन करून आपलें अभिनंदन व्यक्त केलें होतें, पण तिला एकाही वेळीं अशा गोड संवेदना झाल्या नव्हत्या. यक्षिणीच्या कांडीचीच जादू वाटली तिला. तिच्या नकळत, तिच्या तोंडून उद्गार निघूं लागले, तिच्या हृदयाच्या तारा छेडल्या गेल्या. आणि असें होतेच कीं नाहीं. तंतुवाद्याच्या बऱ्याचशा तारांपैकीं फक्त एकच तार वाजविली जाते, आणि इतर तारा सहज संवेदनामुळें स्फुरूं लागतात, आपोआप कंप पावूं लागतात, ध्वनी निर्माण करतात, चित्ताकर्षक गाणीं उमटवूं लागतात व हें सर्व त्या तारांना प्रत्यक्ष वाजविणाराचा हात न लागतां! सरोजिनीचेंही असेंच झालें हस्तस्पर्शानें व भोंवतालच्या वातावरणानें, तिच्या हृदयाच्या तारा छेडल्या गेल्या. वीणा वाजूं लागली, फिडलचे सूर बाहेर पडूं लागले. सरोजला हें हृदयाचें संगीत फारच आवडलें.

तो जीवाचा कान करून ऐकूं लागला.

“ सरोज ” सरोजिनी म्हणाली, ” तूं माझाच आहेस पण अक्षय माझाच राहशील कां रे ? सरोजिनीचें प्रत्येक अक्षर सरोजला अमृतमय वाटलें. तिच्या प्रश्नाला शाब्दिक उत्तर देणें सरोजला अशक्यच होतें. भावनांनीं हृदयभरून आलें म्हणजे शब्द संपतात. वाचा त्या भावना स्पष्ट करून सांगणेस सर्वस्वी असमर्थ असते. शब्दांतील स्थितीचें शब्द कसें वर्णन

करुं शकणार ? अशा वेळीं मानवी देहांतील अत्यंत तेजस्वी, अत्यंत नाजुक व अत्यंत उपयोगी, असें जें इंद्रिय, ह्मणजे नेत्रद्वय तेंच फक्त काम करूं शकतें. सरोजच्या नेत्रानें सरोजचें हृदय उघडें करुन दाखविलें. सरोजिनीला अत्यानंद झाला. दोन हृदयें एक झालीं. मंद वाऱ्याची झुळक आली. येताना तिनें पुष्प परिमल सुगंध बरोबर आणला, जवळच्या गुलाबाच्या चार ताज्या पाकळ्या आणल्या व त्या सुगंधी परिमलाबरोबरच दोघांच्याही अंगावर उधळून, दोघांचें मीलन करुन देऊन ही आनंदाची वार्ता सर्व जगभर पसरविण्याच्या हेतूनें ती झट्दिशी निघून गेली.

× × × ×

काळ झपाट्यानें निघून गेला. सरोज सरोजिनींचें मीलन होऊन बरीच वर्षें लोटलीं. दोघेही विश्वविद्यालयाचे पदवीधर झाले सरोज एल्. एल्. बी झाला. सरोजिनी एम्. ए. झाली. दोघांचा संसार थाटांत सुरूं झाला. सरोजिनीच्या मनांत पूर्णपणें बिंबलेल्या कल्पना कायमच होत्या. स्त्रियांचें मनावर जे संस्कार झाले आहेत ते निर्मूलन करण्याचा बांधलेला चंग कायम होता. त्याकरतां तिनें एक संस्थाही काढली होती. पुरुषानें कितीही झिडकारले तरीं ' ' दासी ह्मणा, बटीक ह्मणा, पण घरांत ठेवा, " ही भावना नष्ट करून टाकण्याचें काम नेहमीं व्याख्यानाचें द्वारें व विचारविनिमय करून, सरोजिनीनें चालविलें होतें. थोड्याच वेळांत सरोजिनी ही त्या प्रांतांत बरीच पुढें आली. ती स्वतःच्या नांवावर पुढें आली. सरोज वकीलाची बायको

" सरोजिनी वकीलीणबाई, " अशा नांवानें पुढें न येतां " सरोजिनी एम्. ए. स्त्रीस्वातंत्र्यार्थ झटणारी मेहनती विदूषी " म्हणून ती पुढें आली. ती आपल्या व्याख्यानांतून नेहमीं उपदेश करी कीं "स्त्रीनें आपण अबला आहोत ही भावना—कल्पना अजीबात काढून टाकली पाहिजे. वेळ पडली तर पुरुषांना सुद्धां आपण पोसूं शकूं. अशी नेहमीं हिंमत बाळगली पाहिजे. त्या शिवाय हे दुष्ट व मन कमकुवत करणारे संस्कार नष्ट होणें शक्य नाहीं."

कालचक्र नेहमीं फिरत असतें रहाट गाडगेच तें. आणि सामाजिक जीवन व आर्थिक परिस्थिती ही अशीच आहे. आज भाग्यशाली म्हणून ठरलेले व अतएव सुखाच्या राशीवर लोळणारे प्राणी नेहमीं त्याच स्थितींत राहतीलच असा कांहीं भरवंसा नाहीं. व्यक्तीची तर अशी अवस्था असतेच पण राष्ट्राचेही असेच आहे ना. सोन्याचा धूर निघणाऱ्या श्रीमंत परिस्थितींत असणारा आमचा हिंदुस्थान देश पहा, कालगतीप्रमाणें पाहतां आज त्याच हिंदुस्थानांत गोऱ्यांचा सुद्धां धूर मोठ्या कष्टानें निघत आहे ना! रहाट गाडग्याच्या पाण्यानें भरलेल्या पाळ्यास काय वाटत असतें? कीं आपलें ऐश्वर्य केवढें मोठें आहे, आपला थाट काय अपूर्व आहे, आपण या अशा थाटांतच सारखे ऐटींत वर चढत आहोत, आपली उन्नती होत आहे, सहज लीलेनें आपला उद्धार होत आहे, भरभराट होत आहे. आतां उन्नतीचे शिखर काय? आपण सहजगत्या गाठूं. त्या वेळीं त्या पाळ्याला वर वर ओढणारे दोर त्याला रेशमी वाटतात, अति सुंदर दिसतात.

त्याच वेळीं गळ्यांतील घुंगुरे त्याला आपल्या या उन्नतीच्या वेळीं स्वागताप्रीत्यर्थ लावलेलें संगीत वाटतें, इतकेंच काय, पण वर दृष्टी असल्यामुळें आकाशांत पसरलेला सहस्ररश्मीचा प्रकाशही त्याला, सूर्याचा प्रकाश नसून आपलाच प्रकाश आहे असें भासूं लागतें. पण त्यावेळीं त्या विचाऱ्याला काय कल्पना असते कीं ही उन्नती म्हणजे लौकरच येणाऱ्या अधोगतीची पूर्व तयारी आहे, जलरूपी सर्व संपत्ती लौकरच नाहींशी होऊन नुसती फुटके पाळे म्हणून त्याला लौकरच खालीं खालीं उतरावें लागणार त्याला वर वर ओढणारे रेशमी दोर नसून लोखंडी लंगरच आहेत याची काय त्याला ओळख. असो.

सरोज–सरोजिनीच्या संसाराच्या सांपत्तिक स्थितीचेंही असेंच झालें. सरोजची वकिली म्हणजे वकिलीच होती. व ती तशीच राहिली. पांच पांच सहा सहा महिन्यांत एकही दावा त्याचेकडे येईना. कोर्टांत काम मुळींच नसल्यामुळें त्याचा वेळही जाईना व आर्थिक परिस्थितीही खालावत चालली आणि अखेर

" हे पहा सरोज, मी आतां येथील हायस्कुलांत शिक्षकिणीची नौकरी धरते, नि आपण आपला संसार नव्या पद्धतीनें ऐटींत चालवूं या, दव तुला पसंत आहे कां ही कल्पना. बाकी तुला पसंत असलीच पाहिजे ह्मणा. मी काढलेली कुठलीही कल्पना तुला पसंत नेहमींच असतें नाहीं कां ? " सरोजचें म्लान वदन वर करून त्या वरून प्रेमभरानें हात फिरवीत सरोजिनी म्हणाली

सरोजाला प्रथम प्रथम ही कल्पना चमत्कारीक वाटली. त्याला मनापासून आवडलीच नाहीं ही कल्पना. त्याला राग ही आला सरोजिनीचा. त्याचा चेहरा जरा क्रुद्ध झाला. सरोजिनीच्या नजरेतून, सरोजच्या मनांत उठणाऱ्या व मुखावर प्रतिबिंबित होणाऱ्या या लहरी निसटल्या नाहींत. आणि तेही अगदीं योग्यच होते.

सरोज—सरोजनीचा निकट सहवास—अनुभव, जसें तळ्यांत उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक लहरी वा लाटा यांच्याकडे कमळांचें लक्ष गेल्याशिवाय कसें राहणार ?

पण या ऊर्मीमुळें सरोजिनीला आश्चर्य वाटलें नाहीं. आज पिढ्या न पिढ्या पुरुषांच्या अंगीं बाणलेल्या व संस्कारामुळें दृढ झालेल्या पुरुषी भावना त्या एकादे वेळीं सरोजच्या मनांत आल्याशिवाय कशा राहतील ?

स्त्री ही अबला आहे आपणासच तिचा प्रतिपाल केला पाहिजे आपणावरच तिची सर्व जबाबदारी आहे मग ती एम्. ए. असो: अगर अल्पशिक्षित असो. स्वतःचा व वेळ पडल्यास दुसऱ्याचाही चरितार्थ चालविण्याची तिच्या अंगीं धमक असो, तिची तयारी असो नि कांहीं असो. आणि खरे म्हणजे हे विचार सरोजच्या मनांत येऊन गेलेच एकदां. त्यानें एकदां सरोजिनीकडे पाहिले. तिचा ही चेहरा जरा क्रुद्ध झाला आहे असें त्याला वाटलें. एक क्षणभरच त्यानें विचार केला आणि तो एकदम म्हणाला.

" ठीक आहे तूं म्हणतेस तर कर अर्ज, पण हे जमावे कसें ? तुला पगार काय मिळणार. त्यांतून पाकशाला कोण संभाळणार ? "

" त्याची तुला नको काळजी, " सरोजिनीच्या कल्पने- प्रमाणें उभयतामध्यें जे प्रेमाचे नातें होतें व जो सलोखा होता त्यास अनुसरून एकेरी नांवानेच सरोजला ती नेहमीं संबोधित असें व प्रथम प्रथम जरी सरोजला ते थोडेसें चमत्कारीक वाटलें, तरी त्याला आतां संवयींमुळें ते आवडूं लागलें होतें " मला पगार चांगला शंभर रुपये मिळेल शिवाय शिकवण्या खूप मिळ- तील, मात्र सरोज आज पर्यंत जीं कामें मी करीत आलें ती मात्र आतां या पुढें तुला करावी लागणार. पाकशाळे- विषयीं प्रश्नच काढलास म्हणून सांगते मी आतां. असें पहा आता पर्यंत मी तरी पाकशाळेंत आचारी व मोलकरणी यांचे वर, चांगला वचक ठेऊन, सर्व कामें व्यवस्थित होतील अशी नेहमीं पाहणी ठेवण्या पलीकडे व वेळ प्रसंगीं तुला वाढण्यापलीकडे काय काम करीत होतें ? आतां हीं कामें मात्र मला माझ्या या व्यवसायामुळें करणें शक्य होणार नाहीं. तेव्हां ही सर्व कामें तुलाच करावी लागतील नाहीं कां ?

"तूं म्हणतेस त्या सर्व गोष्टी मला कबूल आहेत. मी तुझी सर्व कामें करीत जाईन आणि शिवाय हे पहा तुला शिकवण्या करा- वयास वेळ झाला नाहीं तर मी तुझ्या शिकवण्या घरींच करीत जाईन. अशा रीतीनें आनंदानें सुखानें व आदर्शभूत असा आपण

संसार चालवूं म्हणजें झाले. " अखेर सरोजनें सांगितलेली कल्पना पसंत होऊन अमलांतही आली. नंतर कांही महिन्यांनीं आज पुन्हा कल्पना विद्यालयांत त्याच विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सौ. सरोजिनी यांचे व्याख्यान होतें. गर्दी ही पूर्वी सारखीच होती. विषयही पूर्वीचाच. तिनें मोठ्या अभिमानानें व्याख्यान दिलें व आपल्या उत्तम संसाराचें आदर्शचित्र श्रोत्यापुढें ठेवलें. कांहीं वर्षा पूर्वींच्या व्याख्यानाच्यावेळीं तिच्यावर टीका करणारे गृहस्थ आजही हजर होते. व्याख्यान संपल्यावर त्यांनीं तिच्या घरीं जाण्याचा आपला मानस व्यक्त केला. त्याप्रमाणें सौ० सरोजिनीच्या घरीं ते गृहस्थ गेले. तेथील सर्व व्यवस्था व टापटीप पाहून त्यांना आनंद वाटला आणि मिळवत्या स्त्रीचा आनंदी संसार पाहून व गृहव्यवस्था स्वतःच्या देखरेखीं खाली उत्तम रीतीनें करवून घेऊन आनंदानें वाचनांत कालक्रमण करणारा सरोज पाहून त्यांना सरोज—सरोजिनी विषयीं साभिमान कौतुक वाटलें व त्यांनीं पूर्वीच्या व्याख्यानाचें वेळचे आपलें शब्द परत घेतलें.

वेळ पडल्यास स्वतःच्या आर्थिक मदतीवर पुरुषांना व सर्व संसारालाही आनंदानें पोसण्याचें कर्तव्य स्त्रीनें जरूर पार पाडावें. ह्या सरोज—सरोजिनीनें स्वतःच स्वतःच्या व्याख्यानांद्वारें केलेल्या उपदेशाप्रमाणें यावेळीं सरोजिनी वागत होती आणि दोघांचाही काळ अत्यंत आनंदांत जात होता.

—०—

## पुष्प २ रें

# उजळलेली दिशा

— लेखक —

**राजाराम विठ्ठल जोशी**

उमा हेमंतांचा विवाह त्यांच्या बालवयांतच झाला " अष्टवर्षा भवेत् कन्ये " चा कोंकण प्रांत, व आजन्म अविवाहित राहून देशसेवेचें व्रत घेणाऱ्या कुमारिकांचा प्रांत सोडून दिला तरी या दोहोंच्या दरम्यान असलेल्या घाटमाथ्याचें प्रांतांत कुमारिकेचीं लग्नें १२ बाराव्यांतच होतात. कौमार्याचा उंबरठा ओलांडून प्रौढ-पणाच्या प्रांतांत याच वयांत कुमारिका पाऊल उचलतात आणि मुलींनीं पाऊल उचललें कीं, वडीलधारी मंडळीं कशीं मागें रहा-णार ? तीही झपाझप पाऊल उचलतात. कुणाचें पहिलें पाऊल ज्योतिषाच्या घरांत पत्रिकांचें भेंडोळें तयार करण्याकडे पडतें; तर कोणी कार्डा पाकिटांतून पत्रिकांच्या नकला पाठविण्याकरितां बैठक मारतात. आणि नेहमींच्या " हे आणा " च्या मंत्राच्या जोडीला " ते स्थळ पहावें " हा पंचाक्षरी मंत्र गृहिणी जपूं लागतात. उमेच्या बाबतींतही असेंच झालें. आज सहा महिने धावपळ करून उंबरठे व जोडेच काय पण गणेशरावांनीं घाटमाथा मोटरनें झिजवला होता.

हेमंत असेल विशीचा, ओठ पिळले तर अजून दूध निघालें असते. सुदृढ व भव्य शरीरयष्टी, पिळदार बांधा, भव्य कपाळ व पाणिदार डोळे, गौर कांति व गोंडस ओंठावर नुकतीच फुटलेली लव ह्या सर्वांमुळें हेमंत खरोखरच मोहक दिसत होता. हेमंताचें वडील कोल्हापुरास प्रख्यात डॉक्टर होते. सांथीचे ताप व पूर्वीचा काळ व हाताला यश असा त्रिवेणी संगम डॉक्टर साहेबांच्या बाबतींत घडून आला होता. डॉक्टर साहेबांची कीर्ती घाटमाथ्यावरच काय पण कोंकण प्रांतांत ही पसरली होती व समुद्रमंथनांतील लक्ष्मी घाटावर येत होती. लक्ष्मीबाई घरांत शिरल्या कीं स्वरस्वती प्रयाणाचें प्रस्थान ठेवतें असा नेहमींचा अनुभव डॉक्टरांचे घराचे बाबतींतही खराच होता. हेमंतानें वर्षापूर्वीच सातवी इयत्तेतूनच युनिव्हर्सिटीचे मंडपांतूनच पलायन केलें होते.

शिक्षणक्रम पुरा झाला कीं, द्रव्यार्जन व नंतर विवाहाचा उपक्रम, सामान्य जनतेच्या बाबतींत खरा असतो. पण श्रीमंताच्या मुलांना शिक्षण क्रमानंतर द्रव्यार्जनाची पायरी गाळून तिसऱ्या पायरीवर पदन्यास करता येतो. उमा--हेमंताचा विवाह अशाच प्रकारचा होता. उमा--हेमंताचा विवाह झाला व खरोखरच डॉक्टर व गणेशराव व्याही—व्याही झाले.

लग्नाचा मुख्य सोहळा झाला तरी लग्नानंतरचे सोहाळे हे चालूं असायचेच. उत्सव व उत्साहाचे झरे मानवी जीवनांत उसळत असतातच. चार ऋतूंत वर्षाऋतूंतच जरी पाऊस पडला तरी डोंगर कपारींतून बाराही महिने शीतोदक पाझरत असतेंच कीं

नाहीं? तद्वतच लग्नानंतर मंगळागोर—हळदीकुंकु—वनभोजन—कधीं झोपाळ्यावरचें तर कधीं चांदण्यातलें व या नंतर

" सखीचे डोहाळे पुरवा, । हिरवा शालु तिला ग नेसवा "

या गीतानें पुलकित व उन्नत होणाऱ्या मनःस्थितीचा गोड आस्वाद ज्या सुहासिनींच्या नशिबी असेल त्यांच्या विवाहानंतरचा काळ किती झटपट निघून जातो यांची कल्पनाच केलेली बरी. तो काल लांबेल तितका लांबावा असेंच वाटत असेल प्रत्येक नववधूला. तुकारामांनीं चुकून " लहानपण देगा देवा " अशी मागणी केली असली तरी तुकारामाच्या बायकोनें मात्र इतर मागणीच केली असावी. उमेची चार पांच वर्षे या प्रमाणें आनंद व सोहाळ्यातच गेलीं पण सुखाची सीमा व दुःखाची सरहद्द एकमेकांस चिकटून असतात हें मानवी मन विसरलें तरी विधिघटना मात्र तें विसरत नाहीं हें खास. कालगति ही कांहीं वेगळीच असते. उमेच्या सासुबाईंनीं आयुमर्यादा ओलांडली आणि त्याचा दिवशीं उमेच्या सुखाची सीमा संपली. गुरु आणि शिष्य या जोडीमध्यें जरी दीपानेंच ज्ञानदीप लावला जात असला तरी सासवासुनामध्यें मात्र एकीला धुरा खालीं ठेवल्या शिवाय दुसरी पुढें येत नाहीं असाच अनुभव येतो. ज्ञानदीप वेगळा आणि संसार सागर वेगळा.

सुखाची घडी भरवान निघून जाते आणि दुःखाची तरी काय रहाते ? दुःखाची निवृत्ती कशी करावी ह्या प्रश्नानें जगांतील अद्वितीय व्यक्तींचीं मनें गोंधळून जाऊन हतबल होत

असलीं तरी दु:खाची निवृत्ती सहजगतीनें करणारी शक्ती काळांत असते. याचा उमज त्यांनाहीं येतोच आणि दु:ख तरी काय? ते स्वत:च निवृत्त होत असतें. सासूबाईंच्या मृत्यूनें सर्वांच्यावर दु:खाचें डोंगर कोसळलें पण उमेवर त्याच्या जोडीला प्रपंचाचे पर्वतही दिसले. दु:खाचा आवेग दिवसें-दिवस कमी तीव्र व अधिक सह्यच होत असतो. पहिल्या दश दिवसांतील तीव्रता पुढें पुढें मावळूं लागते आणि वर्ष सहा महिन्यांत उद्विग्न मनांचे रथ व्यवहाराच्या पंथावर येतात. सासू-बाईंचे निधनानंतर उमेचें वर्ष असेंच गेलें.

उमेला या वर्षांत किती तरी नवीन अकल्पित गोष्टी सम-जून आल्या. डॉक्टर साहेबांचें लक्ष अलीकडे घरांतून कमी कमी होत असलेलें तिला भासत होते व त्याज बरोबर अलिकडे मधून मधून बापलेकांचे खटके क्षुल्लक कारणावरून वरचेवर होत होते. गृहिणीहीन घर, व विद्याहीन चिरंजीव, ही एका बाजूस, तर दुसऱ्या बाजूस आपण मिळविलेली आलोट संपत्ती--या दोन्ही, तराजुच्या तागड्याचें मध्यें डॉक्टरांचें मनाचा कांटा समतोल राहिनासा झाला. मिळविलेल्या संपत्तीचा त्याग का भोग? उर्वरित आयुष्य हेमंत—उमे करितां का कोणा करितां? या विचारांत डॉक्टरांच्या रात्रीच्या रात्रीं जाऊं लागल्या तस तसा त्यांचा स्वभाव चिडखोर व तामसी बनत चालला. जेवण्याच्या वेळांत अदलाबदल व अनियमितपणा येऊं लागला. पण उमा मात्र डॉक्टर साहेबांची मर्जी प्रसन्न ठेवण्याचा सारखा प्रयत्न करीत

होती. सासूचे मागें सासुरवासविनी लौकिकाशिवाय आणखी तें काय मिळवावयाचें ?

सुटलेला तोल व संसारांतील उणीवा या वेळच्यावेळींच भरून काढल्या गेल्या तरच ठीक असतें, नाहींतर मानवी मनाचें वारूं मोकाट सुटतें. असमाधानानें कायमचें ठाणें दिलें म्हणजे मनुष्याचें मन आपलें असमाधान विसरून जाण्याकरितां नवीन विषय शोधून काढूं लागतें. हिस्टीरियाचा रोगी मानसिक दुःख विसरण्याकरितां कांहीं तरी काल्पनिक विषय निर्माण करतो व त्यांतच तो स्वतःचें दुःख विसरण्याचा प्रयत्न करतो ना—तद्वतच संसारांत व्यवहारी दृष्टीनें भरून न येणाऱ्या उणीवा किंवा पोकळ्या भरून काढण्याकरितां भडकलेलीं मनें व्यसन व विषयाकडे धांव घेतात व त्यांतच ती शांत होतात. डॉक्टर मजकूर आतां जेवल्यानंतर किंवा वेळीं अवेळीं ओकत असत. व त्याची निरानिपट करतांना उमेला आंबट घाण येत असे व खोलीचा केर काढतांना उमेला नवीनच बाटल्या दिसत असत. उमेची प्रथम कल्पना कीं, त्या औषधाच्या !

अडचणी व दुःखें हीं कधीं ही एकाकी येत नाहींत. त्यानांहीं उज्ज्वल परंपरा व नियम असतोच. गोष्टी अशाच घडत होत्या. आईच्या निधनानंतर हेमंताच्या जीवनक्रमांतही मोकाटपणा हळूंहळूं शिरत होता. उन्मत्त श्रीमंतीच्या बेजबाबदार व स्वच्छंदी रहाणींत वाढलेल्या लेकरांची चंचल वृत्ती स्वातंत्र्याच्या काळांत जागृत व्हावयाचीच. त्यांतून हेमंत निरुद्योगी होता.

निरुद्योगी शरीर सुखाची शेज, तर निरुद्योगी मन अनीतीची निपज करीत असते. पैसा उशाशी आणि उमा पायाशी पण यांतही हेमंताची भोगतृष्णा भागत नव्हती. उमेच्या कानावर मधुन मधुन हेमंताचे विषयीं कांहीं गोष्टी येत.

नकट्या-माणसाला नकटा म्हटलें तर खपत नाहीं, काळ्या माणसाला काळा म्हटलें तर तो हिरमुसतो—निरुत्साह होतो. आणि वेड्याला वेडा म्हटला तर तो भडकतो. मग निरुद्योगी माणसाला ऐतखाऊ म्हटला तर काय वाटत असेल ? पण याचा विचार डॉक्टर मजकूर करीत नसत. गेल्या वर्षभर घालून पाडून बोलणें वगैरे प्रकार होत होत अलिकडे बापलेकांच्या पंगतीही वेगवेगळ्या होऊं लागल्या. कधीं कधीं भांडण तंटे विकोपाला गेलें म्हणजे उमा हेमंताला चोरून जेवण देत असे.

विवाहानंतर सोहाळे भोगतांना उमेस अशा तऱ्हेचा जीवन-क्रम आपणास अनुभवावा लागेल अशी अंधुक कल्पनाही आली नसेल. तिचा पुर्वकाल आनंद व सुखानें बहरलेला होता पण आलेला मध्यभाग मात्र विलक्षण होता. प्रथम प्रथम आज सुधारणा होईल ही वेडी आशा उमेला वाटत होती. घरचीं गृहछिद्रें सासुर-वासिनींनीं बाहेर बोलायचीं नसतात. निरुपाय झाला तरी डोळे उघडे ठेवून बघायचीं असतात. लोकांत तर राहोच पण माहेरीही कळवूं नयेत. हा नीतिसिद्धांत उमेला माहित होता. कारण न जाणो उद्या सुधारणा झाली तर सासुरवासिनीच्या पदरांतच

लबाडीचें माप पडावयाचे. उमेनें इतक्या दिवसांत गणेशरावांना अगर तिच्या बंधुरायाला शब्दानें तर नाहींच, पण अक्षरांनेंही कळविलें नव्हतें.

सुख आणि सत्य यांचा भाग काढतांना

'सुख पहाता जवा पाडें' दुःख पर्वताएवढें ही अभंगवाणी जशी प्रत्ययास आल्या विना राहात नाहीं तसाच अनुभव गणेशरावांना उमेच्या बाबतींत तरी आला होता.आल्या गेल्या माणसांजवळ उमेच्या सुखाची चौकशी करतांना तिच्या दुःखाची कहाणी त्यांना ऐकावी लागे. दिवसेंदिवस संपत्तीच्या साऊलींत उमेला सुखाचा कणही न लाभतां दुःखाची धग मात्र लाभत होती. याची जाणीव त्यांना जसजशी होई तसतसे त्यांचें पितृहृदय तिळ तिळ तुटत असें संपत्ती हें सर्व सुखाचें साधन व व्यावहारी शक्तीचें एकमेव केंद्र आहे हें त्यांना पटत नाहींसे झालें. गृह सौख्य बहुंशी जरी अर्थ शास्त्रावर असले तरी त्यावरच पूर्ण विसंबतां कामा नये असें त्यांना वाटूं लागले. पुष्कळदां अर्थाकरितां अनर्थच होतात पण तरीसुद्धां गणपतरावांच्या व्यवहारी दृष्टीला दूरचें दृश्य दिसत होतें. आज ना उद्या डॉक्टर मजकूर डोळे मिटतील व तदनंतर जावई बापू हे आपल्या तंत्रानें वागतील, अर्थात् उमेला आपणास सुखी करतां येईल व आजपर्यंत स्वस्थ बसण्याचें कारण तरी हेंच होतें. ते त्या घडीची वाट पहात होते.

जगांत उन्हाळे पावसाळे पाहून टक्केटोणपे खात आयुष्याची पाऊल वाट मळणाऱ्या गणेशरावांची विचारसरणी जरी वरीलप्रमाणें

होती, तरी मातृहृदय व बंधुभाव कांहीं वेगळाच असतो. उमेला होणाऱ्या नित्य जाचाची तिच्या आईला पूर्ण कल्पना करतां येत असे. संत शिरोमणी सखूबाईला तिच्या सासूनें मारलें तेव्हां विठोबाच्या अंगावर वळ उठले आणि तिच्या सासूनें दोरीनें जखडले तेव्हां विठोबाच्या भोवतीं दोरींचे वण दिसलें अशा गोष्टी असंभाव्य अगर भाकडकथा म्हणून आपण जरी सोडून दिल्या तरी त्याच्या बुडाशीं असलेलें " सहसंवेदनेचें तत्व " कांहीं आपणास अमान्य करतां येणार नाहीं. स्निहृदयालाच स्निहृदयाचें सूक्ष्म आकलन होणार, तद्वतच उमेच्या आईची स्थिती होत होती. उमेचा संसार नीट होत नाहीं हें पाहून तिलाहि नेहमीं उद्विग्नता वाटत असे. वास्तविक तिच्या संसारांत विशेष कांहीं उणीव नव्हती. तरीही उमेची स्मृति झाली कीं तिचा कंठ भरून येत असे.

अलीकडे अलिकडे त्यांचे कडाक्याचे वादविवाद होत. उमेची आई व उमेचा बंधुराया हे एका बाजूस तर विरुद्ध बाजूस गणेशराव असा हा तिरंगी सामना होत असे. पोरीच्या बाबतींत कांहीं करावयास पाहिजे असें उमेच्या आईनें म्हटलें कीं विद्याधर ( उमेचा भाऊ ) उसळून म्हणें मी अजाण असतां उमेचें लग्न तुम्हीं पैशाशीं लावलेंत आणि तिच्या जन्माचा खेळ खंडोबा केलांत. आतां कशाला रडतां आपल्या कर्माला ? विद्याधर हा कायद्याचा विद्यार्थी त्याचें सर्व अस्तित्व उंच उसळूं लागें. हिंदुधर्मांत उच्च जातींत घटस्फोटाचा हक्क कायद्यानें दिलेला नाहीं व समाजानेंहि मान्य केलेला नाहीं याचा अत्यंत विषाद त्यास वाटूं लागला.

हिंदु कायद्यांतील वरील विवाह सूत्रें त्याला फार आवडत असत. आपल्या ख्रिश्चन अगर मुसलमान मित्रांशीं तो हिंदुविवाह पद्धतीचें वैशिष्ट्य नेहमीं आढ्यतेनें सांगत असे. पण आज—आज त्याच्या हृदयाला पीळ पडत होता. कितीदां तरी त्याच्या मनांत येई कीं कायद्यानें घटस्फोटाचा हक्क दिला नसला, अगर समाजानें त्याला संमती दिली नसली, तर जळूं दे समाज आणि कायदा दोन्हीहीं " मी माझ्या ताईला घरीं घेऊन येणार मग काय वाटेल तें होवो " कायदा व समाज पद्धति बदलेल तेव्हां बदलो पण व्यक्तीनें आपलें कर्तव्य अचुक करावें आणि पुष्कळदां भावनेच्या भरांत त्यानें ही गोष्ट आईजवळ काढली होती. दोन आंतड्यांमध्यें मायेचा पडदा कितीहि दाट असला तरी अनुभवाचें आवरण त्यांहीपेक्षां जास्त घट्ट असतें. दोन हृदयांना सहसंवेदनेनें ओढ लागली तरी त्या दोघांचे मध्यें 'हत्ती पोसणें परवडत नाहीं' हा हिंदु कुटुंब व्यवस्थेचा अनुभव त्या दोन हृदयांचें मीलन होऊं देत नाहीं. अर्थ-शास्त्रावर रेखीव व ठोकीव नीति शास्त्राचाच विजय होतो. पण या सर्व बाबतींत गणेशरावाची स्थिती मात्र केवीलवाणी होत असे ते आपल्या बाजूनें समर्थन करीत कीं आम्ही आणखी तरी काय पहावयाचें? तारुण्य, संपत्ती, व वरंदाज घराणें या गोष्टीं खेरीज मुलीच्या बापानें तरी आणखी काय पहावयाचें. मुलीच्या बापाला दूरदृष्टी जरी अवश्य असली तरी त्यास भविष्यदृष्टी मात्र खास नसते. जन्मकुंडलीवरून भविष्य कालाचें ज्ञान जरी ज्योतिषांना होत असलें तरी मुलीच्या बापाला वर्तमानकालावरूनच

भविष्यकाल वर्तवावा लागतो. मुलीला जन्म बाप देतो पण त्याज बरोबर तिला तो तिचें भाग्य व कर्म देऊं शकत नाहीं. सीता सावित्रीला सुद्धां प्रारब्धभोग चुकलें नाहींत मग इतरांची कथा काय. 'कर्मणो गहना गतिः' म्हणून ते स्वस्थ बसत पण अंतरांत मात्र त्यांना कर्तव्याची व प्रेमाची जाणीव अखंड असे. ते मनांत खूणगांठ बांधीत कीं, समाजाची इमारत व स्त्री पुरुषांची धारणा ही भावनांच्या फिसक्या वाळूवर होत नसते. व्यवहार व लौकिककर्तव्य हीं भावनेपेक्षांही श्रेष्ठ असतात, " धर्म व नीति हाच समाजाचा मूलभूत पाया व त्याचकरितां अर्थ " व डोळे किलकिले करून त्यांच्या तोंडांतून केव्हां केव्हां काव्योद्गार बाहेर पडत:—

" अज्ञान भ्रांति जळेल, दिशा उजळेल "
" प्रगट पाजळेल ज्ञानाचा दिवा "
" घे उचित पाहे प्रचीत सव्यां "
" येईल तुझ्या अनुभवा "

भरलेल्या घरांतून गृहिणी गेली म्हणजे त्या घरामध्यें नेहमीं " जा जा " ला सुरवात होते. ओटीदारांतून वडील बाहेर पडण्याचाच अवकाश कीं ओटीवर मुलें प्रलय मांडतात, खेळतात, खिदळतात आणि शेवटीं भांडणतंटा होऊन गोंगाट सुरू होतो. गृहांतील गृहिणी हा गृहदेवावर जागता पहाराच असतो पण ज्या घरांत संपत्ती नीति आणि धर्म यांचें पालन करण्यात खंबीर शिपाई नसतो त्या घरांत चोर हे शिरावयाचेच. मुळांतच लक्ष्मुबाई चंचळ स्वभावाच्या आणि त्यांत जर त्यांना सुरादेवीची जोड मिळाली

किं काय विचारतां मग दोघींची अशी गट्टी जमते कीं कांहीं बोलूं नका. डॉक्टर मजकुरांचें जीवनच हल्ली केवळ मदिरेवर होतं असं म्हटलं तर मदिरा व मदिराक्षी यांचें निकट नातें विसरल्यासारखें होणार नाहीं का ? डॉक्टरांचें घरांत एका मदिराक्षीचा प्रवेश झाला होता.

गृहांगनांची तैनात व उठबस ठेवणें वेगळे, व वारांगनांची उठबस वेगळीं. उमेला मेल्यापेक्षां—मेलं होतसे लुगडीं धुतानां नि तांबूलांचे तांबडे डाग धुतांना. डोळ्यांत पाणी आणून तिनें आज हेमंताला विचारलें होतें. हांतून विचार करून कांहीं वाट काढायला नको का ? आणि ती त्याच्या उत्तराची उत्कंठेनें वाट पहात होती. तिनें मनांत निश्चय केला होता कीं आसुरी संपत्तीवर लाथ मारून हेमंतबरोबर स्वतंत्र जिणं जगण्याचा, गेलेलें मनुष्यत्व पुन्हां मिळविण्याचा, जगांत मनुष्यरुपानं वावरण्याचा. आज बरेंच दिवसांनीं हेमंताला उमेला होणाऱ्या दुःसह यातना कळल्या. त्याच्या हृदयांतही अंतरात्म्याची थोडीशी हालचाल झाली. पण किती क्षणिक. हेमंताला उमेची एकटीचीच ओढ असती तर पुण्यानं पापावर विजय मिळवला असता. हेमंत बाहेरच्या ओढीनें बेदरकारपणें निघून गेला.

डॉक्टर मजकूर हल्लीं अंथरुणाला खिळलें होतें. रोग्याची सुश्रुषा व त्याच्या सोबत्याची उठाबस करतां करतां उमेचें प्राण कंठीं येत असत. पण आज त्यांत एका नवीन गोष्टीनें भरच घातली होती. डॉक्टरांच्या खोलींत आतां वकिलांची ये जा सुरू होत होती. मदिराक्षी वारुणीबाई वकिलांशी वुईलची कुजबूज

करीत होत्या. आतां मात्र तिच्यानें रहावेना. बापलेकांचे बरें नाहीं आज बरेंच वर्षांत भाषण नाहीं. हा विचार मनांत येतांच तिच्या पोटांत गोळा आला. आज इतक्या दिवसांनीं तिनें लिहिण्याला टांक उचलला.

" बाबा आई आणि विद्या, "

आज पावेतों जो प्रसंग येऊं नये अशी प्रार्थना करीत होते तो प्रसंग येऊन ठेपला. पापाच्या खाईंत माझी सर्व पुण्याई खर्च करून पाहिली. पत्नी ह्मणून इकडची व त्यांचे अंतीं सासरा व सासऱ्याचे अंती त्याचे अंगवस्त्राचीहि शुश्रूषा केली. अपत्यप्रेमाकरितां—कमल विमाच्या हिताकरितां—दूर-दृष्टी ठेवून पापाच्या प्रपंचाला ठिगळे लावण्याचा यथामति प्रयत्न केला. आणि या सर्वांचा मोबदला ह्मणून लवकरच मला घरांतून बाहेर पडण्याचा योग येणार हें निश्चित दिसत आहे. आसुरी संपत्तीच्या मागें लागून शेवटीं हे असं झालं. सर्वत्र काळोखी दिसते रे, भाऊराया! दशदिशा काळोखानें व्यापल्या आहेत कारे? जागरणानें माझ्या डोक्यांतही अंधार भासतो ग आई. काळजीनें पोट भरून येतं नि ग्लानीमुळें लिहवतहि नाहीं हो बाबा! तिनें पत्र पुरें केलें. व ते उद्या पोष्टांत टाकण्याचें म्हणून ठेवलें. आज तिला विलक्षण समाधान वाटत होतें. तिचा डोळा चटकन लागला. दुसरें दिवशीं कामाचें उचक्यानें उमा खालीं आली. हेमंताच्या हातांत मात्र पत्र अचान-कपणें पडलें. त्यानें तें उचलून घेतलें नि डोळ्यांनीं वाचलें दग-

डाला पाझर फुटलें. फत्तरही फुलले आणि त्यांतून शिलाजित द्रवला डोळ्यांत अंजन पडावें तसें झालें. गत आयुष्याचा चित्रपट हेमंताच्या पुढें उभा राहिला त्यांच्या ही डोळ्यास अंधारी आली. त्यांनें बराच वेळ अश्रुमोचन केलें. त्यांच्या मनांत पुन्हां पुन्हां येई कीं "हिऱ्याची किंमत गारगोटीनें केली."

हृदयांतला परमेश्वर जागा झाला म्हणजे धरणीकंपाचे धक्के बसाल्या सारखे होते. अजब शक्ति प्रतीत होते. पण लगेच त्याच्या मनापुढें प्रश्न उभा राहिला ? आसुरी संपत्तीचा भोग कीं त्याग ? सतीचा छळ कीं सतीची सेवा ? जागृत झालेल्या परमेश्वरानें वरील प्रश्नांचें उत्तर उत्तरार्धात दिलें. लगेच त्याचा निश्चय झाल्या सारखे झाले त्यानें दौत टांक घेतली व त्याच पत्रावर खालील मजकूर लिहिला.

आसुरी संपत्तीचा त्याग करून वडिलार्जित शेतीवर जिणं जगवण्याचा माझा निर्धार झाला आहे आणि उर्वरित आयुष्य उमेची सेवा करण्यांत घालविण्याचा निश्चय आहे. आपण उमेला घेऊन जा मी शेतीकडे वळतो. जीवन-सूर्य खेड्यांतूनच शहराकडे येतो.

त्यानें पत्र पूर्वीच्या ठिकाणीं घडी करून ठेवलें.उमेनें ते तसेंच्या तसेंच पोस्टांत टाकलें तो दिवस तसाच गेला. पण रात्र मात्र कठीण गेली. रात्रीं वुईलवर सह्या झाल्या. राहते घर स्वकष्टार्जित म्हणून तें व सर्व रोख पैसे डॉक्टरनीं वारुणीला दिलें पण वाडवडिलार्जित जमिनी मात्र तशाच राहिल्या. दुसऱ्या दिवशीं वारुणी हेमंताची चौकशी करूं लागली पण हेमंत कुठें होता ?

दुपारी दोनला डॉक्टरांच्या घरापुढें मोटार थांबली. गणेशराव व विद्याधर आतून उतरले. त्यानंतर विशेष ते काय घडणार ?

उमेनें हेमंत कालपासून न दिसल्याचे गणेशरावांना कळविलें पण त्यांनीं नुसते मानेनेंच सर्व कळविलें.

आणि त्याच रात्रीं उमेनें डाक्टरांचा निरोप घेतला.

आज सकाळींच उमा पूर्वघरीं आली. गणेशरावांनीं वरीं गेल्यावर तिच्या हातीं तिचें व हेमंताचें पत्र दिलें. उमेला स्वर्ग दोन बोटें उरला. तिच्या तोंडून सहज उद्गार निघाले " दिशा उजळल्या " आणि थोड्याच वेळानें दारापुढें टांगा थांबला. हेमंताला पाहतांच गणेशराव तोंडानें पुटपुटले

मानवा—

" अज्ञान भ्रांती जळेल दिशा उजळेल "
" प्रगट पाजळेल ज्ञानाचा दिवा "
" घे उचित पोह प्रचीत सध्या "
" येईल तुझ्या अनुभवा "

मानवा—



## पुष्प ३ रें

# हौस फुल्ल ! पण–

– लेखक –

दत्तात्रय बळवंत लेले

बी. ए. एल्. एल्. बी. वकील.

'गेले चार खेळ रुपये दोन हजार रोजचे गाजले '

माझा दोस्त केशव म्हणाला. मी ऐकतच राहिलों. पण थोडा विचार केल्यावर यांत फारसें अशक्य भासेना ! कारण सध्यां विद्यालयाची पहिली टर्म ! त्यांतून पुण्यासारखें शहर ! येथें विद्यालयाकरतां तरुण–तरुणी परगांवहून खूपच जमलेल्या, त्यांचेजवळ ( बापाचा असल्यामुळें ) पैशास मुळींच तोटा नाहीं; व कलेचा अभ्यास व उपासना या मोठ्या नांवाखालीं नाटकें पहाणें हें त्यांच्या कर्तव्यापैकींच एक होऊन बसलेलें त्यांच्या जोडीला !

' म्हटलं आज गडे स्वयंवर लागलं आहे, ' किंवा ' आज गडे आमचं एक काम करायचं. काय तें ओळखलं असेलच, असें घरीं येणं झाल्याबरोबर होणाऱ्या नेपथ्यपाठोंन कित्येक नवविवाहित पत्नी आपआपल्या पतींना लाडक्या अभिनयामुळें त्यांचे खिशांतले पैसे नाटक मंडळीच्या पेटींत सहजच घालवाव्यास

लावणार ! आणि म्हणून सहकुटुंब–कॉ० २ २५-३० चे पृथ्थं पंचवीस तास लिहावें, सहकुटुंब सहपरिवार बरीच जोडपीं कंपनीच्या खेळास उदार ( काय म्हणून कोण जाणें, पण म्हणायचाची एक पद्धत पडली म्हणूनच कीं काय ? पण खरा अर्थ– जाऊं द्या. ) आश्रय देत असतातच. तेव्हां वरील गोष्ट संभवनीय वाटली पण आश्चर्य वाटूं लागलें. इतक्यांत खरी कसोटी लागण्याची वेळच आली.

येणार येणारच्या जाहिराती वाचून मलाफार आनंद वाटला. माझा लंगोटीयार बापू याचीच प्रख्यात कंपनी माझ्या गांवावर नवीन सजावटीसह हल्ला करणार होती. होय नाहीं असें करतां करतां एके दिवशीं माझा मित्र लंगोटीयार बापू माझे घरीं तर येऊन उतरला, व रात्रभर गप्पा मारून आम्ही दुसऱ्या दिवशीं सकाळीं थिएटर ठरविणें वगैरे उद्योगास लागलो. गांवांतील मीच म्होरक्या असल्यामुळें व गांवाविषयीं बापूला कांहींच माहीत नसल्यामुळें सर्व कामें त्यानें माझ्यावरच सोंपविलीं. त्याच्या कंपनीची मंडळीं मागाहून येणार होती.

झालें ! मोठ्या प्रयासानें थिएटरचें भाडें वगैरे ठरलें. अगाऊ ॲडव्हान्स, करारमदार लेखी–तोंडी सर्व कांहीं कायदेशीरहि झालें ! कंपनीच्या मंडळीच्या उतरावयाच्या खोल्या वगैरेहि ठराविण्यांत आल्या. दोनचार दिवसांत मंडळी आपल्या लव्याजम्यासह येऊन आमच्या गांवांत कम्पनीचें बिऱ्हाड उत्तम प्रकारें ठोकलें गेलें !

गांवांत पहिला खेळ लागला ! हँड बिलांचा नुसता पाऊस पाडावयाचा, ॲडव्हरटाइझिंगची कमाल करून सोडावयाची असें मी व बापू यांनीं ठरवून ठेवलें होतें.

" पहिल्याच खेळास, लेका तुला याच गावांत दोन हजार रुपये उत्पन्न दाखवून देतों बघ ,, असें मी जोरांत बापूला सांगत असें !

पण बापू कसला वस्ताद ! तो नुसता हांसला ! कारण धंद्यां-तला बापू म्हणजे मुरब्बी होता. मला त्याचा मिस्किलपणें हसण्याचा राग आला. मी त्याला पुन्हां खात्रीचें आश्वासन दिलें. आणि माझा शब्द खरा करून दाखविण्याकरितां मीहि कॅनव्हसिंगला सुरुवात केली. मात्र कोणाच्याहि मदतीकरितां किंवा धार्मिक हेतु मनांत धरून मी खटपट करीत होतो असें मुळींच नव्हे, केवळ बापू व माझें आश्वासन यासाठीं माझें कॅनव्हसिंग सुरू झालें !

ठरल्याप्रमाणें रंगी बेरंगी जाहिराती छापावयास दिल्या. व त्या वाटण्यासाठीं हुषार मुलेंहि शोधून काढलीं. व्यवस्था अशी केली कीं, प्रत्येक घरांत तर एकेक जाहिरात पडलीच पाहिजे, पण लहान लहान मुलांत सुद्धां ' मला मिळाली नाहीं , म्हणून त्यांचे-वर खट्टु होण्याचा प्रसंग न यावा व प्रत्येकांचे हातांत ती पडून त्यांच्या मातेस सकौतुक व सहज मिळेल या साठीं पोऱ्यांना सक्त ताकीद दिली होती कीं ' प्रत्येक मुलाचे हातांत जाहिरात द्या म्हणून ' हेतु हा कीं, मातेच्या मध्यस्थीनें पित्याला रुह बसावा व सर्वच कुटुंब पोराबाळासह नाटकास येऊन गल्ला खूप व्हावा !

(१) लोकांना तिकिटें काढावयास ऐत्या वेळीं त्रास पडूं नये म्हणून माझ्या ओळखीच्या बहुतेक भागांतील मोठमोठाल्या दुकानांत तिकिटबुकें ठेवून मोठाले बोर्डस् लटकावून दिले. एका चौकांतील सॉलीसिटरच्या बिल्डिंगवर तर इतका मोठा बोर्ड लाविला, कीं त्या बोर्डामुळें त्या बिल्डिंगमधल्या दहापांच दुकानदारांचे बोर्डस् आपोआपच झांकून गेले, इतकेच नव्हे तर कित्येकांची अशी कल्पना झाली कीं, सॉलीसिटरनीं आपलें ऑफीस बदललें आणि त्याठिकाणीं नाटक मंडळीचें बिऱ्हाड आलें! सांगण्याचा मुद्दा हा कीं ॲडव्हरटाइझिंगमध्यें बिलकूल कसूर केली नाहीं.

पंढरपूरच्या एकादशीचे वेळीं रेल्वे तिकीटऑफीसवर जसा तोबा उडतो तसा आपल्याहि तिकीट ऑफीसवर उडून लोकांची गैरसोय होऊं नये ह्मणून थिएटरच्या चारहि दिशांना चार प्रचंड तिकीट आफीसें उघडलीं! नटनटींचे भव्य सुंदर व प्रचंड ब्लॉक्स आकर्षक पोझिशनमध्यें थिएटरच्या शो केसेसमध्यें लावून शिवाय जाहिरातींत घातले होते.

(२) गांवांतील बहुतेक सर्व वर्तमानपत्रांच्या बातमीदारांना, संपादकांना, उपसंपादकांना तसेंच परगांवच्या स्थानिक वार्ताहरांना भेटून कंपनीवर स्तुतीसुमनांच्या माळा—रकानेच्या रकानें—उधळावयास लावून "हा खेळ प्रत्यक्ष जरूर पाहण्यास या, व लोकांना पाहाण्याची शिफारस करा," अशी विनंती करावयास आम्हीं मागें पुढें पाहिलें नाहीं. शिवाय माझ्या दोन चार कवी मित्रांना गाठून त्यांचेकडून नाटकावर व कंपनींतील सुप्रसिद्ध नट-नटींवर

दोहरे, ठुमऱ्या, गज्जल यासारखी पॉप्युलर गाणीं करून घेतलीं व तीहि छापून वाटलीं आणि चौका चौकांतून चारचार पांच पांच पोरांकडून ह्मणविण्याची व्यवस्था केली.

दररोज संध्याकाळीं सुमारें २५–३० बत्त्या भाड्यानें घेऊन एक सुंदर पुष्पालंकारांनीं नटविलेली मोटार व त्यांत प्रसिद्ध आणि देखण्या नट नटींना बसवून मिरवणूक काढण्याचें सत्र सुरूच ठेविलें होतें. मिरवणुकीची मांडणी पाहून दुतर्फा प्रेक्षकांची चिक्कार गर्दी जमे ! कारण मिरवणुकीच्या पुढें मी व बापू, नंतर बँड, ताशा त्यामागें नाटकाचे सचित्र बोर्डस्, त्याचेमागें गांवांतील लहान बेकार, पण मधुर आवाजाचीं मुलें, ती कंपनींतील नटावर केलेलीं गाणीं ह्मणत टिपऱ्या वाजवीत चालत. त्याचे मागें शृंगारलेल्या मोटारींत देखण्या नट–नटींचा तांडा आणि मागें रंगीबेरंगी हँडबिलांचा मारा, अशा थाटानें काढलेल्या मिरवणुकीची गंमत प्रेक्षकांना कां वाटणार नाहीं ! मिरवणूक पहावयास जनसमूहावरून माझे दोन हजार उत्पन्नांचें आश्वासन खरें ठरणार असें मला वाटूं लागलें आणि त्याच आनंदांत मी गांवांतील एक प्रतिष्ठित वकील आहे हें विसरून त्या मिरवणुकीच्या पुढें डुलत डुलत चालत होतो !

अखेर नाटकाचा दिवस उजाडला. त्याच दिवशीं संध्याकाळीं मी व बापु मोटारींतून बाहेर पडलो, व ज्या ज्या मित्रांच्याकडे तिकीटें विक्रीस ठेविली होतीं त्यांचें दुकानांवर तिकीट पुस्तकें व खपलेल्या तिकिटांचे पैसे आणावयास गेलों.

प्रथम दर्शनी मला जेथें तीन साडेतीनशें रुपये सहज मिळतील असें वाटलें त्या मोठ्या दुकानीं गेलों तों काय ! फक्त त्या ठिकाणीं पांचच रुपयांची तिकीटें खपलीं होतीं, आणि त्यांतहि दुकानदाराकडे ३ रुपये व माझे परम स्नेही मि. गुंडोबा शिंदे यांचेकडे दोन रुपये उधार होते. बाकीचीं सर्व तिकीटें त्यावरील माझ्या आद्याक्षरासह व छापासह परत घेतलीं. आठ दिवस तसदी घेतल्याबद्दल 'आजरात्रीं नाटकास जरूर या, असा निरोप [ माझ्या इच्छेविरुद्धच ] त्या दुकानदारास सांगून दुसरें दुकान गांठलें. पाहतों तों सगळीकडे एकच अनुभव आला. कांहीं ठिकाणीं तर 'उरसे जादा' अनुभव मिळाला. ह्मणजे खुर्च्यांच्या व ओट्याच्या तिकीट बुकांपैकीं दहा पंधरा टिकीटांचा हिशोबच नव्हता ! ह्मणजे पैसेहि नव्हते व तिकीटेंहि नव्हती. त्यांचेकडून "एवढेंच काम नाहीं महाराज आम्हाला, उद्या सांपडल्यास देऊं." असा तिरस्कारानें सरळ जबाब मिळाला ! आम्हालाहि जास्त जोरांत बोलता येइना ! कारण सगळाच ऑनररी आणि भिडेखातरचा कारभार ! तरीहि त्यांना रात्रीच्या नाटकाचें आमंत्रण द्यावें लागलेंच ! कारण त्यांनीं होऊनच विचारलें कीं,

"रात्रीं येऊं कां ! चार पांच स्नेही आहेत त्यांची इच्छा आहे."

आह्मीं म्हटलें 'बराय या !'

त्यावर '१० पास पाठवा तर'

असा निर्भिड इषारा आम्हाला त्यांनीं दिला.

पण इतक्याहि पराभवानें मी नाराज झालों नाहीं. मनांत वाटलें कीं, ऐत्या वेळीं थिएटरवर एकच तोबा उडणार नाहीं कशावरून ! पण बापू मात्र बराच निराश झाल्यासारखा दिसला.

संध्याकाळीं पांच वाजल्यापासून तिकिट ऑफिसच्या सगळ्या खिडक्या उघड्या करावयास सांगून, मी मॅनेजरकरतां मुद्दाम उघडण्यांत आलेल्या ऑफिसांत पान सुपारीचें तबक, त्यांत भरपूर विड्या सिगारेट ठेऊन समोरच्या छोट्या स्टुलावर रिझर्व व बाकांच चार्ट ठेवून प्रेक्षकांची मार्ग प्रतिक्षा करीत बसलों. लागलेच तर असूं द्यावे म्हणून फ्री पासचे एक दोनशें पासेसचें बुकहि ठेवलाच्या कप्यांत दडपून ठेविलें होतें आणि तीन चार फ्री पासेस बुकें, बापूजवळहि देऊन ठेविलीं होतीं.

इतक्यांत दहापांच लोकांचा एक घोळका हातांत आमच्या नटाकांची हँडबिलें घेऊन आला. ते सर्व सभ्य पोषाख केलेलच होते. मला वाटलें कीं, आतां १०।१५ खुर्च्यांचीं तिकिटें खास खपणार ! मी लुकलुक करून बापूला जवळ बोलावलें व हातांत तांबडीनिळी पेन्सिल सरसावीत त्या लोकांना नमस्कार केला. पहातो तों त्यानीं माझ्या व बापूच्या नांवच्या दोन चार चिठ्या आणल्या होत्या. त्या चिठ्या म्हणजे मी ज्या ज्या निरनिराळ्या छापखान्यांत नाटकांची हॅण्डबिले व नट-नटीवरील आमच्या कविमित्रांनीं केलेलीं पदें छापवयास दिलीं होतीं त्या त्या छापखान्याच्या मालकांनीं आपल्या स्नेहाना नाटकास सोडण्याबद्दल दिलेल्या त्या चिठ्या होत्या. चिठ्ठींत ‘ आमचीं माणसें पाठविलीं आहेत ते येथील प्रतिष्ठीत लोक

आहेत, तरी त्यांना चांगल्या म्हणजे पहिल्या दुसऱ्या रांगेंतील खुर्च्यांवर बसविण्याची कृपा करावी ' असें म्हटलें होते. नाईलाजानें त्यांस देणें भाग होतें. कारण न द्यावें तर त्रिलाचा ससेमिरा तावड-तोब मागें लागावयाचा. त्यांना पास देऊन वाटेला लाविले तोंच रेल्वे स्टेशनमास्तरकडून " पांच माणसे सोडा व स्वतः मी सहकुटुंब येणार आहे, पहिल्या रांगेंतील चार खुर्च्या ठेवा " असा निरोप त्यांच्याकडून आलेल्या पोर्टरनें आम्हाला पोहोंचविला.

थोड्याच वेळानें फौजदार साहेबांचाही निरोप " आम्ही येत आहोंत—स्वारीनिशी आहोत " असा आला. तर कलेक्टर कचेरींतील कारकुनाचा एक तांडा कचेरी सुटल्यावर म्हणजे दिवे लावण्याच्या सुमारास ' सहज आलो, ' म्हणत म्हणत मुद्दाम आला व माझें भोंवतीं " कां कसें काय आहे " असें म्हणत घोंटाळूं लागला.

" फार दिवसांत गांठभेट नाहीं " ( जणूं कांहीं माझ्या भेटीवांचून त्यांचें प्राणच चाललें होतें ) असें सवाल होऊं लागलें. त्यांना वाटेस लावणें भाग पडले —हो— फौजदारी कायदा आणि कालेक्टर कचेरींतील लोक यांच्याशीं जरा जपून असावें लागतें. हें मला बापूनें अगोदरच सांगितलें होतें. रेल्वेच्या लोक सिक् म्हणून वॅगन पंधरा पंधरा दिवस भलतीकडेच पाडून ठेवतात. कोल्हापूरच्या ऐवजी सोलापूर म्हणून बुक करतात. त्यांच्या अशा लीला नजर चुकीच्याखाली आपोआप खपल्या जातात, असें बापूनें सांगितल्यामुळें मलाहि कडक शिस्त धारण करतां येईना.

हो–ना–करतां करतां आठ वाजलें. ही वेळ म्हणजे लग्न-घाईची. कितीतरी लोकांना अगदीं याचवेळीं भेटावयाचें असतें, व त्यालाहि याचवेळीं कितीतरी लोकांना चुकवावयाचें असतें पण लोक कसले वस्ताद, तशांत मॅनेजरची भेट घेतातच !

नाटकाचें वेळीं भराभर लोक येऊं लागलें. एका पोलिसा-बरोबर २।४ मुलें व २।४ बायका आल्या. मला ऐटींत सलाम करून तो म्हणाला, "ही मामलेदार साहेबांची मंडळी त्यांच्या सोबतीला ही माझी मंडळी" मी म्हटलें ठीक ! त्यांना आंत सोडलें तों बाहेर ज्या मोठाल्या दुकानांत कॅनव्हसिंगसाठीं तिकिटें विक्रीस ठेविलीं होतीं व ज्यांना मी औपचारीक रीतीनें रात्रीं 'या' असें म्हणालो ते सर्व दुकानदार सहकुटुंब, सहपरिवार, सहगुमास्ते, सहनोकर, सहइष्टमित्र–मैत्रिणी यांना टांगे मोटारी, जे सांपडतील त्यांत घालून घेऊन, आलेले माझ्या दृष्टीस पडलें ! थिएटरच्या मॅनेजर ऑफीसवर ( तिकीट ऑफीसवर नव्हे हं ! ) तो सर्व परिवार जमलेला पाहून आत्ताच नाटक सुटलें कीं काय असाच कुणालाहि भास झाला असता.

या सर्व लोकांना कसेतरी आंत कोंबले. त्यांतले कांहींजण पुढची खुर्ची मिळाली नाहीं म्हणून नाराज झालें होतें म्हणे ! असो ! थोडी स्थिरस्थावर होतें न होतें तोंच

एंटरटेनमेंट टक्सचे लोक–ते तर काय वरजांवईच–नंतर पोलीस ऑफीसांतील क्लार्क, त्यानंतर नगराध्यक्षापासून तों चीफ

ऑफीसरासह सर्व नगरसभेचा नोकर वर्ग निरनिराळ्या कारणांनीं येऊन बसला.

सर्वांत गंमत तर पुढेंच झाली. ज्या चौकांत आम्ही भला मोठा बोर्ड लाविला होता त्या बिल्डिंगमधील दहा बारा माणसें व एक अप् टू डेट पोषाख केलेले गृहस्थ असा, एक तांडा माझ्यापुढें येऊन उभा राहिला. त्यांतल्या एका म्होरक्यानें माझ्याजवळ १२ पासेसची मागणी केली.

मी आश्चर्य चकीतच झालों ! मी म्हटलें " कशा करतां बुवा ? " तोंच एकेकांची भेंडोळीं सुटूं लागलीं.

" अरे साला, हमारा तो धंदा बिलकूल बैठ गया " त्या बिल्डिंगमधील मारवाडी म्हणाला. ' हमकू माडीका पास होना ! '

" आम्हाला वाटलं तुम्ही गरीब असाल, म्हणून चार पैसे तुम्हांला मिळूं द्या, आम्ही काय केव्हांहि मिळवूं ! पण तुम्ही तर बस्तादर दिसतां ! तुमच्या बोर्डामुळें माझी पाटी झांकून गेली, आणि त्यामुळें गिऱ्हाईक नाहीं, आज चार दिवस झाले. सारे वस्तरे गंजून पडण्याच्या बेतांत आले, तें कांहीं नाहीं. आपल्याला बुवा दोन माडीचे, एक स्त्रियांचा असे तीन पासेस पाहिजेत. " त्याच बिल्डिंगमधील ढंकन हेअर कटींग सलूनवाला म्हणाला.

" आमच्या ऑफिसच्या पाटीवर तुमची पाटी लागते याचा काय अर्थ ! एकांनीं पाटी लावली असतां तिच्यावर दुसऱ्यांनीं जाणून बुजून पाटी लावावी म्हणजे पहिल्याच्या धंद्यांवर पाणी आणण्यासारखें आहे, असें नाहीं आपल्याला वाटत ! हा गुन्हा

आहे ! आपापसांत हा वाद मिटवीत असाल तर उपाय एकच कीं, एक फॅमिली सीझन पास तुम्ही आम्हाला दिला पाहिजे आणि आम्हाला सन्मानानें वागविलें पाहिजे, " सॉलिसिटर म्हणाले.

असें एक का दोन त्या बिल्डिंगमधले धोबी, रंगारी, कापड दुकानदार इत्यादी लोकांनीं दमदाटीनें पास मागण्यास सुरुवात केली. मी विचार केला कीं, पहिल्याच खेळाचे दिवशीं लोकांशीं भांडण तंटा करून कंपनी बद्दलचा बभ्रा होऊं नये, म्हणून मुकाट्यानें त्यांच्या इच्छेप्रमाणें त्या त्या जागेवर नेऊन बसविलें.

त्यांना बसवून मी बाहेर आलो तों एक पानपट्टीवाला छोकरा माझ्यापुढें एक पट्टी धरून म्हणाला साहेब हें घ्या, बरासीवर बसतो. तो माझ्या उत्तराची वाट न पहातां तडक माडीच्या पायऱ्या चढूं लागला. मी त्याचेकडेच कांहीं वेळ पहात राहिलों.

इतक्यांत गांवांतील प्रतिष्ठित गुंड, म्यु. कौन्सिलर, देशभक्त, डि. कोर्टांतील कारकुनापासून तों बेंच मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांतील पट्टेवाल्यासह सर्व लोक, आम्ही ज्या मिरवणुकी काढल्या होत्या त्यांतील मोटारड्रायव्हर, बत्तीवाले, गाणारीं मुलें. पाऊक सह, हे सर्व आणि कंपनींतील नटांच्या चहा कॉफीवरून अल्पावधींत झालेल्या ओळखीची मंडळी, मुलें बाळें, इतकेच नव्हे तर त्यांना शिकविणारें मास्तर, घरें देणारे त्यांच्या ओळखीचे लोक, थिएटरवाल्याबरोबर नेहमीं हिंडणारें त्यांचे दोस्त, इलेक्ट्रिक कंपनीवाले वगैरे लोकांनीं तर थिएटर चिक्कार भरुन गेलें. इतके कीं, मुंगीलाहि रीघ नव्हती. अखेर बाहेर बोर्ड लावावा लागला कीं

" फुकट्यांच्या सुळसुळाटामुळें कोणत्याहि दराचीं तिकिटें शिल्लक नाहींत. " परंतु अगोदरच पास घेऊन गेलेल्या लोकांची व्यवस्था करतां करतां माझ्या आणि बापूच्या नाकी नऊ आले. अखेर जादा खुर्च्या टाकून सर्वांची सोय केली. पहातो तों पीटपासून खुर्च्यापर्यंत एकजात थिएटर फुल्ल भरलेलें ! खेळ सुरू झाला तेव्हां कुठें लोकांची रीघ कमी झाली. मी तर प्रेक्षकांची व्यवस्था करतां करतां घामाघुम होऊन गेलों असल्यामुळें नाटक सुरू झाल्यावर मी हुश करून जवळच्या खुर्चीवर आंग टाकलें.

कांहीं वेळानें बापू व मी गल्ला मोजूं लागलों तों फक्त १३ रुपये १३ आणेच भरला.

इतकें होईपर्यंत एक अंक झाला होता व तिकीटें काढून आलेले लोक जे जादा खुर्चीवर बसले होते, ते बाहेर पडतांना आपापसांत ह्मणाले " काय हौस भरलें आहे हो ! कंपनीवाल्यांची लाट आहे बुवा, कांहीं नाहीं ह्मटलं तरी दोन हजाराला मरण नाहीं " हें शब्द ऐकून मी तेथील खुर्चीवर मट्कन् बसलो.

## पुष्प ४ थें

# अक्षय शल्य

लेखकः—
**राजाराम विठ्ठल जोशी.**

धाड् धाड् धाड्

वेगावती वायुगतीनें समुद्राचे पृष्ठावर स्वैर संचार करीत होती. मधेंच हेलकावत होती. आजूबाजूस पर्वतप्राय लाटा उंच उसळत होत्या, क्षणांत यावी आणि पुन्हा ओसरावी. एकीमागून दुसरी. मागची पुढच्याशीं स्पर्धा करीत होती. पण वेगावती मात्र निश्चिंतपणें लाटा तोडीतच होती. वर अनंत अंबरांत चंद्रमा हंसत होता, सागरांतील लाटा कितीही उत्थान झाल्या तरी चंद्रमापर्यंत पोंचतात कां ?

गार वारा अंगाशीं झोंबी खेळत होता. आजूबाजूस असलेले प्रवासी झोपेंतही पांघरुणें वर ओढीत होते. पण माझा मात्र डोळ्यास डोळा लागत नव्हता, कसा लागावा ?

' लाटा उसळत होत्या '

' लाटा फोंफावत होत्या '

' पुन्हा ओसरत होत्या '

आणि धाड् धाड् वेगावती अंतर तोडीतच होती.

माझ्या आस्तित्वांतही लाटा आपटत होत्या. उंच उसळी येत होती.

माझें कसें होणार ?

पण दुसऱ्या क्षणीच बाबांची स्मृती होई. माझे बाबा आहेत. क्षणांत लाटेचा भर ओसरल्यासारखा वाटे. मी कुठें जाणार !

आणि बाबांच दुखण्यांत काय होणार ! दोनच दोन विचारांच्या मालिका माझ्या अस्तित्वाचें भोंवती वायुगतीनें भ्रमण करीत होत्या. आणि—

बाबांच दुखण्यांत कमिजास्त झालं तर–र–रा–हा विचार डोकावूं लागला कीं धरणी दुभंग झाल्यासारखें वाटें. आणि मग माझं कसं होणार हा प्रश्न माझा मीच. मला विचारला कीं उरांत कसं धस्स होई !

धाड्–धाड्–धाड्.

वेगावती मार्ग क्रमीतच होती. बावरलेलें मन दुःखाच्या नुसत्या कल्पनेंतही समभागी धुंडीत असतं. माझे चिंतेंत वेगावती समभागी होऊं शकेल कां ? अस्पष्ट लाट, मनाला चाटून गेली. तसं पाहिलं तर वेगावतीही लाटांतूनच हेलकावे खात आपला मार्ग आक्रमीत होती--माझें ही त्याप्रमाणेंच नव्हतें कां ? छे ! पण वेगावतीला कर्णधार आहे. वेगावतीचा कर्णधार ( तिच्या साथी साथ ) तिला लाटांतून तरवून नेत होता. कर्णधाराशिवाय प्रक्षुब्ध सागरांत वेगावती एक लाटही तोडूं शकली नसती, आणि माझी जीवितनौका मात्र ! तिचा कर्णधार कोण ?

बाबा—

छे ! पण ते आतां वर्ष सहामहिन्यांचें छत्र होतें. उद्विग्न मन आसरा धुंडीत होतें. पुन्हां वाटलं माझा कर्णधार

आई—

विभ्रम मनाला समाधानाचा वास लागला. पण जीव सुखांत स्थिरावेना अंतःकरणांत खोल कुठतरी खुपल्या बोंचल्यासारखं वाटूं लागलं. बेभान झालेलं मन आई अगर बाबा दोघांसही कर्णधार म्हणून घेण्यास तयार होईना. असं तरी किती वेळ चालाव ?

घण्-घण्-घण्-खलाशानें घंटा दिली सर्वत्र बोटीवर हालचाल सुरूं झाली. बिस्तारे बांधण्याची एकच धांदल सुरूं झाली. मींही हळूच बाबांना व आईला उठविले. बोजे बांधून आम्हीही तयार झालों. वेंगुर्ला बंदर आलें होतें. दूर वरून येणारे पडाव सुळ्-सुटक करीत माशासारखे जवळ आलें. आम्ही किनाऱ्यावर आलों. वेगावतींत नवीन प्रवासी भरले. मोर्चा फिरवून ती दृष्टीपथांतून दूर गेली—दिसेनाशी झाली.

आज सकाळींच आम्ही फिरावयास निघालों होतों. किरणें व समुद्र किनाऱ्याची हवा हींच क्षयरोग्यांना कांहीं दिवस जगवते, निदान डॉक्टरांचा तसा बाबांना सल्ला होता.

आम्ही लांबवर आलों होतों. टेकडीवरची वनश्री अपूर्व शोभा देत होती. मंद वायु मंजुळ वहात होता. बाबा मात्र स्तब्ध होते, आणि म्हणूनच माझा आनंद द्विगुणित होत नव्हता. मला पुन्हा पुन्हा विषण्ण वाटे.

मंद मंद वायु सुटत
मदना हा सहाय्य करित
परि मी येथें येकटी.

कुणा भाग्यवंत कवीला स्त्री जीवनाची ही कला समजली असेल तें न कळें पण मला मात्र अगदीं तसा अनुभव होता होता आणि पुन्हां पुन्हां वाटे मी शेवटपर्यंत एकटीच का वहात जाणार आहे?

वर आम्ही जरा पुढें गेलों. कुठें तरी पुटपुटल्याचा भास झाला. मी आजूबाजूस नजर केली. समोर पहिलं तर भगवान् सहस्त्ररश्मि उदयाचलीं आला होता. आणि अगदीं त्याचेच कडे तोंड करुन एक तरुण उभा होता. माझा विश्वासच बसेना माझ्या डोळ्यांवर मी हातानें डोळे साफ करून पुन्हा पाहिलें.

किती रम्य व आशादायि दृष्यते होते तें.

"उदयाचलीं भानु, आणि
सूर्याभिमुख धेनु."

साहाय्याच वाळवंटांतील तुटक हिरवळ नव्हे मोहक मृगजळ.

आम्ही देवळाचें पायथ्याशीं आलों बाबा पायथ्याशी बसले. मीहि थोड्या अंतरावर एका दगडी शीळेवर टेकलें. बाबा जवळ होते पण—

तरुण मात्र दूरच होता, माझ्या पासून लांबच होता, वेडी आशा डोकावू लागली ते इकडे येतील का? टेलीपथीचा अनुभव कांहीं खोटा नसतो. युवक देवळाशीं आला.

बाबांनींच प्रथम पृच्छा केली

काय नाव आपलें ?

" विनायक " त्यांनीं स्मित करून सांगितलें आणि ते बोलत असतांच मला आरक्त ओष्ठांतून स्फटिकाची रांग दिसली व वर्तुळाकार गोल गालावर बारीक खळी पडलेली पाहिला. आणि आपलं नांव काय ? त्यांनीं पृच्छा केली. प्रश्न करतां करतांच त्यांनीं आपले नेत्र मजकडे लावलें. मुक्या शब्दांनीं व स्निग्ध नेत्रांनींच माझं गुपित बाहेर फोडलं.

बाबांनीं स्वतःच्या क्षयरोगाची समग्र हकीगत त्यांना कळविली. सहानुभूति व अनुकंपा यांचे खेळ मी त्यांचे मुद्रेवर पाहिले. ते बाबांची कथा आस्थेनें ऐकात होते पण माझे नेत्र मात्र त्यांचेवर फिर फिरून जात होतें. चोरून पहाण्याचा मोह अनावार होत होता. सुंदर मोहक वस्तूचा मोह व अभिलाष होऊं नये कां ?

बाबा म्हणाले ही आमची मंदा.

त्यांनीं पुन्हां स्मित केलें आणि याच वेळीं एक सोनेरी किरण त्यांचे मुखावर पडला.

ते निघून गेले. पण मनोहर मूर्तिचा ठसा हृदयांत पूर्ण ठसला होता.

*　　*　　*　　*

दिवस भराभर जात होते. पूर्वीचा संकोच आतां कमी होऊन मनमोकळेपणा बराच वाढत होता. विनायकांच्या सहवासांत किती वेळ गेला याचें भानही उरत नसे मला. पण ते दुरावले कीं, वेळ

जातां जात नसे. सहावासाचा आनंद व दुरावण्याचें दुःख दर दिवशीं आलटून पालटून मला अनुभवावें लागे. नित्याप्रमाणें आम्ही कॅरम खेळत होतो. पहिले दोन बोर्डस् मीच घेतलें होतें. पण या खेपेस प्रथमच त्यांनीं क्वीन पळविली.

" Queen is mine " ते आनंदानें उद्गारलें.

You have won Her मीही पुस्ती दिली व छद्मी नजरेनें त्यांचेकडे पाहिलें.

हं म्हणत त्यांनीही आपले नेत्र मजवर रोखलें. मला वाटलं कोणी तरी मजवर हुकमत गाजवीत आहे. चांदण्यांत चांदणी मिळाली. नयनांत नयन मिळालें किती, एक क्षणच; पण तेवढ्यांतच आत्म्याला अंतरदृष्टी आली. जीवाला जीवाची खूण पटली.

* * * *

कोणास ठाऊक ते दिवसांपासून त्याचें वर्तनांत व वृत्तींतही फरक पडूं लागला. मला वाटतें अर्जुनाला श्रीकृष्णानें दिव्य चक्षु दिल्यासारखं झालं होतं.

एके दिवशीं आमचा वाद खूप रंगांत आला होता. वादविवाद करण्याकडे यांची फारशी प्रवृत्ती नसे. पण मला मात्र वाटे कीं त्यांच्याशीं सर्व प्रचलित व विषेशतः स्त्री--पुरुष विवाह या विषयांची चर्चा करावी. व त्यांचेजवळ स्त्री स्वातंत्र्य व समता यांचा पुरस्कार करावा.

असाच एके दिवशीं आमचा आमोद प्रमोद सुरू होता. मी म्हटलें.

आधुनिक युगांत स्त्री आणि पुरुष यांचे हक्क समानतेचे पाहिजेत.

जग आणि युग सोडून दे, पण नात्विक व व्यवहारिक दृष्ट्या स्त्री नि पुरुष यांचे हक्क समान व सम असणें शक्य दिसतें का?

त्यानीं पृच्छा केली।

मी उत्तर केलें " अलबत् "

ते मिस्किलपणें हंसले "कुठल्याही सामाजिक प्रश्नाविषयीं मी उदासीनच असतो " ते म्हणाले. व्यक्तिगत प्रश्नांना सामाजिक व सामुदायिक स्वरूप देऊन त्याचा बाऊ करण्यापेक्षां त्यांचें निराकरण व्यक्तीगतच व्हावें असें मला वाटते. एकाच घरट्यांत राहूं इच्छिणाऱ्या दोन पक्ष्यांनीं इतर घरट्यांचे प्रश्न हें आपलेच समजून ते डोईवर चढविण्यापूर्वी आपलें घरट्यांचा च विचार करणें श्रेयस्कर. व्यक्ति व्यक्तींनीं आपआपला भार उचलला म्हणजे सामुदायिक वा सामाजिक प्रश्नच शिल्लक उरणार नाहींत. समजून नि सलोख्यानें व्यवहार सुरळीत होतात असा जागतिक अनुभव आहे ते म्हणाले.

माझ्या विचारांना नवीनच कोलांटी मिळाली. क्रांती ऐवजी उत्क्रांती बरी का? असा माझ्या पुढें प्रश्न निर्माण झाला. विषयांतर करुन मी म्हणालें. तरीच तुम्ही उद्यां कसें वागाल याची भीति नेहमीं वाटत असते.

ते सहज म्हणाले " कोणाशीं " मीं स्वतः भोवतींच नुसती मान ओंवाळली.

माझा मनोदय मी स्पष्ट केला होता.

ते एक पदवीधर होते. त्यांच्या एकंदर रुबाबावरून त्यांनी आपल्या आरोग्याची रत्तिभरही हेळसांड केल्याचें दिसत नव्हतें.

असेच एके दिवशीं ते आमचेकडे आले "हल्लीं शाळा कॉलेजांतून मुलामुलींची वैद्यकीय तपासणी होते तुला माहीत आहे" त्यांनीं पृच्छा केली.

—मी मानेनेंच नकार दर्शविला व " निदान आमचे शाळेंतून तरी तसा प्रघात नाहीं " मी उत्तरलें.

" मग मला तुमची वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी लागेल " ते म्हणाले आणि " मीहि आपली तपासणी करवून घेईन " मी प्रत्युतर केलें.

क्षणार्धांत त्यांचें मुखचंद्रावर काळे ढग पसरल्याचें मी पाहिलें. त्यांचे पुरुषी वर्चस्वाला धक्का बसल्यासारखें वाटलें. आणि मला मात्र थोडें समाधान झालें.

तेव्हांपासून पंधरा दिवस लोटले ते आमचेकडे फिरकले नाहींत. कधीं दिसले तर बेफिकीर वृत्तीनें पुढें निघून जात. तुटक तुटक वागत. मला ही स्थित्यंतरें कळत होतीं. पण आतां फार उशीर झाला होता. एका पुरुषास वाग्युद्धांत घायाळ केल्याचें समाधान मला फार वेळ लाभलें नाहीं.

समाधानाची जागा हुरहूर आणि घोर यानीं पटकविली.

झालेल्या गोष्टीचा मी रोज विचार करी. वेडें मन रोज त्यांची आतुरतेनें अपेक्षा करी पण सर्व आशा विफल झाल्या. चवरे

दिवस ते आमचेकडे फिरकले नाहींत. बाबांना व आईला नवल वाटले. त्यांनीं मजकडे चौकशी केली.

सर्व हकीगत मी मनमोकळेपणें त्यानां कळविली.

बाबा व आई दोघानाहीं ही गोष्ट फारशी आवडली नाहीं.

थोड्या वेळानें बाबा म्हणाले मंदा, किती अल्लड व उतावळी तूं. **संसार म्हणजे कांहीं एकमेकांनीं एकमेकाविरुद्ध व आपलें हक्क बजावून घेण्याचें कोर्ट नव्हें किंवा स्त्री व पुरुष यांनीं स्वतःचे व्यक्तित्व ऊगाळण्याची सहाण नव्हें. संसारांत स्त्रियानां आपल्याकडे पडती बाजू व लहानपणा घेऊन पुरुषाचें व्यक्तित्व उजळण्याची एक सुवर्ण संधी मिळते.** आणि याच वेळीं मला विनूचे शब्द आठवले.

* * * *

एकत्र येऊं इच्छिणाऱ्या दोन व्यक्तींनीं समजुतीनें व सलोख्यानें वागलें म्हणजे भागतें.


कुणाचाही बेबनाव झाल्याची बातमी किती लवकर पसरते याचा अनुभव मला आला. आमच्या बेबनावाची बातमी सावंत वेंगुर्ल्यानच काय पण मुंबईसही पोंचली होती. दोन महिन्यांनीं आमचेकडे मावशी आली तिनेंही मला याबद्दल विचारणा केली आणि तेव्हां पासून मुलगी पसंत नाहीं हीं उत्तरें बाबांना व मला ऐकण्याचा सरावच होऊन गेला.

अंदरकी बात अशी कीं प्रत्येक वर विचार करतो कीं " विनूनें मंदेला वैद्यकीय तपासणीची अट कां घातली ? "

मला मात्र अजून समजत नाहीं कीं, संसारांत पड व लहानपणा आपणाकडे घेऊन पुरुषांचे व्यक्तित्व **उजळणें** बरें कां ;

संसारांत पुरुषांशीं समानतेचे हक्काकरितां झगडून स्वतःचे व्यक्तित्व **उगाळणें** बरें.

आणि एकच एक शल्य वाचतें तें हें कीं:—कुठल्याहि कुटुंबपद्धतींत स्त्री आणि पुरुष यांचे हक्क समान असूं शकणार ? नाहींत.



## पुष्प ५ वें

# "म्हणे—अष्टपुत्रा भव"— कशाला?

— लेखक —
दत्तात्रय बळवंत लेले
बी. ए. एल्. एल्. बी. वकील.

हजारों वर्षे झालीं, तरी अजूनही ह्मणे, आपला प्रियकर जवळ येत आहे हें पाहून लाजते, नि आरक्त होते उषा देवी! मग आपल्या विवाहास अद्याप पांच वर्षेही झाली नाहींत, तोंच तुझी ती आरक्त लज्जा कशी पार पळून गेली गं कोणीकडे? मी यायचा ह्मणून मी येण्यापूर्वीं बराच वेळ, बरेच तास सारखी वाट पहात बसणारी—अगदीं चातकासारखी वाट पहात बसणारी—छे, छे चातकासारखी वाट पहाणें, ही झाली आतां शिळी नि आपण स्वतः न पाहिलेली कविकल्पना— अगदीं प्रियकराच्या सान्निध्याची पिपासा लागलेल्या प्रियकरणी सारखी वाट पहात असेच बरें दिसेल बोलणें ज्यास्त! नव्हे नव्हे खरेंही आहे तें अधिक! मग त्यावेळीं वाट पाहून डोळे शिणवून घेणारी व मी आंगणांत पाऊल टाकतांच एकदांच खुद्‌कन् हंसून, चोरून पाहून, जणूं कांहीं आपण त्या गांवच्याच नाहींत, असें दर्शवून

पळून जाणारी आणि एकाच कटाक्षांत स्वर्गसुख, स्वर्गसुखाचा अनुभव आणून देणारी ना तूं! मग आताशाच कां ग असें? हजारों वर्षे झाली तरी उषादेवी नेहमीं आपली फुललेली आणि खुललेली, सदासुखी, सदा आनंदी, अनंत वर्षे झाली तरी संध्यादेवी ही अशीच प्रियकराच्या स्पर्शानें प्रत्येक दिवशीं प्रफुल्लित होऊन चुंबनाचा गुलाबी रंग उधळींत प्रियकराशीं आनंदाचे व लपंडावाचे उल्हासी पण शांत खेळ खेळण्यांत दंग! अनंत ब्रह्मांडें लोटलीं तरी पण रजनीनाथ दिसला कीं रजनी लागलीच जिकडे तिकडे हास्यांचे धवल तुषार उधळावयाला आणि अंतःकरण अतिशय उल्हासित झाल्यामुळें आनंदोत्सव प्रसंगीं आपल्या भरल्या मुठींनीं नव्हें ओंजळींनीं आकाश प्रांगणांत लक्षावधी अनंत रम्य सुंदर तेजःपुंज हिरे माणके उधळायला! जणूं काय रजनीला अतिशय आनंद झाला आहे म्हणून त्या उत्सवाचे निमित्तानें आकाश प्रांगणांत किरणांच्या कोणाही वाटसरूनें खुशाल लुटावींत हीं रत्नें! आणि आपणही मिसळावें या तिच्या आनंद लहरींत! पृथ्वीवरच्या जडजीवांना मोहून टाकतो हा रजनीचा, उषेचा व संध्येचा आनंद!

आणि मग प्रिये, तुझाच आनंद कां इतक्या लौकर मावळला? तुझ्या अंगची कांती, तुझें रूपलावण्य, तुझें स्वरमाधुर्य, तुझ्या डोळ्यांतील विलक्षण चमक सर्वच कशी लोपली इतक्या लौकर?

असें एक ना दोन हजारों प्रश्न मला आज सकाळीं विचारणं झालं तिकडून! मी काय उत्तरें देऊं या सर्वांची, माझं सौंदर्य

नष्ट झालं ! कोण म्हणतं ? असं ! तिकडे असं कां वाटावयास लागलं ? उषेचं, संध्येचं रजनीचं सौंदर्य अजूनही ताजंतवानं आहे म्हणे. अजूनही पूर्वी सारख्याच आनंदमयी आहेत त्या. सौंदर्याची व्याख्या ' क्षणे क्षणे यत् नवतामुपैती अशी केली आहे म्हणे कवींनीं आणि त्या कसोटीला म्हणे मी उतरत नाहीं अलीकडे ! ह्मणून नाराज झाले आहेत नाथ माझ्यावर ! पुर्वीसारखी मी हांसत नाहीं. लाजत नाहीं, खुलत नाहीं, ह्मणें. अरसिक कां झाले आहे मी ? आणि नाथांनीं मला याचं कारण विचारलं—नव्हे याचीं कारणें विचारली मला. त्यांना नाहीं समजत याची कारणें ? कारणे किती पाहिजेत ? एक, दोन, तीन, चार पांच, इतकीच पुरेत. आणखी हवीत ? देते बरं कां पाहिजे असली तर ! पण जरा थांबा हं.

लहान होते अगदीं मी ! भातुकलीचा खेळ चालला होता आमचा, त्यातच लग्न काढल होतं माझ्या भाऊलीचं, शेजारच्या चिंगीच्या घरचा होता नवरा मुलगा. लग्नाची मारे धूम गर्दी चालली होती. आमच्या मध्यें मिसळला आमचा न.ना, आणि त्यानीं त्यांच्या पुस्तकांतल्या कविता ह्मणून, केलन् मंगळाष्टकांचें काम ! लग्न लागलें एकदांच मोठ्या थाटानं. पुढं नवरा नवरीना आशिर्वाद द्यायची आली पाळी नानावर, मी लहानच होते, पण पुष्कळ वेळां माझ्या आईला आजोबा आशिर्वाद देत असत, ती त्यांना नमस्कार करी, तेव्हां ! तसेंच बरेच वेळां दुसऱ्याही लग्न झालेल्या मुलींना नमस्कार करतांना व ज्यावेळीं वडील माणसांनीं

‘अष्टपुत्रा’ असं कायससं म्हटलेलं आठवतं मला. त्यावेळीं मी नानाला म्हटलं तसेंच तूं म्हण हं. “ आतां ही बघ बाहुली तुला नमस्कार करते आहे. ” नाना तसं म्हणावयास कांहीं केल्या कबूल होईना. मग कां कुणाला ठाऊक !

त्याला काय तो शब्द येत नव्हता व आपणास येत नाहीं असं कबूल केलं तर आपली फजीती होईल ! म्हणून कीं काय कोण जाणें ! पण मला मात्र अगदीं तेंच शब्द, त्यानें उच्चारावयास पाहिजे होते. तो कांहीं ऐकेना, मी हट्ट धरला. अखेर प्रकरण चिरडीवर गेलं. लहानच होते मी, रागावयाला काय उशीर आणि एकदम वस्त्रालंकारांनीं नटविलेल्या त्या माझ्या बाहुलीला, नववधूला, एका क्षणांत अगदीं पूर्ण लंकेची पार्वती करून टाकली व दिली फेकून, खेळाचा निकाल तर झालाच म्हणा ताबडतोब. मग त्या वेळीं या सुखराशीवर लोळणाऱ्या बाहुलीला एकदम दुःखाच्या खोल गर्तेत लोटल्याबद्दल किती वाईट वाटलं असेल. असा विचार नाहीं आला माझ्या मनांत.

[ ईश्वर सुद्धां असाच असेल कां ? बालकांच्या सारखा चंचल नि कोपिष्ट ! तो अशाच रितीनें श्रीमंताचा क्षणार्धात गरीब व अत्यंत सुखी माणसाला क्षणार्धांत अत्यंत दुःखी करून सोडीत असेल कां ? कांहीं तरी वाटत असेल कां त्याच्या मनाला ? बाहुली सजीव असती तर ती सुद्धां असेंच म्हणाली नसती कां ? पण मला काय तिच्या भावनांची किंमत कळणार, असेच असेल कां ईश्वराचें नातें. ]

नंतर कांहीं वर्षे गेलीं. मला ' अष्टपुत्रा सौभाग्यवती भव ' याचा अर्थ कळूं लागला; आवडुं लागला हा आशीर्वाद मला, आठ चांगले मुलगे होऊं देत तुला म्हणे ! किती छान तो आशीर्वाद. माझ्या एका मैत्रिणीचं लग्न झालं, जोडप्यांनीं नमस्कार केलान माझ्या आईला व बाबांना. त्यांनीं जेव्हां तो आशिर्वाद दिला— किती आनंद दिसत होता त्यावेळीं तिच्या चेहऱ्यावर ? मग तो आनंद प्रथमच जोडप्यांनीं नमस्कार केला म्हणून होता, कीं काय, कोण जाणें. त्याच वेळीं जर मला खरं कळलं असतं, कीं आतां माझी अशी अवस्था होईल तर ! पण न दिसणाऱ्या अशा अरुंद कपाळपट्टींत लिहून ठेवलं आहे ना विधात्यानं सगळं.

किती आनंदाचे दिवस गेले ते. नुसता उन्मादकारी आनंद होता सगळीकडे भरलेला. नुकतेंच लग्न झालें होतें माझें. सर्व वडील माणसांना येतां जातां नमस्कार व तोही वांकून त्रिवार करावा लागे मला. सासरीं आल्यावर तर काय माझे मामंजी ही पहा आमची नवी सून, म्हणून त्यांच्या नात्याच्या व ओळखीच्या प्रतिष्ठित गृहस्थांना दाखवीत व प्रत्येकाला वांकून त्रिवार नमस्कार करावा लागे मला. प्रत्येकांनीं हांसून " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव " असा दणदणित आशिर्वाद द्यावा मला. लग्न झाल्या पासून एकसारखा " अष्टपुत्रा सौभाग्यवती भव " अशाच आशिर्वादाचा मारा झाला माझ्यावर सगळीकडून. मला वाटे प्रत्येक जण हाच कां आशिर्वाद देतात मला. पण मलाहि तोच आशिर्वाद फारच आवडत असेना. खूष होऊन जाई मी अगदीं

प्रत्येक वेळीं. नुसत्या गुदगुल्या होत मला. आणि नमस्कार करणें झाल्यावर, मग तिकडचं नांव घ्यायचा मला केलेला आग्रह " मी नाहीं जा " असं म्हणून लटकाच राग आणून, अखेर अगदीं मनापासून मी तें नांव घेत असें. काय मजा वाटे मला तेव्हां. निरुपम सुख अनुभवित होतें मी.

फक्त दारुचीच कांहीं निशा चढत नाहीं माणसाच्य अंगावर. नवीन लग्न झाल्यावर तारुण्याची ही निशा चढतेच ना प्रत्येकाला. त्या अवस्थेंत सगळ्या जगाचा विसर पडतो. बेफामच अवस्था असते ती. ' संसार वाईट ' असं लोक कां म्हणतात याचचं कोडं पडतं. नव्हे इतका वेळ विचार करायला असतो कुठं म्हणा. पतीच्या नेत्रकटाक्षाबरोबर व हालचालीबरोबर आनंदाच्या उर्मी उठत असतात हृदयांत. मन कसं बहिरून जातं अगदीं. वृत्ती कशी निरामय आनंदित बनत असतें. नुसतं प्रेम व सौख्यच भरलं आहे जगांत, असा भास, नव्हे खात्री होते मनाची. परस्परांच्या शरीराचा परस्परांस स्पर्श--त्यांतून तो प्रथम स्पर्श ! काय वर्णन करावं ? त्या वेळच्या आनंदाचा सर्व देहावर काटेरी शृंगारसाज चढतो नुसता. आणि त्यानंतर पुढें दररोज वाढत जाणरा परिचय सहवास, मीलन, एकापेक्षां एकेक सुखकर व रम्य अनुभव—पण जाऊं देत, या अनुभवांचेंच काय मी वर्णन करीत बसलें आहे. कारण कितीही लिहीलं तरी त्याचं वर्णन अखेरीस अपुरंच पडणार अगदीं !

' तेही नो दिवसा गताः ' असें वर्णन उत्तर राम चरित्रांत खुद्द श्रीराम प्रभूनीं केलं आहे ना ? त्याचा अनुभव आला मला.

पुढें यथाकाल मला प्रथम पुत्ररत्न झालं. पुत्रोत्सवाचा आनंद असतो ह्मणतात. पुत्र जन्म ही एक महत्भाग्याची गोष्ट समजतात ह्मणे. माझा अनुभव मात्र उलटा आहे. मी सुखरूप पार पडले, म्हणून तिकडे फक्त आनंद झाला. पण प्रत्येक वेळीं आतां मुलगा मधें येऊं लागला. त्यामुळें गाडं बिघडत चाललं. माझा तिकडचा निकटचा सहवास तुटत चालला. मी बरीच अशक्त झाले. पहिल्याच पुत्र जन्मानं पूर्वीचं माझं गोंडस रूपही थोडं कमी झालं. तिकडनं घरी यायचं झालं, कीं मंदस्मितानं व हास्य-वदनांत स्वागत करणारी मी, त्यांना मुखदुर्बळ व नेहमीं मुलांच्या संगोपनांत गुंग होणारी दिसूं लागले. पुढें पुढें तर त्यांना जास्तच त्रास होऊं लागला या प्रत्यक्ष विरहाचा ! आणि मला म्हणजे काय सुख होतं, त्या पासून असं मुळींच नव्हे. मलाही अगदीं मनापासूनचा कंटाळा येई हें सर्व करासवरायचा. तें मूल अशक्त, रडकं व रोगी होतं. अगदीं नकोसं वाटूं लागलं मला एकंदर माझं जीवित. तिकडचाही चेहरा नेहमीं असा उदासच दिसे.

तीन महिने गेले अशाच विचित्र परिस्थितींत. घरांतील आनंद मावळला.

माझ्या शारिरीक परिस्थितीमुळें माझ्यापासून त्यांना मुळींच सुख मिळत नसे आणि तें तर त्यांना अतिशयच आवडत असें. अखेर—

माझ्या रुसण्या फुगण्याला व विनंती रडण्यालाही न दाद देतां, जें व्हावयाचं होतं तें झालंच. मी ज्या कर्माला भीत होतें, तेंच माझ्या वाट्याला आलं आणि माझ्या पहिल्या मुलाच्या पाठोपाठ त्याचा भाऊ अवघ्या अकरा महिन्यांतच पृथ्वीवर धांवत आला.

माझी प्रकृती जास्तच क्षीण बनली. हसूं तर कधींच लोपलें. स्वभाव चिडखोर बनला. तिकडे तर याची कांहींच दाद नव्हती. मला इकडे प्राणांतिक वेदना कां होईनात, पण तिकडे काय त्याचं ! त्यांना शरीरसुख हवं होतं ना ? आणि मी पडले खरी आर्य स्त्री. स्वतः कष्ट सोसूनही वेळ प्रसंगी जीव देऊनही, पतीला सुखी करावे, अशी आम्हां आर्य स्त्रियांना शिकवण ! आमच्यावर संस्कारहि असेच झालेले. तेव्हां काय ? मी बिनबोभाट हाल सोसूनही त्यांच्या इच्छेप्रमाणें वागावयाचं ठरविलं. त्यानींही कांहीं विचार ठेवावयाचा कीं नाहीं ! पण ते तरी किती महिने ठेवतील विचार ! अखेर——

' पुन्हां दुसऱ्या मुलाच्या जन्मानंतर अकराच महिन्यांनीं त्याचाच भाऊ पुन्हां अवतरला ! जवळ जवळ मेलेच मी आतां. पण पुरती मेले, नाहीं म्हणूनच वाईट वाटलं मला. वैवाहिक आयुष्यांतला आनंद तर कधींच निघून गेला. घरांतील शांततेचा, मुलांच्या रडण्यानें एकसारखा भंग होत असे. मला स्वतःला मुलें मुलीच आवडत नसत. पण झालीं, म्हणूनच त्यांचं सर्व करणं भाग पडलं. त्यांच्या खस्ता खातां खातां जीव मेटाकुटीस यायचा माझा अगदीं.

वाटे कीं, कुठं तरी पळून जाऊं. आणि या सर्व हलावर डागण्या म्हणजे—तिकडची वृत्ती—

मी इतके हाल सोसूनही, माझ्या ताकदी प्रमाणें तिकडे सुख द्यायचा प्रयत्न करीत होते. तरी त्याची जाणीव मुळींच नव्हती त्यानां. इकडें घरांत मुलें आजारी व रडकीं; त्यामुळें पुढें पुढें तर ते घरांत फार वेळ ठरत नसत पण रात्रीं मात्र नेहमीं घरांत.

इतक्यानेंच माझं कुठं नष्टचर्य संपलय म्हणा. तिसऱ्या भावाच्या पाठीवर चौथी बहीण आली लगेच धांवत वर्षाच्याच अंतरानं. आणखी एक वर्षांत पांचवा भाऊ अवतरला. या सर्व मुलांचा जन्म नको नको म्हणत असतां झाला. माझं शरीर सर्व खाऊन टाकलं या पोरांनीं.

लग्न झाल्यानंतर किती आनंदानं व सुखानं जीवन घालवावं, असें मी अनेक बेत केलें होते. तिकडचा स्वभाव माझ्या मना-सारखा नि हौशी होता. अगदीं पहिल्या वर्षांत मी म्हणेन ती वस्तु व म्हणेन त्यावेळीं, मला आणून दिली गेली. दोघांनीं मिळून सिनेमाला जावं, प्लेझर ट्रिप्स काढाव्यात, उभयतांनीं सार्वजनिक संस्थांत भाग घ्यावेत, व्याख्यानें द्यावींत, समाजकार्य करावें, लेख लिहावेत, टेनिस खेळावे, फिरायला जावे किती एक ना दोन अनंत बेत केलें होते मी. पण त्यांतला एक ही तडीस गेला नाहीं या पोरट्यांच्यामुळं. सिनेमाला, नाटकाला जावं तर बरोबर हा मेळा! आणि माझी तरी शारीरिक अवस्था काय?

एक बाळंतपण, नाहीं तर गर्भारपण, या दोन अवस्थेशिवाय तिसरी अवस्था कांहीं मला आठवत नाहीं. तिसरी अवस्थाच नसते कीं काय, असा मला भास होऊं लागला आहे.

दिवस नि रात्र पोरांच्या खस्ता खातां खातां आम्हां दोघांना जेवावयास कां, स्वस्थपणें बसून बोलावयास ही चांगली फुरसत मिळत नाहीं मग इतर गोष्टींची बातच नको ! सर्व आयुष्याचं मातेरं झालं माझ्या ! आणि हें प्रकरण पांचच मुलांनीं आटपलंय कुठं ! चांगला " अष्टपुत्राभव " असा दिला आहे ना सगळ्यांनीं आशिर्वाद ! त्या ऐवजी नुसता ' सौभाग्यवती ' भव असा आशिर्वाद दिला तर काय बिघडेल ? दर खेपेस मला या आशिर्वादाची आठवण होत असें. हा आशिर्वाद कसला, हा भयंकर शापच, आणि त्याला कोणताही उःशाप नसलेला हा शाप ! मला इतक्या वडील माणसांनीं दिला होता ना हा शाप, मग तो खोटा कसा ठरणार ?


लहानपणीं माझ्या बाहुलीला हा आशिर्वाद मिळाला नाहीं, ह्मणून काय राग आला मला नानाचा ! पण आतां असं वाटतं कीं, मलाही हा शाप नसतां मिळाला तर काय, बरं झालं असतं. या सर्व हालांतून सुटले असते मी एकदाची.

संभोग सुखाचा शाप आहे हा. क्षणिक सुखाच्या मागे अनंत काल टिकणारीं दुःखें असतातना, त्यांतलाच हा प्रकार आहे.

उगीच नुसतं लोकांना गप्पा मारायला, काय लागतं ? 'स्त्रीच्या जीवनाचं सार्थक पुत्रजन्म हें आहे.' ' गृह-

रत्नांनीं बालका: ' ह्मणे. हीं सर्व रत्नें त्यांच्या घरीं नेऊन ठेवा, नि त्यांच्या रडण्याचा नि आजारीपणाचा गोंधळ सुरू झाला, म्हणजे मग या सर्व बोजड बडबडीची व मोठमोठाल्या वाक्यांची येईल खरी कल्पना त्यांना. संभोगाचा शाप—

देवा आतां तरी सोडीव लौकर या यातनेंतून. मी तर पुन्हां कधींही, अष्टपुत्रा भव असा आशिर्वाद—नव्हे शाप पुन्हां कोणालाही देणार नाहीं. अगदीं संताप आला आहे मला त्या शद्बांचा सुद्धां. काय म्हणे "आष्टपुत्रा" कशाला ? आईचा जीव घ्यायला ? तिच्या सर्व सुखाचा निकाल करायला ?



पुष्प ६ वें

# दैवाधीन

लेखकः—

**राजाराम विठ्ठल जोशी.**

पहाटे पूर्वीचा काळोखच होता. सर्वत्र गाढ शांततेचें साम्राज्य पसरलें होतें. अनंत अंबरांत चांदण्या लुकलुकत होत्या, काळ्या रस्त्यावर पांढरी खडी काढलीना, म्हणजे रस्ता जसा खुलुन दिसतो, तद्वतच काळ्या-निळ्या आकाशावर निसर्गानें अंतरा अंतरावर पांढरी खडीच काढली होती. आकाश म्हणजे निसर्ग नि सौंदर्य यांचा केवळ आरसाच असतो. काळोखांत सुद्धां दृगोचर होणारे लांबचे लांब पसरलेले पांढरे ढग, किती नयनमनोहर दृश्य असतें तें. पण निशेच्या पोटीं सांठवलेलें सौंदर्य अनुभवणें, कितीशा भाग्यवंतांना लाभतें फारच मोजक्यांनां. तसें मोजूं लागलें तर अंतरिक्षांतील ग्रहांचें परिभ्रमण त्यांचे अंश, त्यांच्या कक्षा, रोजच्या रोज पालटणारें त्यांचें स्थान एका तारकेपेक्षां दुसरीचें चढतें तेज, या सर्व गोष्टी पाहून अनुभवून ज्यांना आनंद होणार नाहीं व

" भान हरपलें, ध्यान विनटलें "
" गेले भवभय पाश खुले "

अशी ज्यांची अवस्था होणार नाहीं असे अरसिक हृदय क्वचितच आढळेल. पण वस्तुस्थिती मात्र अगदीं वेगळी आढळते. ज्योतिषी अगर गणीति या खेरीज रात्रीच्या रात्रीं डोळ्यांत तेल घालून खगोलांचे सौंदर्योपासक दिसून येत नाहींत. आणि दुसरा मानव प्राणी म्हणजे विद्यार्थीवर्ग. परीक्षेच्या मोसमांत रात्रींचें दिवस करून, अभ्यासाचे डोंगर उचलून, डोक्यावर नव्हे तर डोक्यांत घेणारे विद्यार्थीच घ्याना. किती दुर्दैवी प्राणी हे. निद्रिस्त असतांची गोष्ट सोडून दिली, तर जागरूकपणीं तरी रात्री आका-शाकडे पहाणें होते कां यांना ? तें सोडले तरी गृहिणी व शहरां-तील मजूरवर्ग घ्या. दोन्हीही व्यक्ति पहाटें उठतात पण कामाचा उचका त्यानां तरी खगोलाचें सौंदर्य उपभोगूं कुठें देतो ? आका-शांत सौंदर्याचें खेळ चालले असले तरी मजूरांच्या मनांत गिर-ण्यांचा भोंगा भोंगावत असतो.

पृथ्वीवर शांतता होती आणि चाळीचें अंतरंगांतही हालचाल नव्हती. नित्याच्या क्रमांत दिवसा पाहिलें तर माणसांची आवक-जावक, मुलांची खेळी मेळी, हास्याचे फवारे, आरडा ओरडा ह्या गोष्टी दिसून यायच्या पण तेंच आतां ह्यांतील एकाही गोष्टीचा मागमूसही नव्हता. चाळींतील झाडून सर्व जीवमात्र निद्रासुख अनुभवीत होता. सुख नाहीं, दुःख नाहीं, मी नाहीं, नि तूं नाहीं आनंदमय झाली होती सर्व चाळीची सृष्टी. नाहीं म्हणावयाला घड्याळांतील टिक्-टिक्-टिक् चालू होती. आणि स्त्रिपुरुषांचे निर्भय श्वासोश्वास घड्याळाला साथ देत होते. क्वचित प्रसंगीं

कें-ऐ-ऐं करीत एखादें अर्भक शांततेचा भंग करीत असें पण लगेच मातेचा मृदुल, हात अंगावर पडला नि तोंडानें " निजा हं आतां " असा इशारा मिळाला कीं बालकाची समजूत झाल्याची दिसत होती.

घण्—घण्—घण्—घण्—घण्.

चाळीच्या मधल्या खोलींत आवाज झाला. निःशब्द ब्रह्मांत ॐकाराचा निनाद घुमूं लागला. आणि खोलींत खळबळ झाली. माधवनें अंगावरील पांघरूण दूर झुगारून दिलें. खोलींत दिवा लावला. घटकाभरांत " खुळखुळ खुळखुळ " माधवनें चूळ भरून टाकली. प्रातर्विधी उरकून माधवनें पुस्तक उघडलें.

" समरासि—सज्ज झाला—आ.

सत्याग्रही रिवाला. "

या थाटांत माधवनें बैठक तर मारली. आणि माधव ग्रंथांत शिरला. दिव्यानें दिवा लावावा तसेंच झालें. समोरच्या खोलींतही प्रकाश दिसला माधवचें लक्ष नकळत तिकडें गेलें. अंधेरांत उजेड दिसला ह्मणजे असेंच व्हायचें. उठली वाटतं. माधव स्वतः-शीच पुटपुटला. पण लगेच " उंऽहः " करीत त्यानें आपली नजर पुस्तकाकडे वळविली आणि उंचावलेली मान खालीं केली.

पांचच मिनिटें झाली नसतील तोंच.

सा—रि—ग्—म्—प—ध् नी—सा

सा—नि—ध्—प—म्—ग्—रि—सा.

पेटीवर सुरावट सुरुं झाली. मालती पेटी वाजवीत होती.

भैरवीची सुरावट छान वाजूं लागली. आरोह—अवरोह नि ताना झडूं लागल्या. आणि थोड्याच वेळांत यंत्राला मनुष्याची जोड मिळाली. पेटीच्या संगीतांत मालतीचे आलाप मिसळूं लागले.

" कशि येऽइना करुणा मोहना
कधिं येशिल वद यदुनंदना "

मालु गात होती.

पहांटची वेळ, प्रसन्न चित्त आणि मालुचा गोड गळा. त्रिवेणी संगमच घडला होता.

" करपल्या मनाच्या भाऽआऽवना
आसरा नसे या गो--ओ--धना
काधिं येशिल वद यदुनंदना "

मालतीचा स्वर उंचावला होता. मार्दवांत आर्जव मिसळलेले होते. कुणाला तरी ती वजावून वजावून सांगत होती कीं, करपल्या मनाच्या भावना. आसरा—नसे या—गोध—ना आणि कुणाला तरी ती आळवीत होती.

" काशि येऽइना करुणा मोहना
कधिं येशिल वद यदुनंदना "

हृदयांतील भाव पदाबरोबर उसळत होते कां, मालतीनें त्या पदाची योजना मुद्दामच केली होती कोण जाणे ? लेखक आणि कवी मनकवडे जरी असले, तरी शेवटीं स्त्रीहृदय अगम्य ह्मणूनच ते शरणांगत होतात.

पद रंगलें होतें—रंगत होतें. कारण—कारण मालतीचें हृदय ही रंगलें होतें.

पण माधवाच्या भुंवया संकुचित होत होत्या नि ललाटावर नेहमीं दिसणाऱ्या लांब रेषा आंखुड होत होत्या.

मोठी आली आहे संगीत सम्राज्ञी नि संगीतप्रेमी. भल्या पहाटें उठूनच " करपल्या मनाच्या भावना " म्हणे. विश्रांतीच्या आनंदानंतर सर्व जीव सृष्टी चेतन झाली असून निसर्गांत वेलींचीं फुलें उमललीं आहेत. सुगंध उधळताहेत.

सगळ्यांच्या पेक्षां हिचं कांहीं निराळच गाणं आपलं. "करपल्या मनाच्या भावना, कधीं येईल वद यदुनंदना " सगळं थोतांड. लबाडी आहे हिची. ही बया मला कांहीं आज वाचूं देत नाहीं खास, असें म्हणून माधव दाराच्या आड उभा राहिला. माधवाचें चित्त चंचल झालें होतें, थोडें क्षुब्धही झालें होतें. माधवचे कान जरी गाण्याकडे होते तरी त्याचे डोळे मात्र समोरच्या टांगलेल्या कॅलेंडरवर होते आज तारीख १५ पंधरा. बाप रे! माधव स्वतःशीच उद्गारला. आणखी महिन्यानींच परिक्षा. हें असं कसं होणार! माधव स्वतःवरच कावला. माधव रडकुंडीला आला होता. गाणें चालूंच होतें.

माधवनें स्टोव्ह पेटाविला होता. चहाचीं उपकरणें बाजूला होतीं. कप—बशी—किटली—गाळणें—नि चमचा. आणि माधव पाटावर बसून आप आणि अग्नि यांची आराधना करीत होता. पण हातांत पुस्तक होतें. माधवनें चहा खाली उतरला नि तो

पुस्तकांत डोकं खुपसून बसला. चहा निवत होता नि अशोक दारांत उभा होता पण माधवला त्याचा भागमूसही नव्हता.

" आहे—बुवा " अशोक खोलींत शिरत शिरत म्हणाला. "यंदा काय पुस्तकें नि प्रोफेसर दोघेही शिल्लक रहात नाहींत असें दिसतें. पुस्तकांना नाहीं पण मला लेक्चररना तरी याचा इशारा देणें भाग आहे. रात्रीं तीन तीन वाजल्यापासून चाललय ना तुझ माधव. "

" कसलं आलंय अशोक यंदा धडगत दिसत नाहीं बुवा. माझा धीर खचत चालला बघ. आज पहाटेपासून एक अक्षर वाचलं असलं तर शपथ. "

" शपथ कुणाची—माझ्या गळ्याची कीं ? प्रोफेसर फडक्यांच्या गळ्याची ? शपथा वाहायला तुला मुळींच आमची हरकत नाहीं. बरं ते असो कुठें मक्षिकापात झाला ऐकूं तरी या. "

माधव सत्यकथन करूं लागला.

" अस्मादिकांची स्वारी आज बरोबर चारला उठली. "

माधवनें सत्यनारायणाच्या पोथीचा सूर लावला.

" आणि मग जे आहेते, पुढें काय घडलें तें सांगा. " अशोक माधवची नक्कल करीत म्हणाला. माधवादिक सांगते झाले. आणि पंधरा मिनिटांतच काय चमत्कार घडला बरं, परमेश्वराच्या एका भक्तानें त्याला आळवण्याला सुरवात केली. आणि कुंजवनांतील राधा चाळींत अवतरल्याचा भास झाला अस्मादिकाना. सारखं चाललं होतं ' कशिऽये—इना करूणा मोहना. '

" ऑ ! ही कुठली राधा रे माधव ? आह्माला नुसती कळूं दे तरी. "

माधवनें आपले डोळे समोर असलेल्या नळाकडे लावले. आणि शब्दांचें काम डोळ्यांनीं केलें.

माधवच्या डाव्या हातावर अशोकची टाळी पडली. हास्याचा संयुक्त सूर निघाला नि लगेच अंतरिक्षांत विरला.

" माधव ही भक्ती मोठी कठीण असते हां. नीट सांभाळ " भक्तिरव्यभिचारिणी " भगवंत सांगतात रडावयाला लावते ही. सोपी नसते भक्ती. भक्तानें हांक मारली. तरी भगवंतांनीं आतांच हाकेला ओऽऽऊं नये असं अस्मादिकानां वाटतं. " अशोकनें इशारा दिला.

' या तुझ्या वेळींच दिलेल्या इशाऱ्याबद्दल मी तुला चहा देतो ' माधव म्हणाला. थोड्याच वेळांत मित्राचे चहापान झाले. चार भिंतीच्या आत. दोन मित्रांनीं एकांतांत केलेल्या कानगोष्टी. पण दैव योग झाला इतका विलक्षण कीं नळावर असलेल्या मालतीनें ते समग्र ऐकलें. दगडाविटांच्या भिंती घन असून पोकळ असतात त्या अशा. गुपितं देखील बाहेर फुटतात. तीं अशी.

माधव दुपारीं स्वस्थ पडला होता. तोंच दारांतून कमल आंत आली.

" माळूनें पुस्तक मागितलें कसलें तरी. वेळ जात नाहीं म्हणते ती. "

माधव म्हणाला " कसलें तरी म्हणजे कसलं ग कमे. "

कमानें डोळे किलकिले करून सांगितलें कसलं म्हणजे गमतीचं.

माधव हसूं लागला. माधवनें कपाटांत हात घातला तो नुकतीच प्रकाशित झालेली " विवाहापूर्वी " ही कादंबरी त्यांचे हातास आली. त्याला तें पुस्तक पटलें. कमाच्या हातांत त्यानें तें दिलें आणि वाचून झाल्यावर परत आण म्हणून बजावलें. माधवनें दरवाजा लावून घेतला नि त्यानें पुस्तक उघडलें पण किती तरी वेळ त्याची वाचनांत एकाग्रता होईना. डोळे पुस्तकावरून इतःस्ततः भटकत असले, तरी त्याच्या चित्तांत विमल उभी रहात होती. जड घराची दारें व खिडक्या लावतां आली तरी हृदयाचे दरवाचे एकदां उघडले गेले, कीं मिटणं फार कठिण असतं. माधवाचे दिवस गूढ चिंतनांत जाऊं लागले.

दोन दिवसांनीं कमा पुस्तक घेऊन आली. पण एकही क्षण न थांबतां निघून गेली. माधवनें पुस्तक हातांत घेतलें नि गमती खातर पानांची टोकें फुरफुरण्यास सुरवात केली. दुसऱ्या फेरीतच आंतून एक घडी केलेलं पाकीट बाहेर पडलं. माधवच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि भीति यांचा खेळ दिसला. धडधडत्या छातीनें व कांपऱ्या हातांनीं माधवनें पत्र उलगडलें व फुरफुरणाऱ्या डोळ्यांनीं तो वाचूं लागला.

" भक्ती रडविणारी असली तरी ती एक प्रभावी शक्ति आहे. भक्त नि भगवंत यांचे प्रेमकलहांत शेवटीं भगवंतानांच हार खावी लागते. बाबा स्थळ बघताहेत नि घरांत त्याच गोष्टी

चालल्या आहेत. बाबा जवळचं सोडून लांब जाऊं लागले आहेत. वेळींच लिहलं आहे.

आ.

**मालती.**

पत्राच्या चारच ओळी होत्या पण त्यांत मालतीनें आपलें सर्वस्व ओतलें होतें. हृदयसागर अथांग असला तरी चार शब्दांत सुद्धां तो समाऊं शकतो. आत्मा सर्वव्यापक असला तरी तो व्यक्ती मध्येंही भरलेला दिसतो तो असा.

पत्र वाचतांच माधवच्या हृदयांत आश्चर्य–प्रेम, धन्यता आणि सुख यांचा खेळ झाला. खो–खोच्या खेळांतल्या सारखे झालें. माधवनें मालतीची गांठ घ्यावयाची मनाशीं ठरविलें.

आज मालूच्या घरीं, वासंतिक रसपान होतें. चैत्राच्या महिन्यांत स्त्रियांनीं हळदीकुंकु लुटल्यानंतर पुरुषवर्ग वासंतिक रसपानाचा समारंभ साजरा करतो. मालुच्या वडिलांनीं घाईंत फिरवलेल्या सरक्युलरवर माधवचें नांव घातलें नव्हतें. नजरचुकीनें तें वगळण्यांत आलें होतें. मालूच्या आईच्या लक्षांत जेव्हां ही चूक आली तेव्हा त्यांनीं मालूस चटकन् हांक मारली व म्हणाल्या ' मालू सगळंच मुसळ केरांत. ' अग आज माधवरावांना नाहीं बोलावलं आपण. जा बघूं आधीं सांगून ये त्यांना. त्यांना सांग मी बोलावलयं म्हणून.

" पडत्या फळाची आज्ञा " मालूला हवें होतें तेंच मिळालें. मालू माधवरावांचे खोलीकडे जाण्यास वळली पण जातांना तिनें

एकदां आरशांत बवितलें व केसावरून फणी फिरविली. आईची चाहूल लागतांच माळू बाहेर सटकली.

माळू आली ती सरळ हंसत हंसत माधवच्या खोलींत शिरली. माधव पुस्तक घेऊन अस्ताव्यस्त पसरला होता, तो चटकन् उठून उभा राहिला.

" आज आमच्याकडे रसपान आहे.

आईनें बोलावलें आहे "

कुणाला-- " मला " माधव उद्गारला.

माळूनें खुणेनेंच हंसून मान ओवाळली व ती जावयास निघाली. माधवनें तिला हाक मारली ' माळू एवढी परीक्षा होईतोंपर्यंत दिवस ढकल. पुढें सर्व जबाबदारी माझ्या शिरावर आहे. ' माधव आर्जवानें ह्मणाला.

" पण बाबा--दुसरीकडे बघताहेतना ? "

'पण तुला काय वाटतं ? माळू परीक्षेच्या रिझल्टपर्यंत तुला दिवस निभावून नेतां येणार नाहींत कां ?' माधवच्या स्वरांत कमालीचें आर्जव होतें नि डोळ्यांत विलक्षण करुणा नि उत्सुकता भरली होती. त्यानें माळूवर आपलें नेत्र रोखलें व तो उत्तराची वाट पहात होता.

माळू नुसतीच हंसली. होकारार्थी हंसली. आणि माधवाला सर्वस्वाचा ठेवा मिळाल्याचा आनंद झाला. पण माळू, तुझ्या बाबांनीं घाई केली तर काय सांगशील त्यांना ?

" हातचें सोडून पळत्याचे मागे लागूं नका म्हणून सांगेन "

आणि बाबांनीं ऐकलं नाहीं तर—घुसफुस करीन घरांत आईजवळ.

आणि आई समजुत घालूं लागली तर ?

तर—तर—काय लिहीन मी तसं.

बाहेर पावले वाजल्याचा भास झाला. दोघेही भानावर आलीं. माधवनें खुणावलें. मालू चालूं लागली. त्या दिवसापासून माधवची वृत्ती नेहमीं आनंदित व रंगेल दिसूं लागली. भावी आयुष्याची सुखस्वप्नें व यशाचे चार मिनार उभारण्यास त्यास दिवसच काय पण रात्रीही पुरेनाशा झाल्या. मालू—मालू भरली होती त्याच्या नजरेंत. माधव हल्लीं नेहमीं गुणगुणत असे हिंदी पद.

" जाति नजरियां जिदर कों हमारि ।
उधर देखता हूं मैं सुरत तुम्हारी ॥

माधवच्या डोळ्यांवर प्रणयाची धुंदी आली होती. किती मादकता असते तिच्यांत. मानवी मनाला उच्च वातावरणांत व काल्पनिक सुखसागरांत बुडविण्याचें सामर्थ्य याच पहिल्या प्रणयाचे धुंदीत असते.

हां हां ह्मणतां दिवस जात होते. भावी सुखाची मनोराज्य करीतच माधव मुंबईस परीक्षेला गेला. पण गाडींत बसतांना माधवच्या हृदयांत खोल कुठें तरी भीति डोकावीत होती.

मालू ह्मटल्याप्रमाणें करील का ?

प्रेम कसोटीला उतरेल का ?

आणि घटकाभर तो अस्वस्थ होई. पण मालूची हंसरी मूर्ति डोळ्यापुढें आली कीं माधवच्या जिवांत जीव येई.

माधव परीक्षेस गेला. आज शेवटचा पेपर होता. माधवच्या अपेक्षेप्रमाणें पेपर्स बरे गेलें होते. आज शेवटचा पेपर होता. पेपर संपतो कधीं नि मद्रास मेल गांठतो कधीं असें माधवला झालें होतें. माधवाचे हृदयानें घरची ओढ घेतली होती. एरव्ही माधव मुंबईस राहिला असतां. मुंबईची हवा काय माधवाला नको होती. पण यावेळीं सर्व मुंबईतील एकाही वस्तूंत माधवाला आकर्षण करण्याचें सामर्थ नव्हतें--माधवाला मुंबईपेक्षां-- मालू जास्त आकर्षण करीत होती.

दुपारचा पेपर संपला नि माधव परत माधवाश्रमांत आला. जेवणखाण करुन माधव थोडा आराम खुर्चीवर पडला होता. परीक्षेचा मनावरील बोजा नाहींसा झाल्यामुळें माधवाला पूर्ण मोकळेपणा वाटत होता. आणि पेपर्स चांगले गेल्यामुळें माधव सुखसागरांत पोहत होता. घरीं गेल्यावर आतां मालूला दिलेलें जबाबदारीचें वचन आपणास पूर्ण पाडतां येईल नि आतां आपणास स्वर्गाला शिडी लावतां येईल. माधवचा डोळा लागला.

“ योजि मन कार्य येक
दैव योजी दू-स-रे-ए. ”

दैवाचा खेळ विचित्र असतो. एवढेंच असतें तर मानवी मनानें त्यांत आनंदच मानला असता. पण दैव आपला खेळ

अनपेक्षितपणें नि नकळत खेळतें आणि म्हणूनच मानवी सामर्थ्याला अज्ञात दैवापुढें हार खावी लागते. मानवी जीवित म्हणजे कांहीं दोन टोंकें ताणून धरलेल्या दोरीप्रमाणें सरळ नसतें. त्यांस वळणें नि वळसेही असतात. पण मौज अशी आहे कीं मानवी मन जेव्हां एकाद्या वस्तूचा अभिलाष अगर हव्यास अट्टाहासानें घेतें त्यावेळीं तें वळणें-वेटोळीं विसरतें

पण दैव आपला खेळ अचुक खेळते " माधवराव फडके " पोस्टमननें दारावर टक् टक् करून पाकीट आंत टाकलें. आणि पोस्टमन पुढें निघून गेला. माधवची गुंगी पार निघून गेली. धडपडत उठून माधवनें पाकीट हातांत घेतलें हस्ताक्षर त्याच्या चिरपरिचयाचें नसलें तरी ओळखीचें होतें. आनंद आणि भय या दोन भावनांचें सुंदर मिश्रण त्याचें हृदयांत झालें. माधवनें पत्र फोडलें.

प्रिय माधव,

होऊं नये तें झालें. प्रयत्नांची शिकस्त करून पाहिली. जिवाचें रान करून पाहिले, पण निष्फळ. दैवानं सर्वांवर मात केली. बाबांनीं मुहूर्त मुक्रर करून आमंत्रण पत्रिकाही पाठविल्या आहेत.

घराण्याची अब्रू नि बाबांचा शब्द पाळण्याकरितां मला परिस्थितीपुढें मान तुकविलीच पाहिजे.


माधव यांत माझी कांहीं चूक आहे कारे ?

मालू.

माधवाच्या डोळ्यास अंधारी आली. खोलींतील विजेचें बटन दाबून त्यानें पंखा सुरू केला. खोलींतील प्रत्येक वस्तू त्याच्या डोक्याभोंवतीं भ्रमण करीत असल्याचा त्याला भास झाला.

दोन वर्षांनीं मालू माहेरी आली. मालूबरोबर तिचा विजय होता. मालू एका अर्भकाची माता झाली होती आणि वाङ्मयक्षेत्रांत माधवाला अपत्यलाभ झाला होता. माधवानें पुस्तकाचें नांव **दैवाधीन** ठेवलें.

पुस्तकाचा मतितार्थ असा कीं मानवी जीवित दैवाधीन असते.



पुष्प ७ वें

# तपाकिरीवर अॅडजर्नमेंट

— लेखक —
दत्तात्रय बळवंत लेले
बी. ए. एल्. एल्. बी. वकील.

माझा लंगोटीयार मित्र बापू आतां आपल्या वकीलीच्या ऑफिसांत पक्षकाराच्या घोळक्यांत अगदीं चिंताक्रांत बसला होता. मी माडीवर गेलो तेव्हां विचारवंत बापूस पाहून मला विस्मय वाटला व भोंवतालीं जमलेलें त्याचे ते सर्व वेरड पक्षकार पाहून तो विस्मय दुणावला. मी बापूला इंग्रजींत विचारलें,

कायरे कसल्या एवढ्या आपत्तींत सांपडला आहेस ? बापू म्हणाला, अरे खटला फारच भानगडीचा आहे असें त्यांना दाखवींत आहे ! वास्तविक दावा अगदीं साधा प्रॉमिसरीचा आहे पण पैसे ज्यास्त मिघावेत म्हणून उगीचच मघापासून फौजदारी कायद्यांची सर्व पुस्तकें यांचे समोर उलथीपालथी करीत आहे व या दाव्यांत तुमचेवर फौजदारीचे किटाळ येण्याचा संभव आहे असें त्यांना भासवीत आहे !! या खटपटीस अल्पांशानें यश मिळालें. पक्षकार मनांतून थोडें घाबरले, दुपारी पाहूं म्हणून उठून गेले.

नाहीं तरी बापूचे असेंच बरेच वेळां होई. थापा मारण्यांत त्याचा हात धरणारा आमच्या बारमध्यें कोणीही नव्हता. आप-

एकदां आरशांत बघितलें व केसावरून फणी फिरविली. आईची चाहूल लागतांच मालू बाहेर सटकली.

मालू आली ती सरळ हंसत हंसत माधवच्या खोलींत शिरली. माधव पुस्तक घेऊन अस्ताव्यस्त पसरला होता, तो चटकन् उठून उभा राहिला.

" आज आमच्याकडे रसपान आहे.

आईनें बोलावलें आहे "

कुणाला-- " मला " माधव उद्गारला.

मालूनें खुणेनेंच हंसून मान ओवाळली व ती जावयास निघाली. माधवनें तिला हाक मारली ' मालू एवढी परीक्षा होईतोंपर्यंत दिवस ढकल. पुढें सर्व जबाबदारी माझ्या शिरावर आहे. ' माधव आर्जवानें म्हणाला.

" पण बाबा--दुसरीकडे बघताहेतना ? "

'पण तुला काय वाटतं ? मालू परीक्षेच्या रिझल्टपर्यंत तुला दिवस निभावून नेतां येणार नाहींत कां ?' माधवच्या स्वरांत कमालीचें आर्जव होतें नि डोळ्यांत विलक्षण करुणा नि उत्सुकता भरली होती. त्यानें मालूवर आपलें नेत्र रोखलें व तो उत्तराची वाट पहात होता.

मालू नुसतीच हंसली. होकारार्थी हंसली. आणि माधवाला सर्वस्वाचा ठेवा मिळाल्याचा आनंद झाला. पण मालू, तुझ्या बाबांनीं घाई केली तर काय सांगशील त्यांना ?

" हातचं सोडून पळत्याचे मागे लागूं नका म्हणून सांगेन "

आणि बाबांनीं ऐकलं नाहीं तर—घुसफुस करीन घरांत आईजवळ.
आणि आई समजुत घालूं लागली तर ?
तर—तर—काय लिहीन मी तसं.

बाहेर पावलें वाजल्याचा भास झाला. दोघेही भानावर आलीं. माधवनें खुणावलें. मालू चालूं लागली. त्या दिवसापासून माधवची वृत्ती नेहमीं आनंदित व रंगेल दिसूं लागली. भावी आयुष्याची सुखस्वप्नें व यशाचे चार मिनार उभारण्यास त्यास दिवसच काय पण रात्रीही पुरेनाशा झाल्या. मालू—मालू भरली होती त्याच्या नजरेंत. माधव हल्लीं नेहमीं गुणगुणत असे हिंदी पद.

" जाति नजरियां जिदर कों हमारि ।
उधर देखता हूं मै सुरत तुम्हारी ॥

माधवच्या डोळ्यांवर प्रणयाची धुंदी आली होती. किती मादकता असते तिच्यांत. मानवी मनाला उच्छ वातावरणांत व काल्पनिक सुखसागरांत बुडविण्याचें सामर्थ्य याच पहिल्या प्रणयाचे धुंदीत असते.

हां हां ह्मणतां दिवस जात होते. भावी सुखाची मनोराज्य करीतच माधव मुंबईस परीक्षेला गेला. पण गाडींत बसतांना माधवच्या हृदयांत खोल कुठें तरी भीति डोकावीत होती.

मालू ह्मटल्याप्रमाणें करील का ?
प्रेम कसोटीला उतरेल का ?

आणि घटकाभर तो अवस्थ होई. पण मालूची हंसरी मूर्ति डोळ्यापुढें आली कीं माधवच्या जिवांत जीव येई.

माधव परीक्षेस गेला. आज शेवटचा पेपर होता. माधवच्या अपेक्षेप्रमाणें पेपर्स बरे गेलें होते. आज शेवटचा पेपर होता. पेपर संपतो कधीं नि मद्रास मेल गांठतो कधीं असें माधवला झाले होते. माधवाचे हृदयानें वरची ओढ घेतली होती. एरव्ही माधव मुंबईस राहिला असतां. मुंबईची हवा काय माधवाला नको होती. पण यावेळीं सर्व मुंबईतील एकाही वस्तूंत माधवाला आकर्षण करण्याचें सामर्थ नव्हतें--माधवाला मुंबईपेक्षां-- मालू जास्त आकर्षण करीत होती.

दुपारचा पेपर संपला नि माधव परत माधवाश्रमांत आला. जेवणखाण करुन माधव थोडा आराम खुर्चीवर पडला होता. परीक्षेचा मनावरील बोजा नाहींसा झाल्यामुळें माधवाला पूर्ण मोकळेपणा वाटत होता. आणि पेपर्स चांगले गेल्यामुळें माधव सुखसागरांत पोहत होता. घरीं गेल्यावर आतां मालूला दिलेलें जबाबदारीचें वचन आपणास पूर्ण पाडतां येईल नि आतां आपणास स्वर्गाला शिडी लावतां येईल. माधवचा डोळा लागला.

" योजि मन कार्य येक
दैव योजी दू-स-रे-ए. "

दैवाचा खेळ विचित्र असतो. एवढेंच असतें तर मानवी मनानें त्यांत आनंदच मानला असता. पण दैव आपला खेळ

अनपेक्षितपणें नि नकळत खेळतें आणि म्हणूनच मानवी सामर्थ्याला अज्ञात दैवापुढें हार खावी लागते. मानवी जीवित म्हणजे कांहीं दोन टोंकें ताणून धरलेल्या दोरीप्रमाणें सरळ नसतें. त्यांस वळणें नि वळसेही असतात. पण मौज अशी आहे कीं मानवी मन जेव्हां एकाद्या वस्तूचा अभिलाष अगर हव्यास अट्टाहासानें घेतें त्यावेळीं तें वळणें-वेटोळीं विसरतें

पण दैव आपला खेळ अचुक खेळते " माधवराव फडके " पोस्टमननें दारावर टक् टक् करून पाकीट आंत टाकलें. आणि पोस्टमन पुढें निघून गेला. माधवची गुंगी पार निघून गेली. धडपडत उठून माधवनें पाकीट हातांत घेतलें हस्ताक्षर त्याच्या चिरपरिचयाचें नसलें तरी ओळखीचें होतें. आनंद आणि भय या दोन भावनांचें सुंदर मिश्रण त्याचें हृदयांत झालें. माधवनें पत्र फोडलें.

प्रिय माधव,

होऊं नये तें झालें. प्रयत्नांची शिकस्त करून पाहिली. जिवाचें रान करून पाहिलें, पण निष्फळ. दैवानं सर्वांवर मात केली. बाबांनीं मुहूर्त मुक्रर करून आमंत्रण पत्रिकाही पाठविल्या आहेत.

घराण्याची अब्रु नि बाबांचा शब्द पाळण्याकरितां मला परिस्थितीपुढें मान तुकविलीच पाहिजे.

माधव यांत माझी कांहीं चूक आहे कारे ?

मालू.

माधवाच्या डोळ्यास अंधारी आली. खोलींतील विजेचें बटन दाबून त्यानें पंखा सुरू केला. खोलींतील प्रत्येक वस्तू त्याच्या डोक्याभोंवतीं भ्रमण करीत असल्याचा त्याला भास झाला.

दोन वर्षांनीं माल्हू माहेरी आली. माल्हूबरोबर तिचा विजय होता. माल्हू एका अर्भकाची माता झाली होती आणि वाङ्मयक्षेत्रांत माधवाला अपत्यलाभ झाला होता. माधवानें पुस्तकाचें नांव **दैवाधीन** ठेवलें.

पुस्तकाचा मतितार्थ असा कीं मानवी जीवित दैवाधीन असते.

पुष्प ७ वें

# तपकिरीवर ॲडजर्नमेंट

— लेखक —

दत्तात्रय बळवंत लेले
बी. ए. एल्. एल्. बी. वकील.

माझा लंगोटीयार मित्र बापू आतां आपल्या वकीलीच्या ऑफिसांत पक्षकाराच्या घोळक्यांत अगदीं चिंताक्रांत बसला होता. मी माडीवर गेलो तेव्हां विचारवंत बापूस पाहून मला विस्मय वाटला व भोंवतालीं जमलेलें त्याचे ते सर्व वेरड पक्षकार पाहून तो विस्मय दुणावला. मी बापूला इंग्रजींत विचारलें,

कायरे कसल्या एवढ्या आपत्तींत सांपडला आहेस ? बापू म्हणाला, अरे खटला फारच भानगडीचा आहे असें त्यांना दाखवीत आहे ! वास्तविक दावा अगदीं साधा प्रॉमिसरीचा आहे पण पैसे ज्यास्त निघावेत म्हणून उगीचच मघापासून फौजदारी कायद्यांची सर्व पुस्तकें यांचे समोर उलथीपालथी करीत आहे व या दाव्यांत तुमचेवर फौजदारीचे फिटाळ येण्याचा संभव आहे असें त्यांना भासवीत आहे !! या खटपटीस अल्पांशानें यश मिळालें. पक्षकार मनांतून थोडें बावरले, दुपारी पाहूं म्हणून उठून गेले.

नाहीं तरी बापूचे असेंच बरेच वेळां होई. थापा मारण्यांत त्याचा हात धरणारा आमच्या बारमध्यें कोणीही नव्हता. आप-

लेकडे काम पुष्कळ आहे, फी अतिशय घेतो या थापा त्याच्या पूर्णपणें अंगवळणी पडल्या होत्या व कोठून ही कसें ही काम मिळविण्याशीं त्यानें गांठ ठेवली होती. नुसत्या वकीलपत्रांवर आरोपीच्या सह्या आल्या कीं याचें काम भागे. मग त्यावर वजन नसले तरी त्याला चालत असें. मग स्वतःच तिकिट लाऊन सेशनकेस सुद्धां चालविणेस तो मागेंपुढें कधींही पहात नसे. मात्र आजचा केसचे शंभर रुपये घेतले व तेही रोख अशीही थाप तो नेहेमींचं मारीत असे !

याचा परिणाम मात्र थोडासा अनिष्ट झाला. कारण बापूचे काम वाढलें व दररोज ३।४ कोर्टांत त्यास काम करावें लागू लागलें, पण दरमहाच्या पैशाच्या प्राप्तीकडे नजर टाकल्यास त्याचीच काय त्याचा मित्र म्हणविणाऱ्या माझी सुद्धां निराशाच होत असे. कारण बापूची सांपत्तिक स्थिती कांहीं फारशी चांगली नव्हती.

बापूचें वडील स्वर्गातील मौज लुटणेस निघून गेले तेव्हां बापूची प्रवेश परीक्षाच फक्त पास झाली होती व वडिलांच्याच कृपेनें बापूला त्यांचे जागेवर रेव्हेन्यू खात्यांत कारकुनाची नोकरी लागली होती. नाहीं म्हणावयाला एक लहानसे टुमदार घर व आईच्या अंगावरील व खुद्द बापूच्या कुटुंबाचे अंगावरील हजार दोन हजाराचे दागिने या शिवाय जास्त माया वडिलांनीं ठेविली नव्हती. रेव्हेन्यू खात्यांत बापूला चांगला ५० रुपये पगार सुरूं झाला होता. पण बापूला अगदीं लहानपणापासून शाळेंत असल्या-

पासून ' वकीलसाहेब ' म्हणवून घेणेची व वकील म्हणून ऐटींत मिरविणेची फार हौस, शाळेंतल्या संम्मेलनांत त्यानें एकदां पोर्शियाचे काम केलें होते. त्यावेळीं बापूचा आनंद गगनांत मावत नव्हता. त्या दिवशीं त्याला घालावयाला मिळालेला गाऊन त्यानें बेमालूमपणें घरीं आणून आठ दिवस दररोज तो गाऊन घालून रस्त्यानें पोर्शियाच बनून तो हिंडत असे व दोन चार मित्रांना घरींच चहा पाजून आपणांस अमुक अमुक ठिकाणीं भेटा व का वकीलसाहेब ? म्हणून हांक मारा, असें अगाऊच सांगून ठेवी. त्याप्रमाणें हें नाटक त्यानें आठ दिवस वठवूनही दाखविलें. आतां आठव्या दिवशीं शाळेंतील शिक्षकांनीं बापूबरोबर शाळेचा शिपाई घरीं पाठवून गाऊन आणवून घेतला ही गोष्ट निराळी. असो !

अखेर कचेरींत काम करतां करतां अभ्यास करावा व एकदां हायकोर्ट प्लीडरची किंवा ॲडव्होकेटची परीक्षा द्यावी व ही नोकरी सोडून द्यावी व वकील म्हणून झळकावे असें त्यानें मनाशीं ठरविले व आपल्या बडबड्या व थापेबाज स्वभावानें त्यानें पुस्तकें तर पैदा केली. अभ्यास झाला. परीक्षा झाली. परीक्षेहून आल्याबरोबर मी खात्रीनें पास होणार अशी त्यानें सर्वांना थाप ठोकली. वास्तविक तो यावेळीं मुंबईस जाऊन एकाच पेपरला बसून आला होता व बाकीचे पेपरचे दिवशीं त्याला कांहींच आठवत नसल्यामुळें जवळ जवळ कोरेच पेपर्स देऊन तो निघून आला होता.

हो ना करतां निकाल लागला. पण बापूची तार येईना ! दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रें आली. त्यांत बापूचे नांव नाहीं. अखेर बापूनें आपणास नापास केल्याचा धडधडीत आरोप परीक्षकांचे माथीं मारून आपली सुटका करून घेतली. त्यांच्या भोळ्या-भावड्या आईस व पतीदेवतावर पूर्ण विश्वास असणाऱ्या त्यांच्या प्रेमळ पत्नीस ही थाप खरी वाटली व त्यांनीं परीक्षकांचे नांवानें बोटे मोडली. पण असें दरवेळीस होऊं लागलें. सात आठ वेळां बापू परीक्षेस गेला पण प्रत्येक वेळीं बापूचे नांव छापणेस जागाच कमी पडूं लागली !! अखेर बापूनें चार सहा महिनें हक्काची बिनपगारी रजा घेतली व एकदाची परीक्षा दिली. कांहीं विषयांत बापू या भगीरथ प्रयत्नानें सुटला. मग बापूस उमेद आली. असाच प्रयोग त्यानें आणखी एकदां केला व अखेर तो वकील झाला.

बापू वकील झालेला पहातांच बापूच्या आईस व पत्नीस अत्यानंद झाला. बापूस तर काय ? स्वर्ग दोनच बोट उरला. आधीच तो गुंड म्हणून प्रसिद्ध होता. आतां तर काय या त्याच्या वृत्तीस सद्गुणाचे स्वरूप आले होते ! कचरींत इतके वष काम केल्यामुळें त्याच्या सर्व जिल्हाभर ओळखी झाल्या होत्या व त्याला मदत करण्याचे प्रत्येकानें आश्वासन दिलें. झालें बापूनें हां हां म्हणता ऑफिस थाटलें व आपल्या लठपटीच्या जोरावर चार दोन कामें हीं गोळा केली, या त्याच्या नोकरीच्या आयुष्यांत त्यास तपकिरीची संवय फारच जडली होती.

हो ना करता बापूनें वकीली करावयास सुरवात केली. थोड्याच दिवसांत त्याचें ॲडजर्नमेंट प्लीडर म्हणून नांव झालें. मुदत मिळावी अशी इच्छा असली कीं, आमच्या बापूनें तें काम केलेच म्हणून समजावें, मग त्याकरतां वाटेल त्या थापा मारणेस बापू मागें पुढें कधींच पहात नसे. तारीख माहीत असतां "माझ्या डायरीवर आज तारीख दिसत नाहीं, कांहीं चूक झालेली दिसते, येथपासून तो ! माझा पक्षकार आजच सकाळीं मेला ! असे कळते ( वास्तविक त्याच दिवशीं सकाळीं पक्षकार घरीं येऊन गेला असेना कां ) येथपर्यंत अनंत कारणें मुदत मागणेंकरता बापूच्या पोतडींत नेहमीं हजर असत व इतकेही करून अर्ज देतो म्हणून सांगणें व तो न देणें किंवा विरूद्ध बाजूच्या वकीलाला गांठून त्याचेकडून दोघांचा मिळून अर्ज देतो व खर्चही निमानिमा देऊं असें कबूल करून पुन्हां चार आणे कधींही न देणें किंवा आपसांत समजूत होणार आहे अशी पुरसीस लिहून तीवर विरूद्ध बाजूच्या वकीलाची सही हां हां म्हणता मिळवून, पुरसीवर मुदत घेऊन अर्जाचे तिकिटाचें पैसे खाणें इत्यादि अनंत गोष्टीं म्हणजे बापूच्या हातचा अगदीं मळ असे. बापुच्या तावडींत विरुद्ध बाजूचा वकील सांपडला व त्याला त्यानें अल्पपैशानें कां होईना पण टोपी घातली नाहीं असें क्वचितच घडावयाचें. ही जेथें वकीलांची स्थिती तेथें पक्षकाराविषयीं बोलावयासच नको ! एवढें मात्र खरें कीं बापूचे हस्तक बापूला कामाचा खूपच पुरवठा करीत असत. त्यामुळें आपल्या अंगच्या सर्व हिकमती दाखविणेस बापूला पूर्ण अवसर सांपडत असे.

मुदत उर्फ ॲडजर्नमेंट मिळवण्याचें वेळीं बापू आपल्या दंतपंक्तीचा व चेहऱ्याचा तर शक्य तितका उपयोग करीच शिवाय 'युअर ऑनर' चा वर्षाव मॅजिस्ट्रेट महाशयावर पुनः पुनः करण्याची त्याची लकब कांहीं दांडगी होती ! या दोन उपायांनीं बहुधा मॅजिस्ट्रेट विरघळत असेच ! पण नाहींच जमले असें त्यास वाटले तर आणखी एका अमोघ शस्त्राचा तो उपयोग करी.

एकदां काय झाले, बापूचे साक्षीदार हजर नव्हते. त्याला मुदत पाहिजे होती. मग काय, बापू एक वाजल्यापासून जाऊन बसला कचेरींत व त्यांची केस पुकारावयास मॅजिस्ट्रेट साहेबांनीं सांगितल्याबरोबर बापू म्हणाला, साहेब राहूं द्या, दुसऱ्या केसेस घ्या अगोदर, माझ्या केसमध्यें साक्षिदार फारच मोठे आहेत शिवाय आपण ही लिहून लिहून फार दमला आहात. आपलें या आयुष्यांतले हें काम (मॅजिस्ट्रेटची दाढी जरा पांढरी झाली होती) पाहिले म्हणजे आश्चर्य वाटावयास लागतें. मला नाहीं वाटत आमच्या हातून याच्या निम्यानें सुद्धां काम होईल म्हणून, झाले ! मनुष्य स्तुतिप्रिय आहे ना. मॅजिस्ट्रेट विरघळला. दुसऱ्या केसेस घेतल्या गेल्या. शेवटीं विरुद्ध बाजूचा वकील एकेरीवर आला व ते कांहीं नाहीं हा खटला आतां घ्याच असा आग्रह धरला. बापूनें एकदम घड्याळाकडे पाहिले व म्हटलें !

"वा ! साहेब आतां पांच वाजले आहेत. 'युवर ऑनर' आपण आतां लिहिणार तरी किती ? छे छे आपणांस आज फारच श्रम झालें आहेत. कामाचें काय मोठेसें ! आज नाहीं उद्या होईल.

ते कांहीं नको. पुढची तारीख कोणतीहि द्यावी. तुम्हांस सोईस्कर कोणती आहे ती पहा."

( विरुद्ध बाजूच्या वकीलांना उद्देशून ) हो तुमची सोय प्रथम पाहणें हें माझें काम आहे. तुम्ही पडलात वडे वकील, माझें काय मी आपल्या या साहेबांच्या कोर्टांत केव्हांही हजर असतोच. मग काय, तारीख तेराच घ्या झालें." एवढ्या भाषणानें विरुद्ध बाजूचा वकील तर गारच झाला पण मॅजिस्ट्रेटनेंही तेराच तारीख दिली व बापूनें ती टिपून घेतली व तो निघून गेला सुद्धां ! विरुद्ध बाजूचा वकील आ करून बसला ! !

गांवांत चाललेल्या सर्व चळवळींची बापूला इत्यंभूत माहिती असे. एकदां काय झालें त्या गावांत विमान उतारावयाचें होतें म्हणून गांवांत जिकडे तिकडे त्या विषयीं जाहिराती वाटल्या होत्या. लोकांना विमान ही काय चीज आहे हे जाणण्याची उत्कंठा होती व तें सर्वांना पहावयास सांपडावें म्हणून त्या गांवच्या अधिकाऱ्यांनीं तशी स्पेशल सोय करून गांवांत जाहिराती वाटल्या होत्या व त्यावर कार्यक्रम व थोडीशीं माहिती छापली होती. बापूनें या पैकीं कांहीं जाहिराती आपल्या पोतडींत ठेवून दिल्या. इतर वकीलांनीं जाहीराती घेऊन वाचून फेकून दिल्या होत्या.

विमान दुपारीच पांच वाजतां उतरणार होतें.

आज बराच जुना चांगला तीन वर्षांवर गेलेला दावा होता. बऱ्याच मुदती देऊन नंतर आज पुन्हा कोणच्याही सबबीवर मुदत मिळणार नाहीं असा त्या दाव्यावर शेरा मारला गेला होता

आणि आज मुदत मिळविणें तर पक्षकारांच्या दृष्टीनें अतीशय महत्वाचें होतें. म्हणून बापूला मुद्दाम वकीलपत्र देण्यांत आलें होतें.

कोर्ट बाहेर बोर्डावर आलें व बापूचा नंबर पुकारला गेला.

नेहमींच्या युक्त्या प्रयुक्त्या करून दुसऱ्या कोर्टांत काम नसतांना उगीचच बसून बापूनें तास दोन तास वेळ काढलान, आणि अखेर जेव्हां साहेब दावा काढून टाकूं लागले तेव्हां एकदम बापू अवतीर्ण झाला व त्यानें एक मोठा अर्ज पेश केला. अर्जासोबत जाहिरात व त्या बरोबरच मामलेदारचा जाहिराती वाटणाऱ्या शिपायाचें पत्र " मी जाहिरात ××× यास समक्ष दिली " असें इतक्या गोष्टी हजर केल्या.

अर्जांत मुदत मागून गांवच्या अधिकाऱ्यांनीं विमान पहाणेस येण्याचा हुकुम पक्षकारावर बजावल्यामुळें पक्षकार विमान पाहण्यास गेले आहेत असें कारण दिलें होतें. नावीन्यपूर्ण अर्जानें अर्ज मंजूर झाला. पण पुढें—

एकदां काय गंमत झाली, बापूला एक साहेबाकडे अपील मिळालें. [ त्यानें मिळविलें होतें खरें. ] अपील चालवावयाचा दिवस आला. बापूला पुकारलें. थोडा वेळ बापू गेलाच नाहीं. अखेर पक्षकारानेंच येऊन गडबड केली तेव्हां गेला व गेल्याबरोबर, काय ? अपील नं. सातशेंआठपस्तीशांस ? शिरस्तेदारानें ' होय ' म्हणून सांगितलें. तावडतोब बापूनें पवित्रा फिरविला व म्हणाला कीं त्याची सर्व माहिती त्या ' कल्पक ' वकीलांना आहे व तेच काम चालविणार आहेत. मला यांतली कांहींच माहिती नाहीं.

" अहो त्यांचे वकीलपत्र हजर नाहीं कांहीं नाहीं " शिरस्तेदारांनीं खुलासा केला.

" ते आज वकीलपत्र हजर करणार आहेत, पण ते आज खालच्या कोर्टांतल्या खुनाच्या खटल्यांत आहेत, तेव्हां अपील ठेवावे एक दोन दिवसावार " बापूनें हजरजबाबीपणा दाखवून उत्तर दिलें ! या उत्तरानें साहेब फारच गरम झाले.

" मि. थापाडे वकील तुम्ही एक शब्दही कधीं खरे बोलत नाहीं. ' कल्पक ' वकीलांचा यांत कांहींही संबंध नाहीं व आज खालच्या कोर्टांत खुनाची केसही ठेवलेली नाहीं. तरी पण ' कल्पक ' वकीलांना पुकारावयास लावतो एकदां. असें म्हणून साहेबांनीं खूण करतांच कल्पक वकील पुकारले गेले, व ते आल्यावर' ' माझा या अपीलाशीं कांहींच संबंध नाहीं ' कल्पक वकील उत्तरले !! मग साहेब फारच चिडले व बापूचे अंगावर ओरडून म्हणाले कीं,

' बोला, मिस्टर थापाडे, आज काय करतां ? अपील चालवितां कीं नाहीं ? '

इतक्या प्रसंगानेंही बापू डगमगून गेला नाहीं. त्यानें आपली तपकिरीची डबी काढली. एक चिमुट आपल्या नाकांत कोंबली. तशीच बाटली घेऊन तो साहेबाचे टेबलाजवळ गेला व तपकिरीची बाटली पुढें करीत म्हणूं लागला ' मे इट प्लीज युवर वरशिप, त्याचं असं झालं. '

पण पुढचं वाक्य पुरे होण्यापुर्वीच साहेबाच्या क्रोधाविष्ट नजरेच्या इषाऱ्यानें व त्यानें 'इसकू हकालदेव !' या केलेल्या हुकमानें कोर्टांतील शिपायानें बापूस अलगत उचलून खालच्या मजल्यावरील खुर्चीवर आणुन ठेविलें होते.



## पुष्प ८ वें.

# नराधम

लेखक
दत्तात्रय बळवंत लेले
बी. ए. एल्. एल्. बी, वकील.

आमची मालू हाडाची फारच गरीब सात्विकतेची जणूं काय मूर्तिमंत पुतळीच! कधीं धुसफुसणें रागावणें या गोष्टी तिला जन्मांत देखील ठाऊक नव्हत्या. तिला इंग्रजी शिक्षण मिळालें होतें. जात्याच चालाख व हुशार असलेली माली शिक्षणानें वादविवादकुशल व अर्धाकच हुशार झाली. जगांत आपलें नांव अजरामर व्हावें, आपल्या हांतून कांहीं तरी मोठी कामगिरी व्हावी, स्त्री जीवनांचे हाल दूर व्हावेत अशी तिची जाज्वल्य इच्छा, सुशिक्षित स्त्रियांवर जे नाना तऱ्हेचे आरोप तिच्या देखत केले जात असत त्या सर्वांना ती मुद्देसूद उत्तरें देऊन गप्प बसवीत असे. तिची एकंदर वागणूकच अशी होती. तिचा जीवनक्रमच इतका व्यवस्थित व आकर्षक होता कीं सुशिक्षित स्त्रियांवरील आरोपाना तें एकच चांगलें उत्तर होतें. घरांतील भांडीं घासून, शेण लावण्या पासून सर्व कामें जातीनें करी व त्यानंतर वेळ काढून शाळेंत व क्लबांत जाऊन संध्याकाळीं ऐटीनें टेनिस खेळावयाचाही ती नियम पाळी. सारांश आपल्या प्रेमळ-

पणानें, सौजन्यानें व चांगल्या गुणानें ती प्रत्येकाला हवीशीच वाटत असे. कधींहीं कोणालाही तिनें दुखविलें नाहीं. घरांतील सर्व मंडळींना तर ती आवडेच आवडे पण विद्यालयांतील सर्व मुलींची ती प्राण होऊन बसली होती पण—

*  *  *  *

" अगं बाई, माली आतां केवढी दिसूं लागली, आतां अगदीं घोड नवरी झाली हो " टमाबाई म्हणाल्या—

" हा मेल्यानो, यानां काय तिला आतां मडम करावयाची आहे कीं काय कोण जाणें ? " ठकूबाई फणकारल्या.

" मला इच्या एवढ्या वयांत जगू, इंदी व चंदू झाले होते पण अजून इच्या लग्नालाही पत्ता नाहीं, काय बाई अलीकडची शिकलेली मंडळी काय काय, थेर थेर करतील तीं थोडीच, " आपल्या मांडीवरील तान्हुल्या मुलास थोपटीत व भोंवताली बसलेल्या त्यांच्याच ४।५ मुलामुलींच्या अंगावर ओरडत यशोदाबाई म्हणाल्या, जणूं काय स्त्री जन्माला येऊन डझन दीड डझन मुलांना भराभर जन्म दिला कीं अगदीं सार्थक झालं स्त्री जन्माचं !

वरील संवाद रामाच्या देवळांतील कट्यावर संध्याकाळीं देवदर्शनास आलेल्या बायकांच्यात चाललेला होता. आणि त्या बायकांचा हा नित्याचाच उद्योग होता. शेजारच्या पाजारच्या अविवाहित ' घोडनवऱ्यांची ' यादीच त्यांचे जवळ नेहमीं तयार असे आणि त्या त्या मुलींच्या माता किंवा इतर नातेवाइक

खियां देवळांत हजर आहेत असें पाहून अशा तऱ्हेनें टीका करण्याचा त्यांचा प्रघातच पडला होता.

मालीची आई सावित्रीबाई यांनीं हा संवाद ऐकला. असा संवाद त्यांचे कानीं पडण्याचा हा कांहीं पहिलाच प्रसंग होता, असें नव्हे. पण असें संवाद दररोज ऐकून ऐकून त्यांना आतां कंटाळा आला होता व पोरीला एकदां उजवून टाकलें पाहिजे असें त्यांनाही वाटूं लागलें होतें, इतकेंच काय पण त्यांच्या घरां-तील बायकांनी सुद्धां मालीच्या देखत असेच उद्गार काढावेत. त्यांना काय कल्पना कीं आपल्या या अशा उद्गारामुळें मालीला व तिच्या आईला काय वेदना होत असतील याच्या. मर्मभेदक शद्ब बोलणाऱ्या माणसाला याची कल्पना नसते. जेथून तीर सुटतो तेथें कांहींच जखम होत नाहीं, पण ज्या ठिकाणीं तीर जाऊन घुसतो तेथें तो कायमची खूण करीत असतो नाहीं कां ?

शिक्षणावर मालीचा अढळ अचल विश्वास होता. ती प्रवेश परीक्षेच्या वर्गांत दाखल झाली होती.

अखेर सावित्रीबाईच्या आग्रहानें अप्पानी स्थळें पाहण्यास सुरवात केली. चांगली दोन वर्षें हा उद्योग चालविला होता. ठिकठिकाणीं अप्पाना जे जे अनुभव येत गेले त्याचें एक रामा-यणच होईल. मालीला मात्र फार वाईट वाटूं लागलें. तिला या एकंदर समाजरचनेचाच मनस्वी राग येऊं लागला. मुलीचें लग्न ठरविण्यासाठीं एवढी मोठी खटपट पडावी. नाना गांवीं हिंडून पुष्कळ लोकांना दाखवून अक्षरशः जोडे फाटूनही शेवटीं निरा-

शाच पदरांत यावी याचेच तिला आश्चर्य वाटूं लागलें. स्त्री पुरुषाना समान हक्क अलीकडे प्राप्त झाले आहेत असे कितीही जरी कंठरवानें ओरडून सांगितलें तरी निव्वळ बाष्कळ बडबड यापेक्षां त्याला ज्यास्त किंमत नाहीं. असा तिला स्वतःचा अनुभव आला. मुलींना कितीही शिक्षण दिलें स्वातंत्र्य दिलें तरी पुरुषी अरेरावी जो पर्यंत आहे तोपर्यंत या स्वातंत्र्याचा कांहींही उपयोग नाहीं असेच तिनें ठरविलें.

अखेर—पण विधी लिखीत तसेंच होतें. एका बिजवराशीं तिचें लग्न ठरले. बिजवर वयानें फारसा मोठा नव्हता हे खरें चांगला धष्टपुष्ट काळा सावळा व घरचा बराच श्रीमंत शेत-वाडीचा मालक असा तो होता. पण पहिली बायको लग्नानंतर चांगली दोन वर्षांनीं मेली होती तेव्हां हा दोन वर्षाचा डाग होता ह्मणावयाचा असो.

लग्नाची जय्यत तयारी तर झाली. पाहुणे मंडळी जमली. लग्न समारंभ पार पडला. पुढचे सोहाळे उरकले. माली बंधनाच्या पाशांत सांपडली कांहीं तरी मोठी कामगिरी करून दाखविण्याची तिची उमेद नष्ट झाली व ती संसाराला जुंपली गेली. आणि थोड्याच दिवसांत:—

“ नाथ आज मी आजारी आहे आजच्या दिवशीं पृथक्शय्या ठेवली तर नाहीं का चालणार ? ” मालतीनें विनवणीच्या स्वरांत पृच्छा केली.

" तूं आजारी काय सदाच असतेस त्याचें मला काय ? लग्न केलें आहे तुझ्याशीं ना ? आतां काय उपयोग "

असें नव्हे नाथ पण ज्या गोष्टीनें तुह्माला सुख होईल त्या गोष्टीनें, मला भयंकर त्रास, माझे विलक्षण हाल होत असतील तर याचा थोडा तरी विचार करायला नको कां तुम्ही ? मालतीनें जरा धाष्ट्यानें विचारलें. नव्हे शारिरीक हाल फार होत असल्यामुळेंच तसें तिच्या कडून विचारलें गेलें. नाहींतर ' असें पती देवची ललनाना ' अशीच विचारसरणी अलीकडे तयार झाली होती. पतीनें नव्हे, नव्हे पतीदेवांनीं कोणचीहीं इच्छा प्रकटच करावयाची खोटी, त्या प्रमाणें ती पुरी झालीच पाहिजे इतकी श्रद्धा व प्रेम मालीचें जडलें होतें पतीवर आणि लग्न झाल्या नंतर फक्त कांहीं महिने जो कांय निकट सहवास तिचा व तिच्या पतीचा झाला होता तेवढ्यातच तिचा पती पक्का स्वार्थी व पूर्णपणें सुखलोलुप आहे असें तिला आढळून आले होते. तिची सवत तिच्या लग्ना-आधीं फक्त १५ च दिवस मेली होती.

" दरवेळींच तुझें हें रडगाणें आहे. तूं जर अशी सारखीच आजारी पडूं लागलीस तर मग मी काय करावें ? " पतीनें जरा चिडक्या आवाजांतच पृच्छा केली.

" त्याला माझा काय बरे इलाज ? शक्य तितके सोसून मी आजपर्यंत तुमची इच्छापुरती करीत आले आहे ना ! पण आज-चाच दिवस मला सहन होत नाहीं म्हणून विनवणी करीत आहे एवढीं. "

"ते आज कांहींही ऐकावयास मी तयार नाहीं. मी ब्रह्मचारी राहण्याकरतां तुझ्याशीं लग्न केलें नाहीं" असें ह्मणून अखेर मालीच्या पतीनें जें करावयाचे तें केलेंच. त्यामुळें मालीला किती वेदना झाल्या त्याची त्यानें मुळींच पर्वा केली नाहीं. आणि आश्चर्य असें कीं असें प्रकार त्यानंतर वारंवार घडूं लागलें. मालीची प्रकृती अधिक अधिक खालावत चालली तरी त्या विषयीं तिच्या पतीला यत्किंचितहि दया येईना. ती ज्या ज्या वेळीं प्रतिकार करी त्या त्या वेळीं तो तिला सांगत असें कीं मी बिजवर आहे. रक्ताला चटावलेला वाघ म्हणतात ना, तशी माझी अवस्था झाली आहे. मी आजपर्यंत ब्रह्मचारी राहिलो असतो तर कदाचित तुझ्या ह्मणण्या-प्रमाणें वागलो असतो. पण आतां तें शक्य होणार नाहीं. आतां माझ्या प्रमाणेंच तुला वागले पाहिजे. एके दिवशीं रात्रीं माली खूपच चिडली व "असें करून तुम्ही मला मारून टाकाल एके दिवशीं" असें म्हणाली. जिवाचा वैताग येऊन हृदय पिळवटल्याळें हे शब्द बाहेर पडले होते. त्यावर तिचा नवरा म्हणाला.

"मेलीस तर मेलीस, मला काय आणखी एक बायको मिळेल, आणि लौकर सुटलीस तर आणखीनच बरं होईल." अशा उत्तरानें मालीच्या मनानें धसकाच घेतला.

जगांत येऊन कांहीं तरी उच्च ध्येय पुढें ठेऊन कांहींतरी कर्तबगारी करून दाखवावी व आपलें नांव करून ठेवावे, इत्यादि सर्व विचार ठिकच्या ठिकाणीच राहिलें. तिला मिळालेल्या शिक्षणाचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

तिच्या पतीच्या सर्व इच्छा पूर्ण करण्याची तिनें आतां मानसिक तयारी केली. स्त्री ही अबला आहे व पतीवरच तिचें जीवन पूर्णपणें अवलंबून आहे, याची तिला खात्री पटली. तिचा पतीही कांहीं मोठा शिक्षण प्रेमी वाङ्मयविशारद रसीक कवी नव्हता. तो फक्त एकच व्यवहार जाणत होता.

आणि अखेर तिच्या दैव योगानें शेवटची वेळ आणलीच. तिची प्रकृती खालावत जातां जातां कळस झाला. शेवटीं डॉक्टर्स धावले. तिचा ताप वाढत चालला. संध्याकाळीं ताप आला. असाच ४।८ दिवस ताप येतच होता. शक्ती क्षीण होत होती. तरीही कामांध पतीनें तिच्यावर गय केली नाहीं. अखेर मालीचें प्राणोत्क्रमण झालें. आई बापांना मुलगी नाहींशी झाली. सर्व जण दुःखसागरांत बुडाले. जिकडे तिकडे हाहाकार झाला. मालीच्या माहेरी आकांत झालें. त्रिजवरानें मालीचा बळी घेतला. सर्व जण असेच बोलूं लागले, पण सासरीं—

मालीच्या सासरीं तिच्या पतीला वाटूं लागले ठीक झाले, लौकरच मोकळा झालो. मी आतां नवी चांगली शक्तीवान बायको करून आणीन. मालीसारखी अशक्त नको मात्र. मालीच्या सासऱ्याला वाटले ठीक झालें. मुलाच्या या दोन लग्नाचा हुंडा चांगले तीन हजार रुपये शिवाय करणी होय नव्हे अमुक तमुक शिल्लक पडलेंच आहे. आणखी एक दोन हजार रुपये उकळाव्यास हरकत नाहीं. मालीच्या बापानें सर्वांत वरकडी केली. ह्मणजे मालीच्या शेवटच्या अजारीपणाची बिलें मालीच्या बापा-


कडे पाठवलीन सोबत निरोपही पाठविलान कीं बिलें तुम्हीच भरली पाहिजेत. तुमचीच मुलगी नेहमींचीच अशक्त असल्यामुळें ती आजारी पडली तेव्हां सर्व बिलें तुम्हीच देऊन टाका.

मालीच्या नवऱ्याला किंचित् दुःख झालें पण त्याला कारण पुन्हां लग्न होईपर्यंत अल्पकाळ कां होईना पण विरह सोसावा लागणार म्हणून. यापेक्षां त्याला जास्त वाईट वाटलें नाहीं. कारण लग्नानंतर अवघ्या ८।९ महिन्यांतच सर्व कारभार आटोपला होता मग तेवढ्यात सहवास काय मिळणार आणि प्रेम काय जडणार ? एवढा वेळ तर तारूण्यातली उन्मादवस्था कमी होण्यातच गेली, नव्हे हा काळही अपुराच पडला. तेव्हां त्यांतून बाहेर पडून—वैषियिक प्रेमांतून बाहेर पडून, सहवासजन्य व चिर-काल टिकणारें प्रेम उत्पन्न होण्यास अवसरच सांपडला नाहीं. आणि त्यांतूनही त्यांचा स्वभाव ह्मणजे ! अतीशयच वैषयिक रक्ताची चटक लागलेलें श्वापदच तें झालें होतें. मग त्यानें हा मालीचा असा बळी घेतला यांत काय नवल ?

आणि अखेर मालीच्या मृत्यूच्या दुसऱ्याच दिवशीं त्यानें एक मुलगी सुद्धां पाहिली व नाइलाज म्हणून जनलज्जेस्तव फक्त दहा बारा दिवस मध्यें जाऊन देऊन पंधराव्या दिवशींच आणखी एक लग्न ठोकलें देखील ! चांगली सुरेख मुलगी आणली करून घरीं. मालीच्या सासऱ्याला पुन्हां पैसा मिळाला. खर्च मुळींच करावा लागला नाहीं. मालीचेच दागिने फार काय तिलाच घेतलेली सर्व लुगडींही पुन्हां उपयोगी पडली जशीच्या तशी. वास्तविक अशा

वेळीं मालीच्या सासऱ्यानें मालीच्या बापास हुंडा परत करून टाकावयास हवा होता, पण जेथें त्यानें मालीच्या बापास लग्नासही बोलावलें नाहीं तेथें दुसरी बात कशाला !

कलिका उमलूं लागली होती. ती पूर्ण विकसित होऊन जगभर आपला सुगंध दरवळून टाकण्याचा तिचा विचार व निश्चय होता. पण एका विषयांध माणसानें आपल्या विषारी वायूनें तिला करपून टाकली, राठ हातानें व निर्दय अंतःकरणानें तिला खुडुन घेऊन हुंगून तिचा नाश करून टाकला. दुर्दैव त्या कलिकेचें दुसरें काय ?



## पुष्प ९ वें.

# कुसुमशरविद्ध !

लेखक—
श्री. दत्तात्रय बळवंत लेले.
बी. ए. एल्. एल्. बी. वकील.

तो कुसुमशरानें विद्ध झाला होता. निसर्ग नियमानुसार ऋतूंत बदल झाला होता. हिवाळा संपून वसन्त बहरला होता. कोकिळांचे आलापांनीं वातावरण संगीतमय झालें होतें, तर आम्रवृक्षावर नुकत्याच फुटलेल्या मंजऱ्यांनीं उन्मादकारक सुगंध सभोंवतालीं पसरला होता. धवल चंद्रप्रकाशानें यांत भर घातली होती. फुलांनीं नटलेल्या लहानशा बागेंतच तो केव्हांचा एकटाच फिरत होता. त्याच्या लहानशा टुमदार घराभोंवतालचीच ती बाग होती. तो आपल्या प्रियेची उत्कंठतेनें वाट पहात होता.

त्याचें लग्न होऊन फक्त दोन तीनच महिने झाले होते. पण एवढ्या अवधींत तो आपल्या प्रियेवर इतका अनुरक्त झाला होता, कीं त्याला तिच्या शिवाय दुसरें तिसरें कांहींच सुचत नसे. सदा सर्वकाळ ' ती ' नेहमीं जवळ असावी असें त्यांस वाटे. पण चार माणसांच्या घरांत लौकिक व व्यावहारिक अडचणी इतक्या असत कीं, त्याच्या मनासारखें घडणेंच

अशक्य होतें. अशावेळीं हिंदू एकत्र कुटुंबपद्धतीचा त्याला मनापासून राग येई. लग्न झाल्यानंतर नूतन पतिपत्नींनीं कोठली तरी लांबची सफर काढण्याची उत्तम पद्धतहि आपल्याकडे नाहीं. वास्तविक हें अगदीं सहज शक्य होण्यासारखी, त्याची सांपत्तिक परिस्थिति होती. पण घराणें पडलें बाळबोधवळणीं, त्यामुळें त्याला प्रियेशीं चार शद्ब बोलण्याची, छे तिच्याकडे बघण्याची सुद्धां, चोरी असें. त्याचा अगदीं कोंडमारा होऊं लागला. लग्न होण्यापूर्वीं वधुमुख पाहण्याचे फासांतून तो गेला होता. पण यापेक्षां वधूची जास्त माहिती त्याला मिळाली नव्हती. पण लग्न झाल्यापासून इतर गोष्टींची चौकशी करावयास त्याला वेळ होता कुठें ? सर्व दिवसभर काबाडकष्ट करून दमलेली सासुरवाशीण ती गादीला पाठ लागतांच जी निद्रावश होई, ती दुसऱ्या दिवशीं सकाळींच जागी होई. निदान तसें त्याला वाटे एवढें खास.

आजहि झालें असेंच. त्याला वाटले त्याची प्रिया बागेंत येईल, त्याला शोधून काढील, मग चांदण्यांत लपंडावाचा खेळ होईल, लताकुंजखाली गप्पा गोष्टी मारण्यांत स्वर्गीय आनंद लाभेल आणि एकमेकांच्या सहवासाचा अत्युत्तम आनंद दोघानांही भरपूर लुटतां येईल पण—तसें कोठले होणार ?

तिनें आपलें काम आटोपलें आणि ती सरळ शय्यागृहांत शिरली. तो तेथें नाहीं असें पाहून तिला वाईट वाटलें नाहीं. आश्चर्य मात्र थोडेसें वाटलें. पण ते फार वेळ टिकलें नाहीं मात्र थोडेसे बरे वाटले. पोलक्याच्या खिशांतून सकाळींच आलेली

शशिकांताची चिठ्ठी तिनें बाहेर काढली आणि तिचा प्रथम चुंबन घेऊन नंतर तिनें भराभर वाचावयास सुरवात केली. एकदां, दोनदां, तीनदां, दहादां चिठी तिनें वाचली पण तिचें समाधानच होईना. ती चांगली अर्धा तास ती चिठ्ठी वाचत होती व तिचे वारंवार चुंबन घेत होती. त्या चिठ्ठीलाच ती आलिंगन देत होती. आणि नंतर—पण अजूनही तो परत आला नाहीं म्हणून तिला बरे वाटले.

त्यानें संध्याकाळीं आपल्या शय्यागृहांत मुद्दाम फुलें आणून ठेवलीं होतीं. नानातऱ्हेची सुगंधी फुलें मुद्दाम मेजावर ठेवून तो बागेंत आला होता आपली प्रिया खोलींत जाईल नंतर सुंदर पुष्पाची मनोहर माला गुंफून आपल्या करतां येथें धांवत येईल असें मनोराज्य करीत तो हिंडत होता.

आणि इकडे मेजावरील फुलें तिनें घेतलीं, दोन चार पुष्पांनीं तिनें त्या चिठ्ठीची पूजा केली. नंतर पुन्हा ती मेजाजवळ गेली, लिहावयाचें साहित्य घेऊन तिनें त्या चिठ्ठीचें उत्तर लिहिलें. नंतर तें एका लिफाफ्यांत घातलें, वर पत्ता नाजूक हातांनीं लिहिला, बंद करून ते आपल्या पोलक्याचे खिशांत ठेवून दिलें; आणि आपल्याकरतां वेगळ्या घालून ठेवलेल्या बिछान्यावर जाऊन पडली. हां हां म्हणतां ती निद्रांकित आणि शशिकांताशीं स्वप्नसृष्टींत विहार करूं लागली सुद्धां ! ! आणि तो—तळमळत वाट पहात, विचार करीत, थोड्या वेळानें आपण असा विहार करूं, तसा विहार करूं, असें मनोराज्य करीत, उत्कंठित अवस्थेंत

नुसताच हिंडत होता. अखेर कंटाळला आणि शय्यागृहांत गेला.

सुखस्वप्नांत शशिकांताशीं विहार करीत हंसऱ्या वदनानें ती निजली होती. तिचें हास्यवदन पाहूनच याला आनंद झाला. आणि तिची ही आनंदी अवस्था कशाला मोडू असा पोक्त विचार करून, तो तसाच तिला न उठवतांच आपल्या बिछान्यावर जाऊन निजला.

* × *

त्यांचा विवाह होऊन दोन तीनच महिने झाले होते. त्यांचा विवाह अगदीं पूर्णपणें केवळ पत्रिकाच पाहून झाला होता. वधुवर पाहण्याचें औपचारिक काम उरकलें होतें हें खरें पण ज्याप्रमाणें रस्त्यानें जातांना आपण पुष्कळ लोकांचें चेहेरे पाहतो त्याच-प्रमाणें हा प्रयोग झाला होता. दोघांच्या आवडी निवडी किंवा स्वभाव यांची एकमेकांना तर मुळींच माहिती नव्हती, पण तिची आवड सुद्धां तिच्या वडिलांना किंवा आईला सुद्धां माहीत नव्हती.

वस्तुस्थिती अशी घडली होती कीं तिचें शशिकान्तावर आणि शशिकान्ताचें तिच्यावर प्रेम जडलें होतें. दोघांचा सहवास कांहीं कांहीं कारणावरून बराच काळपर्यंत मोकळ्या मनानें झाला होता, दोघेहि एकमेकांशीं फारच प्रेमानें वागत असत. निसर्गानें आपलें काम केलें होतें. दोघांच्याहि मनांत एकमेकाविषयीं आकर्षण उत्पन्न झालें होतें आणि तें आकर्षण दिवसेंदिवस इतकें वाढत

गेलें होतें कीं दोघांनाहि एकमेकांना भेटल्याशिवाय चैनच पडत नसे, पण ही महत्वाची गोष्ट तिच्या वडिलांच्या किंवा तिच्या आईच्या कोणाच्याच ध्यानांत आली नव्हती. त्यांनीं कधीं इकडे लक्षच दिलें नव्हतें. नेहमींच्या रिवाजाला अनुसरून त्यांनीं ठिकाणें पाहून त्यांतील एक पसंत करून तिला उजवून टाकलें होतें. तिची सम्मति कधीहि विचारली गेली नाहीं आणि तिनें किंवा शशिकांतानेंहि याचा कधीं विचार केला नाहीं, या पैकीं एकहि गोष्ट त्याला अर्थातच माहीत नव्हती. आणि असा हा तिचा व त्याचा विवाह घडून आला होता.

* * *

आजचा दिवस त्याच्या आयुष्यांतील अत्यंत महत्वाचा ठरला. या दिवसानेंच त्याच्या मनाच्या आणि पर्यायानें त्याच्या आयुष्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडविल्या.

तिच्या चिठ्ठीप्रमाणें शशिकांत आज दुपारी आला. घरांत तिची सासू सासरा होती. प्रत्यक्ष तो आज घरींच होता. कांहीं तरी सबब सांगून घरीं राहिला होता तो. कांहीं विशेष घडणार म्हणून नव्हे तर दुपारचे वेळीं तिच्याशीं चार शब्द निवांतपणें बोलावयास मिळाले तर पहावे, म्हणून तो राहिला होता. दुपारचे वेळीं दोनचे सुमारास तो आपल्या खोलींत जाऊन बसला.

तिला हांक मारणार इतक्यांत बाहेर बूट वाजले. कोण आलें म्हणून पहाण्याकरतां तो बाहेर आला.

एक अगदीं अपटुडेट् पोषाख केलेला तरुण बाहेर उभा होता. त्यानें " मी तिला न्यावयाकरतां आलों आहे, माझें नांव शशिकांत आहे, असें तिला सांगा, " असा निरोप प्रत्यक्ष तिचा, त्याच्याजवळ सांगितला. त्याला याचा अर्थच समजेना, क्षणभर तो बुचकळयांत पडला, पण तिनेंच त्याची यांतून मुक्तता केली. शशिकांताचा शब्द ऐकतांच ती धांवतच बाहेर आली, व म्हणाली " शशिकांत, केव्हां आलास, ये आंत ये, असा बैस जरा. आपण अगदीं एक तासाचे आत निघूं बरं कां "

नंतर त्याच्याकडे वळून ती म्हणाली, " हे शशिकान्त बरं कां, मी यांच्याबरोबर जाणार, जास्त खुलासा मागाहून पत्रद्वारा करीन " असें म्हणून शशिकान्ताला घेऊन ती आंतल्या खोलींत गेलीं.

सासू सासऱ्यांना ही हकीकत समजली त्यांनी त्यालाच प्रश्न केले. तोहि भांबावून गेला होता पण, " माहेरचा तिचा भाऊ आहे. माहेरी न्यावयास आला आहे. " अशी सरळ थाप त्यानें मारली आणि वेळ मारून नेली.

शशिकान्ताला पाहतांच तिला एवढा अत्यानंद कां व्हावा याचेंच कोडें त्याला उलगडेना. त्याला पाहतांच तिनें केलेला लाडका अभिनय त्याच्या तीक्ष्ण नजरेतून सुटला नव्हता. ती दोघे प्रथम दूर नंतर थोड्या अंतरावर गेल्यावर, एकमेकांचे हातांत हात घालून खोलींत शिरली, हें दृश्यहि तो विसरला नव्हता. पण असें कां, याचें उत्तर त्याला सांपडेना.

एक मासाचे आंत माहेरी जाते, ' बाबा आजारी असल्यानें शशिकान्त मुद्दाम न्यावयास आले आहेत ' अशी बनावट थाप सरळ सासू सासऱ्यांना मारून ती शशिकान्ताबरोबर बाहेर पडली. त्याला फक्त एवढेंच तिनें सांगितलें कीं, ' माझ्याबद्दल काळजी करूं नका. मला विसरून जा. पत्रानें खुलासा होईलच '

शशिकान्त श्रीमंत होता, सद्गुणी होता, कवि होता, रसिक होता. ती माहेरी म्हणून जी गेली, ती शशिचेच घरीं जाऊन राहिली. दोन प्रेमी जीव एकमेकाला मिळालें. समाजाची पर्वा दोघानीहि केली नाहीं. प्रेमांत, आनंदांत, विहारांत सदा सर्वकाळ निमग्न अशी तीं दोघें राहूं लागली.

तिनें कबूल केल्याप्रमाणें खुलासेवार पत्र लिहिलें ' माझा विवाह तुमच्याशीं लागला, पण मानसिक लग्न मात्र शशिकांताशीं पूर्वींच लागलें होतें. आम्ही दोघांनीं एकमेकांना वरलें होतें. आणि मी त्याना वचनानें बांधली गेली होत्यें. जीवात्म्याचीं एकी झालेली होती, म्हणून मला तुम्हाला सोडून इकडे येऊन शशीकांताचे जवळ रहावे लागत आहे आणि मी राहणारच.

तुमचा किंवा माझा कांहीं दोष नसतां आपण दोघासहि न विचारतां आपला विवाह लावला तो आपल्यावर बंधनकारक नाहीं. तुम्हीं स्वतंत्र आहा आणि मीहि असे राहण्यास पूर्णपणें स्वतंत्र आहे. तुम्हाला वाटेल ते करा. पुन्हा असें स्वतः फसूं नका, पत्राचें उत्तर लिहूं नका कारण शशीबरोबर मी घालवीत असलेल्या

आनंदमयी काळांत तुमचीं रडकीं पत्रें वाचण्यास मला फुरसत नाहीं.

तुमची ( फक्त लग्नानें )
पण मनानें
फक्त शशीचीच
ती "

पत्र वाचल्यापासून त्याचा आनंद पार मावळला आणि तो इकडे तिकडे भटकूं लागला. खिन्न अंतःकरणाचा दगडी पुतळाच तो बनला. त्याला संबंध आयुष्यांत हंसतांना त्या नंतर कोणीहि पाहिलें नाहीं. आणि ती मात्र त्यानंतर नेहेमीं हांसतच होती. तिला संबंध जन्मांत रडतांना कोणीच पाहिलें नाही.



पुष्प १० वें

# दोन स्वर्ग.

लेखकः—

राजाराम विठ्ठल जोशी.

उजाड शेतांत लहानसेंच घर दिसत होतें. अफाट दर्यांत लहानशी नाव तरत असली तरी किती खुलुन दिसते ती. भयापेक्षां हृदयसागरांत आनंदाचें तुषारच उडतात, किंवा मन बुद्धी चित्त व प्राण यांच्या चौकोनी हौदांत प्रसन्नतेचीं कारंजीं उडतात म्हटलें तर कांहीं ती केवळ कल्योक्तीच ठरणार नाहीं. महोदधीच्या उदरांत मोती आणि रत्नांचा, किंवा सौंदर्याचा संचय असतो आणि सागर म्हणजे सौंदर्याची नुसती सीमाच असते आणि म्हणूनच " जातीच्या सुंदरा " च्या पृष्ठभागावर एकाकी नांव सुद्धां उजळून दिसते. पण भूमि आणि आप यांचे अनुभव एकच नसतात. ब्रम्हवेत्यांनीं सुद्धां भूमि आणि आप ही वेगळीं तत्वेंच मानली आहेत. सोनसळी सागरावर डुलती नाव खुलली तरी अफाट—उजाड भूमीवर बैठें वर कांहीं शोभा देत नाहीं.

वैशाखांतील दिवस ते. सहस्त्ररश्मि नुसता तळपत होता. भूदेवीवर नुसती आग पाखडीत होता. भूपृष्ठच काय, पण भूहृदय सुद्धां उन्हानें करपून निघत होतें. एरवींच्या ऋतूंत काळ्या जमीनिशी मैत्री करणारी हिरवी—पिवळी

धान्याचीं उंच ताटें व पिकें "आगीच्या खांईत" आपल्या सखीला एकटीच सोडून निघून गेली होतीं. सर्वत्र एकाकी उजाड जमीन एकाकी रवी आणि बैठें घर. नाहीं म्हणावयास शेतांच्या बाजूनें नागमोडी वळणें घेत गेलेली रेलवे रूळांची दुकल शेतांना दुरुन कां होईना संगत सोबत देत होती. 'भक् भक् भक्" अग्नीरथाचा भूत्कार झाला आणि मोत्या पंचप्राण एकवटून त्वेषानें शत्रूवर तुटून पडला. सरड्याची धाव कुंपणापर्यंत आणि मोत्याची तरी किती ? शेताच्या समिजवळ असलेल्या आऊटर सिग्नल पर्यंत. अग्निरथ मोत्याच्या दृष्टीपथाच्या कक्षेंतूनही नाहींसा झाला.

" बाईसाहेब हें असं करून कसं व्हावं ? विठा माईना आर्जव करीत होती. आज महिना झाला अन्नपाण्याविना प्राण सुकविता आहां. जिवाचं हे " काई बाई " कशा पायीं चालवलं आहे. लिंबासारखा देह तुमचा ! पण वाळलेल्या साली कीं झाल्यात, उठा, माई, माझं म्हातारीचं जरा ऐका डोळे कसे खोल आणि बटबटीत दिसतात बघा. आणि मान तरी कशी उंटासारखी झालीया. हातांतील बांगड्या बघा कीं कोपऱ्याखालीं चालल्या. काय राह्यलयं तुमच्या कुडीतं ! व असा त्रागा करून कुठं दिवस निघतील होय ? अजून लईलांब मजल जायची हाय, माई, गड्या माणसांनीं दुसरं लगीन केलं तर बायांनीं असं रक्ताचं शिपणं कशापायीं हो करायचं ? असं कसं हो तुम्ही शेणीं माणसं करतां सा ! झालेली गोष्ट आणि गेलेली घडी पुन्हां फिरत नाहीं बघा माई. माझ्या मालकानं दोन

लग्न केलीं बघा पण मी काय त्येचा हात धरला काय? तुमच्याबिगर जास्त जिमिन डोक्यावर घेतली. डोक्यांचे केस न केस गळले होते बघा माझे. बाईलीन जरा दुसरीकड बघितल्याचा संशय आला, तर दादला दैवापुढं पंचायती भरवून न्यायनिवाडा करून घेतो, पण आमच्या बायांच वेगळ रहातं माई, आमच्या डोळ्यादेखत आमच्या माणसांनीं दुसरं लगीन केलं, अगर दुसरी आवा घरांत आणली—तर आमचा काय न्यायनिवाडा होतो काय? पावसानं झोडलं अन् राजानं मारलं तर फिर्याद हीं कुणाकडं न्यायची! जिच्यावर विश्वासानं पाय ठेवायचा तीच जमीन जर तापूं लागली अगर हलूं लागली तर माणूस काय करील हो?" आणि याच वेळेला विठाची पूर्वस्मृती तिच्या डोळ्यांतून वाहूं लागली, शरीराच्या संक्रमण अवस्थेत वृद्धापकाळीं शरीर क्षणि झालें तरी मन आणि दुःख हीं कांहीं क्षीण होत नांहीत. वृद्धापकाळीं सुद्धां तारुण्यांतील जखमा मुखावाटें आणि डोळ्यावाटें वाहूं लागतात. विठा कळवळून सांगत होती. कारण तिनें माईचें दुःख जाणलें होतें. "उठा माई अंगावर दोन तांब्रेपाणी घेऊन चुलीला कांहीं लावा आणि दोन घास खा. जिवाचं वाळवण करून उपयोग नाहीं. ओलवण करा माई, मग बघूं त्येचा ईचार." इतके बोलून विठा मालकिणीच्या उठण्याची वाट पाहूं लागली. माई उठल्याकीं चार लांकडे आणून द्यावी, विहिरींतील, आंघोळीला, चार कळशा पाणी उपसाव, अन माईनीं दोन घास खाल्ले कीं आपणही ओली कोरडी गोड करावी, अशी तिची मनीषा.

" पण ! विठा, शब्दानं तरी कळवायच होतं किंग मला ! त्यांनीं त्रागा करूं म्हणून होतो—होयग विठा. एकेक आठवणं म्हणजे त्रिभुवन आठवल्या सारखं होतं बघ ! इतकीं वीस वर्षें एके ठिकाणीं राहून माणसं इतकं कपटाचरण कसं करतात ग ! किती कष्ट नि खस्ता खाल्लया ग मी यांच्या करितां ! देसायांच्या घरांत चंदनाच्या काष्टाप्रमाणें हाडं कीं ग झिजविली मी ! झाडाच्या फांद्या नि साटे तोडले म्हणजे बूड जस उरतं तसं कीं ग झालं ! शेण गोठा करण्यापासून कुठल ही काम हलकं म्हणलं नाहीं. भल्या पहाटे उठून जात्यावर तासन्तास बसले. भाजीपाल्याला पैसे खर्चे होऊं नयेत म्हणुन कंबरेवरून पाण्याचा घागरी बदा-दा ओतल्या असतील झाडांना ! घरच्या देवपूजे करितां फुलं पाहिजेत, पण ती पुरवून उरलेल्या फुलाचा मक्ता माळ्याला देऊन पैसा केला, एक का दोन सांगू तरी किती ग ! विठा, इतकें म्हणुन माईना पोटापासून उमाळा आला. डोळे आणि उदर यामध्यें जरी बरेच अंतर असले तरी त्या दोहोंच्यामध्यें हृदय आहेच कीं नाहीं. डोळ्यांनीं पाहिलेल्या गोष्टी हृदयांतच सांठविल्या जातात. आणि पोटाला पडलेले पीळ सुद्धां स्मृतिरूपानें अंतःकरणांत सामावलेले असतात. जिवापाड केलेल्या कष्टांची स्मृती, हृदयांत जागी झाली, कीं ती हृदय ओलांडून पोटांपर्यंत जाऊन भिडून तेथील किल्मीष घेऊन डोळ्यावाटें बाहेर पडत होती. माईना सहन झालें नाहीं कीं त्या जमिनीवर लोळण घेत होत्या. अंतरंगांत नुसती आग पेटत होती. रक्ताचा प्रत्येक बिंदू तापला होता. जमीन शेयटच्या

अंशापर्यंत तापली कीं पर्जन्यवृष्टी होते. प्रथम प्रथम धो-धो वृष्टी झाली तरी दमादमानें सरीवर सरी अवकाशा अवकाशानें येतात. तद्वतच माईंचे रक्त कमालीच्या अंशापर्यंत तापून मधून मधून सरीवर सरी वर्षत होत्या. अती वृष्टी नि अनावृष्टी दोन्हीही अनिष्टच, पण माईंना दोहोंचा ही अनुभव घ्यावा लागत होता. हृदयाकाशांत दुःख कष्ट यांच्या विजा कडाडल्या कीं मेंदूच्या कवटीपर्यंत त्यांचा प्रकाश पडत असे, आणि दातांचा व बोटांचा कडकडाट होऊन माईंच्या नयनांतून अतिवृष्टी होत होती. जमिनीवर पाणी टाकलें असते, तर पांच मिनिटांत त्याचा मागमुसही लागला नसता. पण माईंचा पदर मात्र ओला चिंब होता. आणि माईंच्या कपोलाऐवजी नाकावर लाली आली होती.

माई आपले ऐकत नाहींत, हे पाहून विठेला राग आला. ती फणकाऱ्यानें म्हणाली. " माणसानं लई करूं नये बघा माई. हाय समदं मला माहीत. ठाव नसल त्याला सांगाव लागतय ! माझिबी तुमच्या घरांत बारा वर्सं गेलीत. "

एरवीच्या वेळीं विठा रागावली असती तरी माईंनीं त्याची इतकी पर्वा केली नसती. पण आज सगळ्या दुनियेनें टाकल्यानंतर दुःखाच्या कडेलोटांत माईंच्या मागें छायेप्रमाणें फिरणारी विठा—म्हणजे खरोखर संत सखूची विठाईच होती.

माई उठल्या. विठेनें भरभर विहिरीवरून दोन कळशा पाणी ओढले. उन्हाळ्याच्या दिवसांत घरांत माठ भरतात. पण

घराबाहेर खोल दगडी माठ असतात. आणि विहीरींतील पाण्याचा गुण नि वाण कुठें माठाच्या पाण्याला येतो कां ?

मानवी प्राण्याचीं दु:खें निवारण करण्याच्या कितीही विविध औषधी निसर्गानें निर्माण केल्या असल्या, तरी शीतल वायूच्या लहरी नि शीतल पाण्याचा स्पर्श ह्या दोहोंची सर इतरांना कशी येणार ? देवादिकांच्या स्वर्गांत अमृतानें अमरत्व येत असले, तरी पृथ्वीवर संत्रस्त झालेल्या मानवी प्राण्याला शीतल उदक आणि शीतल वायु या सारखे दुसरे कांहींही नाहीं. माईनीं अंगावर पाणी घेतलें. आज ३–४ दिवसांत स्नान केलें नसल्यामुळें सहजच त्याना आपलें अंग स्वच्छ धुण्याकरितां हात पाय हालवावे लागलें शरीराची नि मनाची हालचाल दुसऱ्या बाजूकडे वळली. माई दु:खानें नि अन्नानें इतक्या गळल्या होत्या, पण आंघोळ झाल्यावर लुगडे पालटतानां त्यांच्या तोंडून शिवलीलामृतांमधील सीमंतिनीचा सहाव्या अध्यायाचा उच्चार होऊं लागला. शिवरात्रीचें दिवशीं झाडावर बसलेल्या व्याधाचे हातून सांबाच्या पिंडीवर खालीं बिल्वदलें पडलीं म्हणून भोळा सांब प्रसन्न होऊन त्यानें व्याधाची व्याधिहरण केल्याची कथा माईना माहीत होती. माईंचे हृदयांत भक्ति प्रगटली. एक नवीन आसरा नि नवीन आधार मिळाल्यासारखें त्यांना वाटूं लागलें. कांहीं तरी गमावलेली वस्तु परत मिळाल्यासारखें त्यांना वाटूं लागलें. हृदयांत भाव आणि भक्ती यांचा फुलोरा फुलला कीं कर-कमळें आपोंआप जुडलीं जातात, आणि एक तान्तेमुळें चर्मचक्षु मिटलें जाऊन

अंतःचक्षु उघडतात आणि आराम खुर्चीची घडी करावी तशी शरीरयंत्राची घडी गुडघ्यावर होते. माईनीं गुडघे टेकले होते आणि माईच्या तोंडून सहजगत्या त्याचें नेहमीचें पद बाहेर पडत होतें.

" शिवसांब सदाशिव रमणा हो—
क्कां न ये दिनाची करुणा
शिवसांब' शिवसांब —"

माई त्या स्थितींत किती वेळ होत्या कोणास ठाऊक पण त्यांच्या समाधीचा भंग विठेनें केला. " माई ! लाकडं आणलीत बघा बांधा-वरून, विठी म्हणाली नि माई देहस्थितीवर आल्या. माईनीं चुलीला लाकडें लावलीं नि विहिरीचें पाणी स्वयंपाका पुरतें कळशीभर त्यांनीं आणलें. त्यांच्या मनांत आतां विचारांची प्रतिक्रिया सुरू झाली, यांतून शिवसांब जसा नेईल तस जायंच. माईचा निश्चय झाला त्या पुन्हां गुणगुणू लागल्या.

" दीनानाथा नाथा भव-नदि पार ने-ए-ई
दुस्तर हा भवसिंधू तरण्या धीर दे-ए-ई. "

विचारांचें परिवर्तन वा प्रतिक्रिया म्हणजेच परमेश्वरी प्रेरणा. माईनीं चार घास घेतलें. उपाशी पोटीं अधाशाप्रमाणें अन्न गेलें. म्हणजे अन्न ब्रह्माचा अंमल येतो. निळंगी येते, माई पाटाला डोकें टेकूनच आडव्या झाल्या आणि पडवीला विठाहि कलंडली.

दिवसामागून दिवस चालले होतें. पण माईच्या मनस्वास्थ्यांत थोडी थोडी सुधारणाच होत होती. पण आज बातमी आली

होती कीं त्यांचे पतिराज त्यांना भेटावयास येणार होते म्हणून. माईंना खरोखर आतां तुटक रहाण्याची इच्छा होती. त्यांना मनांतून त्यांच्या पतिराजांचें दर्शन न झालें तरच बरें असें वाटत होतें. भेटून नवीन तें काय निष्पन्न होणार होतें. पुन्हां पुन्हां तेंच तेंच चऱ्हाट ऐकण्याची त्यांची इच्छा नव्हती. नानांच्या विषयीं त्यांचे मनांत तिरस्कार, तिटकारा आणि द्वेष भरून येत होता. त्यांच्या मनांत आपण दुसरीकडे कुठेंतरी जाऊन गाठभेट चुकवावी असे आले. पण तो विचार फार काळ टिकला नाहीं. त्या थोडावेळ विचारांत चूर होत्या तोंच पोस्टमननें रमाबाई देसाई म्हणुन एक पाकीट घरांत टाकलें. माई झटकन् उठल्या नि हापापलेल्या नजरेनें नि हातांनीं त्यांनी तें पाकीट फोडलें. फारा दिवसांनीं एकादा जीवलग भेटावा, तसें त्यांना झालें. माई वाचूं लागल्या:—

प्रिय माई ,

तुझी हकीकत ऐकून माझ्या डोक्यांत कसे किडे पडल्या सारखं वाटत ! मग तुझी अवस्था काय होत असेल देव जाणें ! माई तुझी मी धाकटी बहीण. तुला मी काय लिहावं. तुझी जी स्थिती ती पुष्कळशा अभागी हिंदु गृहिणींची स्थिती आहे. अन्न, वस्त्र नि घर या रोजच्या गरजांच्या बाबतींत प्रत्यहीं पुरुष वर्गावर जिणं अवलंबून ठेवणाऱ्या स्त्रीवर्गाची अवनत व असहाय स्थिती, दोन वर्षापूर्वी कॉलेज मधून बाहेर पडण्या पूर्वीच मला समजून आली.

वैवाहिक आयुष्यांतहि पुरुष वर्गानें एकछत्री, एकतंत्री सवलतींचा मक्ता आपल्याकडे ठेवून, स्त्रियांना वैवाहिक आयुष्यांत पक्या बंदिस्त करून ठेवल्या आहेत, याची पक्की जाणीव मला झाली आहे. व्यवहारी जगांत व प्रचलित हिंदु समाज पद्धतींत, संपत् व सत्ता धारण करणाऱ्या जुलमी पुरुषांनीं व पूर्वीच्या सरंजामी ऋषींनीं, धर्मस्मृतीकारांनीं, धर्म, नीति व रूढी यांचें बंधनांचा गळफांस इतका दृढ तयार केला आहे, कीं त्यांतून हिंदू महिला कशा जिवंत राहिल्या याचें मोठें नवल वाटतें. स्त्रीवर्ग अवनत करीत करीत जगांतून त्यांचें अस्तित्वच नाहीसें करण्याच्या हेतूनें, केलेला हा गुप्त कट आज उघडकीस येत असून, पुरुषी काव्यांचें हिडीस स्वरूप आज नग्न स्थितींत उघडें पडत आहे. संस्कृती, ताई मला हंसूच येतें या शब्दाचें, भाराभर ग्रंथ वाचून मला या शब्दाचा अर्थच उकलत नाहीं, संस्कृतीची मर्यादा फक्त स्त्रियांच्या पुरतींच काग ताई ? ही झाली मध्यवमवर्गातील स्त्रियांची गोष्ट. मग ताई; कामगार नि मजुरांच्या महिलांविषयींचें जीवन तुला कसें सांगू ! रौरव नर्कच आहे बघ शुद्ध तो ! ऊसांची कांडीं चरकांत घालून रस काढतात नाग ताई ! तद्वतच कारखाने निगरण्यांच्या चरकांतून घातलेल्या कांड्याप्रमाणें मजूर वर्गांतील स्त्रियांची स्थिती आहे. इतक्या सर्व परिस्थितीचा विचार मी फार दिवसापासून करते आहे ! ताई !

ताई, तूं मला वेड्यांत काढशील खास, आजचें पत्र वांचून. पण नाइलाज आहे. मी वेडीच झालें आहे बघ आणि दिवसें

दिवस मी जास्तच वेडी होणार, वास्तविक आजच्या तुझ्या विशिष्ट प्रसंगी पत्रांतून नक्राश्रु गाळुन, मीही डोळ्यानां पदर लावावा अशीच तुझी अपेक्षा असेल हे मी जाणते.

पण ताई, मला स्त्रीजीवनाचे धिंडवडे काढणाऱ्या एकाद्या राक्षसी पुरुषापेक्षां, सामुदायिक रीतीनें स्त्रीजीवनाचा नाश करण्याच्या उद्देशानें आखलेल्या कार्यक्रमाची ह्मणजेच हल्लींच्या समाज पद्धतीची जास्त किळस वाटते ! पण ताई इतक्या गडद अंधारांतही मला एक उंच क्षितिजावर एक चांद दिसतो आणि त्याच करितां माझं जीवित मी वहाण्याचं ठरविलं आहे. जगांतील सर्व स्त्रियांच्या मुक्तीचा मार्ग मला दिसत आहे. ताई–तुझें उर्वरीत आयुष्य तूं माझ्याकरितां दे. तुला विचार करण्याला एक सुवर्णसंधी मिळाली आहे. भाऊ नि आई यांचें पत्र कालच आलें होतें. तुला घेऊन जाणार ह्मणतो भाऊ. पहा ताई अजून वेळ गेली नाहीं, अजून तुझी छत्तीशीच चालू आहे. माझ्या लिखाणांत तुला कांहीं सत्यांचें दर्शन घडत असेल, तर मजकडे निघून ये. नाहींतर भाऊ नि आई बोलावतातच आहेत.

पत्ता–कामगारवाडी<br>खोली नंबर १६<br>मुंबई.

तुझी

**शांता.**"

पत्र वाचतां वाचतां माईचें आंग रोमांचित होत होतें. शांताच्या नेत्रांतील अजब जादू व नाविन्य त्यानां प्रतीत झालें. शांतेचें पत्र ह्मणजे विद्युत शक्तीचं किंवा स्फोटक दारूचें कोठार

असल्याचा त्यानां भास झाला. त्यांनीं त्या पत्राची पुन्हा आवृत्ती करण्यास सुरवात केली. पण थोड्याच वेळांत ओटीवर बुटाचा आवाज झाला. चुकून थोडा धक्का लागला असला तरी सर्प श्वासोश्वासावरून मनुष्याची ओळख घेतो. मग, माईनीं बुटाचे आवाजावरूनच नानांना ओळखलें होतें.

"काय विठाबाई मंडळी कुठाहेत?" म्हणतच नाना आंत शिरले. क्षणभरच दोघांची दृष्टादृष्ट झाली. नानानीं माईची ती कृश मूर्ति नि अवस्था पाहिली मात्र, त्यांच्या पुरुषी हृदयाचे दगडी चिरे हालल्याचा त्यांना भास झाला. त्यांचा चेहरा खरकन् उतरला आणि त्यांनीं दृष्टी जामिनीकडे वळविली. थोडा वेळ गंभीर शांतता होती. बोलावयास कोणीच प्रारंभ करीत नव्हते. वर कोणी कोणा कडे पहावयास ही धजत नव्हते. भीत भीत नानांनीं सुरवात केली 'घरीं येणार ना?' माईना नको होता तोच प्रश्न पुढें आला. माईच्या मूर्धनीस्थानापर्यंत तिडीक गेली. त्या लगेच कडाडल्या " आतां माझं असं त्या घरांत कांहींच उरलं नाहीं. तुमच्या घरांत झिजून झिजून गेलेली हाडं आतां रानावनांत पडावीं अशीच इच्छा आहे. कोल्हीं नि कुत्रीं माझी उत्तर क्रिया करतील. आपण त्याची मुळींच काळजी करूं नये. संततीकरितां आपण दुसरं लग्न केलं नि मग आतां माझी कशाला अडचण. आपण आल्या पावली परत जावं माझी आपल्याशी बोलण्याची मुळींच पात्रता नाहीं."

" संपत्ती करितां आणि घरांत दिवा लावण्या करितां वारस पाहिजे म्हणून आणि मित्रमंडळींनीं तसा योग घडवून आणला

म्हणूनच मी हें धाडस केलं. तुमच्या मदती शिवाय मला नवीन प्रपंचाचा भार यत्किंचितही पेळणार नाहीं. तुमच्या सवतीला बहिणीप्रमाणें माना आणि वडील बहिणीचा मान तुम्ही घ्या. तुम्ही दोघी सांगाल त्याप्रमाणें मी वागतो. सर्व कारभार पूर्वीप्रमाणेंच तुमच्या हातीं राहील. माझं सर्व आयुष्य हें असं ऐदीपणांत गेलं तुमच्या सहवासांत माझा ऐदीपणा झाकून गेला, पण आतां नवीन राजवटींत माझं सर्वांग उघडं पडणार आणि खरोखरच—" नानांनीं डोळयाला हातरुमाल लावला. दुभती गाय भाकड झाली म्हणजे मालकाला जसं दुःख होतं तसच नानांना झालं.

पण मायावी दुबळया भाषणानें माईचा क्रोधाग्नि भडकला. त्या लाल झाल्या. आंतून जिभेपर्यंत शब्द येत होते. " वारस संततीची गोंडस सबब पुढें करून कोवळया कळीला विषयपूर्तीचें साधन बनवूं पाहणाऱ्या नरपशो धिःकार असो तुला ! आणि तुझ्याच सारखा तुझ्या जातीला " ओठापर्यंत शब्द येत होते पण ओंठाबाहेर येत नव्हते. आंत कुठेतरी एक शल्य बोंचत होतं इतक्या दिवसांचा सहवास व सहवासजन्य डोळस प्रेम. पण माईनीं संयम केला. " माझी घरीं येण्याची बिलकुल इच्छा नाहीं माझी कुठेंतरी क्षेत्राची ठिकाणीं जाण्याची इच्छा आहे. मन रमेल तिथें मी रहाणार. माझी ट्रंक तेवढी विठाबरोबर पाठवून द्यावी " इतकें म्हणून तिनें नानांना बोलावयास अवसरच दिला नाहीं ती विठाला बोलावण्याकरितां बाहेर गेली नि तिनें विठाच्या कानांत कांहीं कानमंत्र दिला. थोड्याच वेळांत नाना आणि विठा निघून

गेली. जातांना नाना म्हणाले “ तीर्थ नि क्षेत्र करून लवकरच या. ”

नाना निघून गेल्यानंतर माईंना पुन्हां शांतेच्या पत्राची आठवण झाली. दासबोधाच्या पुस्तकांतून काढून त्यांनीं तें पुन्हां वाचावयास सुरवात केली. शांतेच्या पत्रांत विद्युतशक्ती स्फोटक दारु ओतप्रोत भरली आहे. असें त्यांना पुन्हां पुन्हां वाटूं लागले. शांतेचा चांद म्हणजे अखिल स्त्री जातीची धार्मिक, वैवाहिक, सांकृतिक पाशापासून मुक्तता ! महिषा सुरमर्दिनी देवी चंडिकेनें हातांत नग्न खड्ग नि परशु घेऊन महिषासुराचा वध केला होता. आतां शांता हातांत कुदल नि हतोडा घेऊन रूढी, धर्म आणि संस्कृती यांचा नाश करावयास उद्युक्त झाल्याचा त्यांना भास झाला. त्यांनीं शांतेचा चांद शांतेच्या डोळ्यांनीं कसा दिसत असेल आणि तो कुठल्या आकाशांत काशेल या विषयीं विचार करण्यास सुरवात केली. मर्त्यभूमीवर राहून कल्पनेचे पंख बांधून मनुष्य स्वर्गांत सुद्धां उड्डाण करतो नि तेथील गंधर्व आप्सरांचे भोगाविषयीं अभिलाष बाळगतो नाहीं कां आणि त्याच स्वर्गादि सुखावर पाप आणि पुण्य यांचा डोलारा उभारतोच्च कीं नाहीं ! मग शांतेनें केलेली चंद्रमाची कल्पना कांहीं अमानुष किंवा अतिमानुष नाहीं असें त्याना वाटले. त्यांनीं पत्राची घडी केली नि दासबोधांत घालण्याकरितां त्यांनीं दासबोध सहज उघडला. दासबोधाचं कुठलही पान उलगडल तरी माईचें दय नेहमींच उकलत असे. माईची नजर एका ओवीवर पडली.

" कलियुगी नाना मतांचे पेरवणें, नाना शास्त्रें आणि नाना काव्यें ॥ उदंड वाद आणि तर्कशास्त्रें ही अवघी वाचाळ वर्णनें साधकें सोडून द्यावी ॥ १ ॥

उदंड विचार करावा हंसक्षीरन्याय करावा. प्रसंगमान ओळखावा साधकें ॥ सत्य सर्वत्र शोधावें, सार सर्वेचि सेवावें, फलकट टाकोनि द्यावें निसंदेहपणें "

माई साधक दशक वाचतां वाचतांच निद्राधीन झाल्या.

सृष्टीच्या जीवनांत रंगी बेरंगी आकाशांत रात्रीपूर्वी अस्तास गेलेला सूर्यच पुन्हा उदय पावतो. मानस सृष्टीचेही असेच आहे. मानवी मन निद्रावस्थेत प्रविष्ट होण्यापूर्वी हृदयपटलावर ओसरलेली लाटच मन जागृतावस्थेंत आल्याबरोबर प्रथम प्रगट होते. माईच्या मनांतही रात्रीचाच विचार जागृत झाला.

त्यानीं बराच साधक बाधक विचार केला दुपारी त्यानीं टांक दौत घेऊन त्यानीं शांतेच्या पत्राचें उत्तर लिहावयास घेतलें.

" प्रिय शानु,

तुझें पत्र पावलें. स्त्रीजिवित स्वतंत्र व उज्ज्वल करण्याबद्दलची तुझ्या हृदयांतील कळकळ खरोखर अभिमानास्पद आहे. किती व्यापक दृष्टी तुला प्राप्त झाली आहे ग ! स्त्री जीविताच्या समष्टींत तुझी व्यष्टी समरस झाली आहे शानु. तुझें वाचन आणि अभ्यास फारच अवाढव्य असेल ' शांता ' माझ्यापेक्षां जगांतील विद्यमान ऋषींनीं निर्माण केलेलें वाङ्मय तूं वाचत असशील. आणि त्यानीं प्रशंसिलेला नवीन धर्म, नवीन संस्कृति, व नवीन स्वातंत्र्य यांची

संस्थापना करून मनुष्य आणि मनुष्य पुरुष आणि स्त्री यांची नवी नाती निर्माण करण्याकडे तुझी ओढ आहे, हें शांता मी ओळखतें. तुझ्या मानानें माझें वाचन तें काय ? पण शानु, ग्रांथिक वाचन व अभ्यासांत मी तुझ्या मार्गे असेल, तरी जीविताच्या विविध कला मी अनुभवल्या आहेत. पुरुष म्हणजे कोणी राक्षस असतात अशा कल्पनेनें बुजून न जातां राक्षसी पुरुषाच्या सहवासांत आयुष्याची अर्धी अधीक मजला मी गांठली आहे, आणि वाईट पुरुष स्वभाव दोन्हीही पडताळले आहेत मी शानु, जगाचा इतिहास वाचून त्यावर एका विशिष्ठ नवीन प्रकारचा प्रकाश पाडण्याच्या तुझा बेत दिसतो. मी इतिहास वाचला नाही पण पुराणें पाहिलीं आहेत. शानु; आणि सांप्रदायिक ग्रंथ हेच माझें वाचनाचें क्षेत्र होतं इतके दिवस. संसाराचा विचका होण्यापासून मी वाचते आहे ग्रंथ हे. ' धर्म संस्कृति नि समाजपद्धती ही संपद आणि सत्ताधारी पुरुष वर्गानें निर्माण केली म्हणतेस तूं आणि म्हणून तुझा पुरुष वर्गावर रोष मला तुझी ही इतिहासाची नवीन दृष्टी आली नाहीं पण वाचल्या पैकींच लिहिते कांहीं तुला.

जगाची उभारणीं नि संहारणी विषयीं पहा शानु. पुरुष प्रकृतीचा जोडा अनादि अनंत आहे, नव्हे पुरुष आणि प्रकृती यांचा विरोध दिसत नाहीं, तिथे आत्मा ही दोन्ही मध्यें समान वस्तु आहे, पण हें सोडून व्यक्त दशेला आलेलीं पंच महाभूतें पहा व तज्जन्य व्यक्त सृष्टी व स्वेदज अंडज उद्भिज जारज मानव सृष्टी पहा त्यांच्यांत आपआपसांत स्पर्धा नि विरोध दिसून येतो.

जगाच्या प्रथमावस्थेंत मनुष्यप्राणी इतका रानटी नसावा, शानु, मला वाटतं, पुरुष काय नि स्त्री काय स्वभावतःच रानटी नसतात. तसें पाहिले तर मुळची शुद्ध पुरुष प्रकृतीचं जोडपं व्यक्त पंचमहाभूतांच्या गंगाजळांत अशुद्ध बनलेलं दिसतं आहे. जे पुरुषप्रकृतीच्या बाबतींत झालं तेंच मानव वंशाच्या इतिहासांत आढळून येणार नाहीं कां ? जगांतील दुःख, सामाजिक विषमता, स्त्रीपुरुष्यांचे प्रश्न, राजसत्ताचा अधःपात या सर्व गोष्टींच्या विकृत स्वरूपाची मीमांसा वर्गकलहाचें दृष्टीनें लावण्यापेक्षां मूळ पुरुष आणि प्रकृती यांतील समान धर्म व समान सत्ता याचें आकलन करून घेऊन अखिल मानव जातीचा मानसिक, तात्त्विक व आध्यात्मिक बाजूनेंच विचार करावयास पाहिजे.

शानु, संसाराला रथाची उपमा देतात, स्त्री आणि पुरुष हीं दोन त्या रथाचीं समान चाकें समजतात. आणि शानु यावरूनच कीं काय विद्वान् माणसें समान हक्क नि स्वातंत्र्याची घोषणा करतात. शानु, मला गंमत वाटते ग याची. रथ स्थिर आहे तोपर्यंत ही कल्पना ठीक असते पण रथाला गति आली, रथाचे घोडे भरधांव सुटले म्हणजे चाकें वर खाली होत नाहींत काग ! कधीं उजवे चाक वर तर कधीं डावें खालीं आणि रस्ता तरी कुठें सम असतो.

शानु, यांत्रिक पद्धतीनें बनलेलं जीवन हे मुळांतच विषम आहे. खोल खड्डे आणि खळगे आहेत त्यांत, आणि समाजाचा

रथ नेहमीं गतिमान् असतो. पत्र बरच लांबलं कीं ग ? नाईलाज झाला बाई. तुझें विचार माझ्या विचारापासून दूरदूर जातात. शानु, निसर्गांत अनिर्बंध स्वातंत्र्य उपभोगणारे पक्षी सुद्धां अंतराळांत स्वच्छंदानें उडून भराऱ्या मारुन दमले म्हणजे घरट्यांत निवाऱ्याला येतात. शानु, अशिक्षित आहे मी नाहीं, अर्धवट शिक्षित आहे मी. पत्रांतील विचारांत उणेपणा असला तर भरून काढशील तूं. वरचेवर लिहीत जा.

तुझी— **माई.**

दुसरें दिवशीं विठानें माईची ट्रंक आणली. माईनीं निश्चय केला एकदां आईला नि भावाला भेटून तेथें थोडी कालक्रमणा करावयाची. त्यांच्या डोळ्यापुढें कोल्हापुरचे देखावे दिसूं लागले. तो गंगेचा घाट आणि घाटाकडेचीं देवळें, पुलावरून पोंपों करीत जाणाऱ्या मोटारी, कमरेत करगोटा नि काया झाकण्यापुरती लंगोटी नि वर मांजरपाटवजा कुडती घातलेले कुरवाडी रस्त्यानें जातांना माईच्या कल्पना सृष्टींतून वावरूं लागले. त्या कुरवाड्याच्या बायका कंबर कसून, कांचा घालून, बाजारांतून डोकीवर पाट्या घेऊन, फिरतांना त्यांच्या डोळ्यांना दिसूं लागल्या एक ना दोन. त्यांना सर्व आपलं आपलंच वाटूं लागलं. स्त्रियांना आप-घर नि बापघर दोन्ही सारखीच प्रिय असतात. त्या प्रवासाला निघाल्या, जातांना त्यांनीं आपण परत येणार नसल्याबद्दल विठेला कळवलें व विठेचा निरोप घेतला.

माईनीं स्टेशन सोडलें. अग्निरथ भडभडूं लागला. माई खिडकींत बसल्या होत्या. खिडकीच्या बाहेर झाडांची धांवपळ चालली होती ! प्रत्येक झाड मागेंच पडत होतें. माईच्या डोक्यांतूनही मृतायुष्यांतील स्मृती बाहेर पळत होत्या. थोड्या वेळांत त्यांच्या मनापुढें प्रश्न उभा राहिला, पुढें काय ?

रात्रींच्या वेळीं शेजारचे प्रवासी निद्रावश झाले होते. कांहीं डुकल्या घेत होते. माई मात्र एकाग्रमनानें विचार करीत होत्या. थोड्या वेळानें त्यांच्या तोंडून उद्गार निघाले.

मी समष्टी करितां जन्माला आले नाहीं. व्यक्ती स्वतः उन्नत झाली कीं समष्टी तिच्या चरणाची दासी होईल. समष्टीचा उगम व्यष्टींतून झाला आहे. व्यष्टीचा समष्टींतून नाहीं. गंगा व सिंधू या दोन नद्यांचे उगम हिमालयांतच आहेत, शानु म्हणते गंगेचा उगम **उराल पर्वतांत** नि सिंधूचा **कॉकेशसमध्यें**. उराल नि कॉकेशस यांना हिमालयाची सर कशी येणार.

गाडी स्टेशनवर आली म्हणजे हमालाची एकच गर्दी होते. पण वर्तमानपत्रें विक्री करणारी पोरेंही मोठमोठ्या घोषणा करीत असतात " मुंबईंत शांताबाई सबनीस यांस संपाबाबत अटक " पोरगा मोठमोठ्यानें ओरडत होता. माईजवळ येऊन पोरानें विचारलें, ज्ञानप्रकाश, सकाळ, त्रिकाळ, तेज, मौज, बाईसाहेब काय देऊं:-

माईनीं शानूच्या अटकेची साद्यंत बातमी धडधडल्या अंतः-करणानें वाचली. त्यांनीं वर्तमानपत्रावरून आपली दृष्टी फिरवली ती समोरच्या मोठ्या घड्याळावर गेली. घड्याळांत बरोबर सहा वाजलें होते. मोठा काटा बरोबर बारावर नि धाकटा सहावर होता. माईच्या तोंडून उद्‌गार निघाले.

शानूचा चांद व माझा स्वर्ग यांच्यातली तफावतीचे अंतर म्हणजेच घड्याळाचे दोन काटे, एक सहावर तर दुसरा अगदीं विरुद्ध बारावर.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. 98५8 नों दि
[…]




THE IDEAL BOOK DEPOT
BOMBAY 14
CHA[…]

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध जुने व
अनुभविक हातमागाचे
लुगड्यांचें व पातळांचें
कारखानदार

# सायण्णा दिड्डी अँड सन्स.



विजय बिल्डींग साखरपेठ
सोलापूर
यांची

**खरे जरीकाठी**
**रेशमी फॅन्सी व साधी**
**लुगडी व पातळें**
मागवा.

कारण ती
पक्या रंगाची, भरपूर लांबी रुंदीची, घट्ट विणीची
स्वस्त भावांची अशी सर्वांग सुंदर पातळें,
लुगडी, खण, ब्लाऊज, पीसेस वगैरे घाऊक
व किरकोळ भावांत मिळतील. ठोकबंद
व्यापाऱ्यांस भरपूर सवलत.

# मर्दा हँड लूम्स.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं पातळें, लुगडीं, खण, हरतऱ्हेचे ब्लाऊज व जरीचीं लुगडीं, पातळें वगैरे सर्व माल पक्क्या रंगाचा खात्रीलायक, मन-पसंत मिळेल. पातळांच्या निरनिराळ्या नवीन डिझाइन्स काढण्यांत मर्दा हँड लूम्स यांचे वैशिष्ट्य आहे.

लक्ष्मीनारायण स्टोअर्स
नवीपेठ, सोलापूर.

मर्दा हॅन्ड लूम्स.
फलटणगल्ली, सोलापूर.

---

## आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड.

सल्लागारः— वै. पं. गंगाधर शास्त्री गुणे.

बाटली किं. १ रुपाया ट. ख. निराळा.

हे औषध स्वतः शुद्ध करण्यांत वस्ताद आहे. ह्यांच्या सेवनानें शौचास साफ होतें, मूत्रमार्ग स्वच्छ होऊन लघवी चांगली सुटते, भूक छान लागते, खरूज, नायटा, गरमी, परमा उपदेश रक्तदोष या विकारावर तर अमृतच आहे.

मिळण्याचें एकच ठिकाण:—द. ग. तांबेकर,
हाजुमाई चौक, सोलापूर.

# श्री दत्तात्रय स्टोअर्स

आमचेकडे हरत-हेचे स्टेशनरी व कांच सामान, मण्यारी, कटलरी शालोपयोगी पुस्तकें, उंची सिगार व सिगारेटस्, सुवासिक देशी विलायती साबण, चहा, पेपरमिंट व मद्रासी तपकीर वगैरे सर्व माल माफक दरानें मिळेल. लष्कर, सोलापूर.

---

सोलापुरांत इरकली साधी व टोप पदरी लुगडी, जरीचे खण, जरीचे पितांबर मुकटे, साधे खण, महेश्वरी लुगडीं, सर्व त-हेचीं लुगडी, खणाळी वगैरे माल खात्री लायक पक्या रंगाचा माफक दरांत मिळण्याचें एकच ठिकाण म्हणजे

नारायणपेठकर, यांचें दुकान

फलटणगल्ली, सोलापूर.

—० श्री बनशंकरी कॅप फॅक्टरी ०—

# श्री बनशंकरी कॅप फॅक्टरी

आमचे येथें सर्व तऱ्हेच्या मखमली
जरीच्या फरच्या सर्व प्रकारच्या
बनातीच्यासर्व साईजच्या उत्तम
टोप्या व तसेंच हॅटस फेल्ट
हॅट्स वगैरे सर्व माल आमचे
कडे खात्री लायक मिळेल.

श्री बनशंकरी कॅप फॅक्टरी,
माणिक चौक, सोलापूर.

—० श्री बनशंकरी कॅप फॅक्टरी ०—
—० श्री बनशंकरी कॅप फॅक्टरी ०—
—० श्री बनशंकरी कॅप फॅक्टरी ०—

खात्री लायक माल मिळण्याचें

**सोलापूर जिल्ह्यांतील आबाल वृद्धांचे**

**आवडतें दुकान.**

**मे.—बक्षी ब्रदर्स** | बुक सेलर्स व स्टेशनर्स | केमिस्टस् व ड्रगिस्टस् | **सोलापूर.**

आमचे येथें शाळेस लागणारी मराठी, इंग्लिश, उर्दु पुस्तकें व स्टेशनरी सामान, देशी, विदेशी पेटंट औषधें, इंजेक्शन्स, साबण व नित्योपयोगी सामान माफक दरांत विकत मिळेल. तसेंच

**श्री धूतपापेश्वर आर्यौषधी कारखाना**

**पनवेल येथें तयार झालेली औषधें.**

**अभ्रलोह:**—बाळंतपणांतील विकारावर व अशक्ततेवर उपयुक्त औषध.

**शिलाप्रवंग:**—मूत्ररोग, कमरशूळ, धुपणी हे विकार दूर होऊन सार्वदेहिक आरोग्य सुधारते.

मिळण्याचें ठिकाण
पनवेल एजन्ट.

**मेसर्स—बक्षी ब्रदर्स.**
**हाजुमाई चौक, सोलापूर.**

# क्यानी आईस फॅक्टरी

सोलापुरांत पहिल्या प्रतीचा उत्तम [ आईस ] बर्फ
आज बरेंच वर्षें अल्प मूल्यांत पुरविणारी एकच
एक संस्था म्हणजेच क्यॅनी आईस फॅक्टरी
बर्फ शिवाय सर्व तऱ्हेचीं थंड पेयें
आमचेकडे मिळतात.

हेड ऑफिस:—आईस फॅक्टरी
रेल्वे स्टेशन जवळ
स्टेशन रोडवर, सोलापूर.

ब्रँच ऑफिसें:—माणिक चौक
,, भागवत चित्र मंदिर
,, न्यू सरस्वती टॉकीज जवळ
सोलापूर.

# गव्हर्मेंट सिक्यूरिटीज

घेऊन सरकारकडे जरूर तें तारण, विमेदारांच्या
पैशाच्या सुरक्षितपणासाठीं, ठेविल्या आहेत.
नौकरी नाहीं किंवा मिळत असलेल्या
पैशांत भागत नाहीं म्हणून हताश न
होतां एजन्सी घ्या व उदरनिर्वाहाचा
प्रश्न स्वावलंबनानेंच सोडवा. या
संस्थेंत विम्याचें हप्ते अतीशय
कमी, विमेदारांना दिलेल्या
सवलती भरपूर, बोर्ड वजनदार व व्यवस्था
चोख आणि काटकसरीची त्यामुळें
काम मिळणें सोपें जातें. कर्तबगार
माणसांना भरपूर मोबदला.
पॉलिसी किंवा एजन्सी हीच उत्तम.
लिहा किंवा भेटा.

सह्याद्रि इन्शु. कं. लि.
नासीक.

# यशवन्त साबण.

## कमळ छाप

आपल्या गुणामुळें सर्वांना अत्यंत प्रिय झालेला,
नेहमीं वापरल्यानें

१ कमी श्रमांत व थोडक्या खर्चांत कपडे पांढरे शुभ्र निघतात.

२ साबणांत कोणताही अपायकारक पदार्थ नसल्यानें कपड्यांचें आयुष्य वाढतें.

३ म्हणून स्वतःचें कपडे धुणारे स्वावलंबी गृहस्थ, घरगुती धुणी करणाऱ्या काटकसरी गृहिणी व गडी मोलकरणी यशवन्त साबणाशिवाय दुसरा साबण वापरतच नाहींत. या शिवाय कॅरबॉलिक व टर्कीश बाथ साबण चांगले आहेत. स्वच्छतेकरतां कमळ छाप फिनाइल वापरा.

यशवन्त सोप अँड इन्डस्ट्रियल वर्क्स,
म्हसरे गल्ली, सोलापूर.

सोलापुरांत

जेवण्याची व राहण्याची उत्तम सोय.

# गुजरात हिंदु लॉज

मेकॉनकी थिएटर समोर, सोलापूर

कुटुंबासाठीं स्पेशल निराळी सोय.

मुंबई फॅशनचे कोल्ड्रिंक फाउंटन आणि रेस्टॉरन्ट.

# वरवडकर ब्रदर्स

## सराफी दुकान

नवीपेठ, संगीत थिएटरजवळ,

## सो ला पू र

चोख चांदीची भांडी, फ्यान्सी वस्तू,

सोन्याचे दागिनें वगैरे खात्रीचा

माल मिळण्याचें ठिकाण.

# श्री कल्याण छापखाना

## सोलापूर.

येथें

मराठी, गुजराथी, कानडी, इंग्रेजी, हिंदी
भाषेंतील छपाईचीं सर्व कामें
रिपोर्टस, कव्हर पेपर्स, लग्नपत्रिका,
हुंडी बुक, बिल बुक, व इतर सर्व
मोठी पुस्तकें छापण्याचीं कामें
मनपसंत, सुंदर, सुरेख आणि
माफकदरांत केली जातील.

प्रोप्रायटरः—व. पा. शास्त्री.

कल्याण पॉवर प्रेस,

सोलापूर.

# उत्कृष्ट फोटो हाऊस

सोलापुरांत अपूर्व यश संपादन केलें असल्यामुळें फोटोग्राफर म्हणतांच माळगे फोटोग्राफर हें नांव सर्वांच्या मनःचक्षूपुढें एकदम उभें राहतें. त्यानीं चालविलेल्या *ओरिएंटल फोटो स्टूडियोंत* एनलार्जिंग, ब्लॉक, व्हाइट फिनिशिंग, ऑइल पेंटिंग, सुबक फोटोग्राफी इत्यादि सर्व कामें वक्तशीर, योग्य मूल्यांत मन पसंत करून देण्यांत येतात. गिऱ्हाईक नेहमीं खूष होऊनच जाते, हा आमचा विशेष गुण आहे. फोटोग्राफीस लागणारे मिनिटक्यॅमेरा आदि करून सर्व तऱ्हेचें सामान आमचेकडे किफायतशीर भावानें मिळते.

*ओरिएंटल फोटो हॉऊस.*

मेकॉनकी थिएटराजवळ,

सोलापूर.


—:०:—

# श्री कल्याण छापखाना

# सोलापूर.

येथें

## मराठी, गुजराथी, कानडी, इंग्रेजी, हिंदी

मार्फतील छपाईचीं सर्व कामें

रिपोर्टस, कव्हर पेपर्स, लग्नपत्रिका, हुंडी बुक, बिल बुक, व इतर सर्व मोठी पुस्तकें छापण्याचीं कामें मनपसंत, सुंदर, सुरेख आणि माफकदरांत केली जातील.

प्रोप्रायटरः—व. पा. शास्त्री.

कल्याण पॉवर प्रेस,

सोलापूर.

# उत्कृष्ट फोटो हाऊस

सोलापुरांत अपूर्व यश संपादन केलें असल्यामुळें फोटोग्राफर म्हणतांच माळगे फोटोग्राफर हें नांव सर्वांच्या मनःचक्षूपुढें एकदम उभें राहतें. त्यांनीं चालविलेल्या *ओरिएंटल फोटो स्टूडियोंत* एनलार्जिंग, ब्लॉक, व्हाइट फिनिशिंग, ऑइल पेंटिंग, सुबक फोटोग्राफी इत्यादि सर्व कामें वक्तशीर, योग्य मूल्यांत मन पसंत करून देण्यांत येतात. गिऱ्हाईक नेहमीं खूष होऊनच जातें, हा आमचा विशेष गुण आहे. फोटोग्राफीस लागणारे मिनिटक्यॅमेरा आदि करून सर्व तऱ्हेचें सामान आमचेकडे किफायतशीर भावानें मिळतें.

*ओरिएंटल फोटो हॉऊस.*

मेकॉनकी थिएटराजवळ,

सोलापूर.

—:०:—